साप्ताहिक

# साधना

२८३ / दोन रुपये

# पेणमधले पूरग्रस्त — पुनर्वसनाचा एक अनुभव



# भाजप-लोकदल आघाडी टिकेल का?





साप्ताहिक

# माणूस

वर्ष : तेविसावे

अंक : चौदावा

३ सप्टेंबर १९८३

किंमत : दोन रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ

संजय पवार


# सप्रेम नमस्कार, माणूस

## माणुसकी दाखविली

फिलिप्स कामगारांचा मग्रूर व्यवस्थापनाबरोबर जो लढा चालला आहे, त्याबाबत सतीश जकातदार व दीपक देवधर यांचा माहितीवर आधारित लेख वाचला. त्याशिवाय विविध कामगारनेत्यांच्या घेतलेल्या मुलाखती वाचल्या. मुलाखती वाचताना काही कामगारनेत्यांनी राजकीय भूमिकेतून आपले विचार मांडले आहेत, तर एस. एन. हुडके व ए. डी. भोसले यांनी आपले विचार खऱ्या अर्थाने अर्धवट सत्याचा आधार न घेता प्रामाणिकपणाने व कामगारजगतातील सत्याचा आधार घेऊन मांडले आहेत. त्याबद्दल त्यांना धन्यवाद द्यावे तेवढे कमीच आहेत. त्याचबरोबर फिलिप्सच्या ऐन लढ्याच्या वेळी सर्व वृत्तपत्रसृष्टीने फिलिप्स कामगार संघटनेला वाळीत टाकले. तसेच लोकशाही] संकेतांना व तत्त्वांना काळिमा फासून दुसरी बाजूच प्रसिद्ध करावयाची नाही हा अट्टाहास केल्यामुळे फिलिप्स कामगार संघटना म्हणजे दहशतवादी, हुकुमशाही, हिटलरवादी त्याचप्रमाणे गुंडांची मक्तेदारी हा समज जनतेत हळूहळू पसरत चालला होता; पण फिलिप्सच्या लढ्याच्या पाठीमागे खरी तात्त्विक भूमिका काय आहे, सत्य काय आहे, याचा संपूर्ण तपशील जनतेपर्यंत पोहचला पाहिजे, या विशाल व दूरगामी दृष्टिकोनातून तसेच लोकशाही नीति-मूल्यांचा आदर्श बाळगून ज्यांनी फिलिप्स कामगारलढ्याच्या पाठीमागचा इतिहास तसेच मॅनेजमेंट व तिच्या चमच्यांनी वृत्तपत्रांचा आधार घेऊन जो मतलबी व खोडसाळ प्रचार चालविला होता तो कसा बनेल आहे, ही नाण्याची दुसरी बाजू प्रसिद्ध करून सर्वसामान्य जनतेचा गैरसमज दूर केला, त्यामध्ये आपले 'माणूस' साप्ताहिक व दैनिक 'श्रमिक विचार' आघाडीवर आहे आणि म्हणूनच 'माणूस'नेफिलिप्सकामगारलढ्याच्या बाबतीत जी माणुसकी दाखविली तिचे ऋण आमच्यासारख्या कामगारनेत्यांना केव्हाही फेडता येणार नाही !

पुण्यातील फिलिप्स कामगारांचा लढा असो किंवा गरवारे कामगारांचा लढा असो किंवा मुंबईतील गिरणीकामगारांचा लढा असो, हे सर्व कुठल्या ना कुठल्या कारणास्तव लढविले गेले आहेत किंवा चालू आहेत. या लढ्यांमागे सत्यता काय आहे,त्याचप्रमाणे ते कुठल्या कारणास्तव लढविले जात आहेत याचा आज भांडवलदार, शासन, वृत्तपत्र तसेच समाजातील उच्चभ्रू व ठेकेदार दूरगामी व सखोल दृष्टिकोनातून विचारच करीत नाहीत. उलट संगनमत करून हे लढे कसे चिरडले जातील याचाच विचार जास्त प्रमाणात होत आहे. रक्ताचे पाणी करून, घाम गाळून जो श्रमिक कष्ट करतो तोसुद्धा उद्योगाचा घटक आहे. त्याच्याच कष्टामुळे औद्योगिक प्रगतीचे चित्र साकार झालेले आहे हे भांडवलदारांबरोबरच शासनकर्तेही सोयिस्करपणे विसरले आहेत आणि त्याचबरोबर टिळक–आगरकारांच्या पत्रकारितेचा वारसा सांगणारेसुद्धा विसरले आहेत! अशा वेळी 'माणूस' ने जी धडाकेबाज त्याचप्रमाण बिनधास्त भूमिका स्वीकारून कामगारलढ्याबाबत किंवा औद्योगिक क्षेत्रातील घडामोडींबद्दल सविस्तरपणे प्रसिद्धी देण्याचे जे व्रत घेतले आहे ते निश्चितच सतीच्या वाणाइतके पवित्र आहे! म्हणूनच 'माणूस' च्या संपादकांना धन्यवाद द्यावे तेवढे कमीच आहेत !

१८ ऑगस्ट ८३

—बी. एल. तारी

जनरल सेक्रेटरी

वनाज इंजिनिअर्स एम्प्लॉईज युनियन, पुणे

◻ आपल्या दिनांक २० ऑगस्टच्या अंकातील 'पुणे युवक संमेलना' विषयीचा श्री. विष्णु जयदेव यांचा लेख वाचला. या लेखातील काही खटकणाऱ्या गोष्टी मी येथे नमूद करीत आहे.

१. संमेलनासाठी आलेल्या युवकांचा 'भाडोत्री टाळी बहादूर' असा उल्लेख करून अपमान केलेला आहे. वस्तुस्थिती अशी होती की, जमलेले युवक हे उत्स्फूर्तपणे पुण्यास आलेले होते. निव्वळ मुंबईहून ६५ गाड्यां-मधून व अन्य प्रकारे अंदाजे ५ ते ५॥ हजार युवक या संमेलनात सामिल झाले होते.

२. संमेलनासाठी आलेल्या खर्चाचे पैसे कसे आले, या विषयी शंका व्यक्त करण्यात आली आहे. मोठा कार्यक्रम यशस्वी करण्या-साठी पैसा हा लागतोच. या कार्यक्रमासाठी लागलेला पैसा रीतसरपणे जमा केलेला आहे. 'यूथ फॉर नॅशनल रीकन्स्ट्रक्शन कन्वेन्शन व रॅली' या शीर्षकाखाली पावती पुस्तके छापवून हा पैसा उभा केलेला आहे.


३. या संमेलनाद्वारे साध्य काय झाले, या प्रश्नावर सध्या जोरदार चर्चा चालू आहे. माझ्या मते युवकांच्या असंतोषाचे व शक्तीचे पुण्यासारख्या ऐतिहासिक महत्त्व असलेल्या स्थळी यथार्थ प्रदर्शन झाल्यामुळे याची दखल पंतप्रधान श्रीमती इंदिराजी गांधींनीही घेत-लेली दिसते. स्वातंत्र्यदिनानिमित्त लाल-किल्ल्यावरील भाषणात प्रत्येक कुटुंबातील एका युवकास अग्रक्रमाने नोकरी दिली जाईल हे त्यांनी जाहीर केले आहे. युवकांचा हा फार मोठा विजय आहे.

४. संयोजक खासदार श्री. सुरेश कलमाडींनी स्वतःच्या नेतृत्वाला चमकवण्या-साठी या समेलनाचा उपयोग केला नसून देशातील युवकांच्या खऱ्याखुऱ्या प्रश्नांना जाहीरपणे वाचा फोडली आहे.

२९ ऑगस्ट ८३ महादेव शेलार, मुंबई

◻ २० ऑगस्टचा 'माणूस' चा अंक आत्ताच वाचून संपवलाय. अंक एकदम उत्कृष्ट! विशेषतः 'आपण पालक म्हणून कसे आहोत?' हा आत्मपरीक्षण करावयास लावणारा लेख फारच आवडला. कदाचित आमच्या घरी बाळाचा नुकताच जन्म झालाय त्यामुळे असेल किंवा बाळास वाढवताना व त्याची दिनचर्या सांभाळताना बाळ आमची (आमच्या ज्ञानाचीपण!) कशी वेळोवेळी फिरकी घेतोय हे जाणवल्याने असेल. परत एकदा हा अतिसुंदर लेख प्रसिद्ध करून पुढच्या अंकांची हुरहूर लावल्याबद्दल धन्यवाद.

२३ ऑगस्ट ८३ श्यामला बामणे
मडगाव (गोवा)



# मुंबापुरी

## मयूर, जरा इकडं बघा!

या चंगोभंगी छत्तीस रंगी महामुंबईचा प्राणपणाने प्रतिपाळ करणारे काही चांगले लोक अद्याप आहेत, हे आमचे परमभाग्य होय. कुठेही जुनाट झाड कोसळलं की पत्रक काढ; गटारं तुंबली की भल्या पहाटे एक दणदणीत आरोळी मोर्चा काढ. असा उद्योग ही मंडळी नेहमी करीत असतात. अगदीच काही नाही जमलं तर "इज बॉंबे डाईंग" असा फर्स्ट क्लास शाहिरी फड जमवायचा. अन् टाइम-पास करायचा हे ठरलेलं असतं.

या मंडळीत काही खरंच चांगले लोक आहेत, तर काही चक्क लुंगे-सुंगे आहेत. असो.

सांगायचा मुद्दा असा की, आता या जाग-रूक मुंबईकरांचं गावावरचं लक्ष उडालं असून दुसऱ्याच गावक्या करण्यात ही माणसं गुंतली आहेतसं वाटतंय. मुंबईचे महापालिका-आयुक्त दत्तात्रय महादेव सुकथनकर आणि पोलीसआयुक्त ज्यूलियोतात्या रिबेरो यांची कुठेही बदली करण्यात येऊ नये, अन्यथा जन-आंदोलन सुरू केले जाईल असा नवा पोवाडा या मंडळींनी गायला सुरुवात केली आहे.

यासंबंधीची थोडी पार्श्वभूमी अशी: पोलीसआयुक्त रिबेरो यांच्याविरुद्ध कॉंग्रेस आयचे सपूत आणि आमदार भाऊराव पाटील यांनी रणशिंग फुंकले आहेत (आता तुम्ही विचाराल, की हे भाऊराव पाटील कोण? तर त्याला उत्तर हेच की आर. के. लक्ष्मण त्यांच्या व्यंगचित्रात अनेकदा 'भ्रष्टा-चार' अशी पोटावर अक्षरं असलेला जो दोन शिंगवाला, मिसूर डोळ्यांचा राक्षस दाखवतात तो खूपसा या पाटलांशी मिळता-जुळता आहे,) पाटलांच्याविरुद्ध काही जुन्या पोलीसकेसेस आहेत म्हणतात. त्यासंबंधी ते रिबेरोंच्या नावाने कंठशोष करताहेत, त्याला उत्तर म्हणून नाना चुडासामा, मधु मेहता, डॉ. रश्मी मयूर, मीना परेरा मंडळी रिबेरों-च्या भोवती घट्ट कडं टाकून उभी आहेत!

तसंच, मुंबई महानगरपालिकेचे सूत्रधार सुकथनकर वेळोवेळी जी साफसफाई करतात, अनधिकृत बांधकामं तोडून टाकतात, फेरी-वाल्यांना हाकलून लावतात त्याविरुद्ध पीयु-सीएलवाले बोंबाबोंब करताहेत. प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेलं आहे. याही प्रकरणी हे लोक सुकथनकरांच्या बाजूने आहेत व या आयुक्तांची बदली करण्यात येऊ नये असा घोशा अनेकांनी लावला आहे. "बॉंबे वॉंटस् सुकथनकर अँड रिबेरो" असे जाहिरात-फलक जागोजागी झळकताहेत.

शहराची घडी नीट बसवू पाहाणाऱ्या आणि गुन्हेगारी, बकाल संस्कृती निपटून काढू पाहणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याला सुज्ञ, जागरूक नागरिकांचा नेहमीच पाठिंबा राहील; पण त्यासाठी बेकायदा मोहीम उघ-डणं, जाहिरात-फलक लावणं (याचा खर्च कोण करतंय?) किंवा या दोन अधि-काऱ्यांची बदली झाल्यास आम्ही मोर्चा काढू' आंदोलन करू, अशी धमकी देणं म्हणजे जरा जादाच झालं. थोडक्यात ही दंडेलशाही झाली. आणि अशी दंडेलशाही भाऊराव पाटलांच्या संस्कृतीत ठीक आहे. आपल्या सारख्याला ते शोभत नाही, डॉ. मयूर!

सरकारी अधिकाऱ्यांच्या बदल्या या होणा-रच. रिबेरोंची मुदत संपत आली आहे. तसंच, सुकथनकरही या वर्षअखेर जातील. तेव्हा या अधिकाऱ्यांच्या कायम वास्तव्याचा आग्रह न धरता, शासकीय आणि पालिका-पोलीसयंत्रणेवर सतत 'प्रेशर' आणून मुंबईच्या कायदा-सुव्यवस्थेच्या दृष्टीने योग्य ती पावलं उचलण्याचा आग्रह या मंडळींनी धरायला हवा. कार्यक्षमतेचा आणि धडाडीचा

मक्ता काय फक्त सुकथनकर–रिबेरोंकडेच आहे? त्यांच्यानंतरचे अधिकारी गलथानपणे कारभार करू लागले तर त्यांना वठणीवर आणायला डॉ मयूर–चुडासामा, किसन मेहता प्रभृती पुढे येतील काय?

सरतेशेवटी, या मंडळींनी आपली 'प्रियॉरिटी' नक्की करायला हवी. भाऊराव पाटलांना विरोध की ते ज्या राजकीय संस्कृतीचे प्रतीक आहेत त्या संस्कृतीला विरोध? डॉ रश्मी मयूर प्रदूषणावर आणि शहरीकरणावर लंबीचवडी भाषणं देतात. त्यांचा श्रोतावर्ग हा उच्चभ्रू संस्कृतीमधला असतो. कारण त्यांची भाषणं बहुतेक रोटरी-जेसी–लायन्स क्लबमध्ये होतात. डॉ. मयूरचं भाषण ऐकल्यानंतर ही माणसं रात्री बाल–गोपाळांसह ब्ल्यू फिल्म बघतात. ही ब्ल्यू फिल्म दाखवणारा कोणा तरी राजकीय गुंडाचा उजवा–डावा हात असतो. तेव्हा डॉ. मयूर यांनी या किडलेल्या संस्कृतीवर घाला घालावा. फक्त सुकथनकर–रिबेरो यांच्यावर प्रेम पाखडून चालणार नाही!

## बेस्ट केरकर पुन्हा फॉर्मात

पुरुषोत्तम बाळकृष्ण केरकर हे नाव एखाद्यासाठी उलटलेल्या, बोरिवली–ठाणे भागात छोटंसं घरकुल असलेल्या आणि उन्हं कलंडल्यावर शांतपणे फिरायला निघणाऱ्या पेन्शनरचं असायला खरं तर काहीच हरकत नसावी. आणि बेस्टचे महाव्यवस्थापक पु. बा. केरकर यांना जर दोन वर्षे मुदतवाढ मिळाली नसती तर ते एव्हाना आपल्या नातवंडांना खेळवत बसले असते परंतु गेल्या आठवड्यात मुंबई महानगर पालिकेने पु. बा. केरकर यांना घसघशीत दोन वर्षे मुदतवाढ दिली. याला कारणं दोन: एक त्यांच्यानंतर बेस्ट उपक्रमाचा कारभार चालवण्यास त्यांच्याइतका कोणीही कर्तबगार अधिकारी नाही दोन, त्यांच्या कारकिर्दीत बेस्टची भरभराट झाली. पैकी, पहिलं कारण तद्दन भंकस आहे. केरकर जर सेवानिवृत्त झाले तर त्यांच्याइतका समर्थ अधिकारी बेस्टकडे नाही ही शरमेची गोष्ट आहे. एक केरकर सोडले तर नवकळ, मिटवंदरसकट सगळ्या अधिकाऱ्यांचे खांदे बेस्टचं ओझं संभाळण्यास समर्थ नाहीत असा याचा अर्थ होतो आणि हे निश्चितच शुभंकर नाही. बेस्टकडे समर्थ अधिकारी नाही हे मान्य, पण राज्य सरकार कडेही नाहीत? महाराष्ट्र पब्लिक सर्विस कमिशनकडेसुद्धा माणूस नाही? मागे राज्यसरकारने बेस्टच्या महाव्यवस्थापकपदी आयएएस अधिकाऱ्यांची नेमणूक करून बेस्ट समितीच्या तोंडी फेस आणला होता!

या खेपेलासुद्धा राज्य सरकार आयएएस अधिकाऱ्याला केरकरांच्या खुर्चीवर बसवू शकलं असतं. परंतु तसं होऊ नये म्हणून नगरपित्यांनी घाईघाईने केरकरांना मुदतवाढ देऊन टाकली. आयएएसचा माणूस आला तर तो या नगरसेवकांना पुरुन उरेल हे राजकीय पक्षांना ठाऊक आहे. म्हणून सगळ्यांनी केरकरांचा आग्रह धरला.

पण एक मात्र कबूल केलंच पाहिजे की केरकरांच्या नेतृत्वाखाली बेस्टला चांगले दिवस आले. केरकर माणूस हुशार, पुन्हा वर स्वभाव लाघवी; और क्या चाहिये! ते बेस्ट समितीच्या सभेत काय बहार आणतात ते प्रत्यक्ष पाहायला पाहिजे. 'गाव पडला सोन्यांचा अन मी पडले भोळी' असा भाव सदोदित ठेवून केरकर आपल्याला हव्वा तो प्रस्ताव हव्वा तसा पास करून घेतात. वर पुन्हा साखरपेरणी. केरकरांनी सगळ्यांशी मित्रत्वाचे संबंध ठेवले आहेत. कोणालाही न दुखवता आडव्या बोटानं तूप काढण्याचं कसब त्यांच्यापाशी आहे. जोडीला कर्तृत्व आहेच.

भाजप आणि सीपीएम सोडून बाकी एकूणेक पक्षांनी केरकरांना पाठिंबा दिला. भाजपने आधी होय म्हटलं आणि नंतर (नेहमीप्रमाणे) नाही म्हटलं. मागे ऐंशी साली देखील भाजपने असंच केलं होतं. त्या वेळचे उपमहापालिकाआयुक्त बी. डी. देसाई यांना मुदतवाढ दिली जाईल असं आधी ठरलं. नंतर फासे पलटले. या वेळीही असंच. त्यामुळे चर्चेच्या वेळी इतर सगळ्या पक्षांनी भाजपचे वाभाडे काढले.

भाजपचे चिमणलाल मेहता बेस्ट समितीचे अध्यक्ष आहेत. बेस्ट समितीने जूनमध्ये जेव्हा केरकरांना जीवदान देण्याचा प्रस्ताव मंजूर केला त्याला भाजपचा पाठिंबा होता. नंतर पार्टीने खेळी बदलली. त्यामुळे मेहता पेचात पडले. ज्या पक्षाने केरकरांना विरोध केला त्याच पक्षाचा माणूस बेस्ट समितीचा अध्यक्ष या नात्याने केरकरांशी कसा काय जमवून घेऊ शकेल?

अर्थात, केरकर तसे चतुर आहे. ते कोणताही हँग–ओवर ठेवत नाहीत. त्यांना फक्त मुदतवाढ हवी होती. ती त्यांना मिळाली. कुठेही टायर पंक्चर न होता. आता दोन वर्ष त्यांची गाडी एकदम फुल्ल स्पीडमध्ये चालेल. आखिर बेस्ट की गाडी है भई!

## तुम्ही पाहिलंत?

मुंबापुरीत आता सर्व स्टेशनांवर आणि गल्लोगल्ली 'आओ प्यार करे' या हिंदी चित्रपटाची पोस्टर्स लागली आहेत. ही पोस्टर्स सद्भिरुचीला (अरेरे, काय हा मोठा शब्द!) सोडून असल्याने आम्हालाच काय पण तद्दन पब्लिकलाही त्यामध्ये रुची वाटू लागली आहे. भारतीय जनता युवा मोर्चाच्या नतद्रष्ट लोकांनी मात्र अश्लीलताविरोधी मोहीम काढून जागोजागी ह्या जाहिरातींवर काळे फासले आहे.

पण ही मोहीम संपते न संपते तोच 'प्रायवेट लाइफ' ह्या चित्रपटाची पोस्टर्स सर्वत्र झळकायला लागली आहेत. कोणत्याही 'प्रायवेट' गोष्टीत पब्लिकला इंटरेस्ट असतोच हे निर्मात्यास ठाऊक असल्याने ह्याही चित्रपटास गर्दी होईल यात शंका नाही. आधी प्रचंड हिंसाचार दाखवून शेवटी सत्य आणि शांततेचा उद्घोष करायचा या नेहमीच्या तंत्राचा अवलंब ह्याही चित्रपटात केलेला असणार. टाइम्समधील त्याची जाहिरात आहे– क्रूसेड अगेन्स्ट इव्ह टिझर्स आणि म. टा. मध्ये– सेक्स एक्सप्लॉयटर्स एक्सपोझड्– तुम्ही पाहिलीत का?

—विष्णू जयदेव

गेलं एक तप राम–रामायणविषयक ज्ञानयज्ञात झोकून देऊन अभ्यासकांसाठी अतिशय बहुमोल असे संदर्भग्रंथ प्रसिद्ध करण्याचं महत्त्वाचं काम पुण्यातल्या श्रीरामकोशमंडळात चालू आहे. मंडळाचे कार्यवाह आणि श्रीरामकोशाचे संपादक श्री. अमरेंद्र गाडगीळ यांचे वडील समर्थसांप्रदायी होते. १९६८ साली गाडगीळांनी गणेशकोषाचं काम पूर्ण केलं आणि १९६९ साली वडिलांच्या प्रेरणेनं श्रीरामकोशाचं काम करण्याचा संकल्प सोडला. १९७१ साली श्रीरामकोशमंडळाची स्थापना झाली आणि कामाला खऱ्या अर्थानं वेग आला. ७१–८३ या कालावधीत मंडळाने श्रीरामकोशाचे आठ ग्रंथ प्रसिद्ध केले. त्यामध्ये श्रीरामकोशाचे दोन खंड, हनुमानकोश, वाल्मीकि रामायणाच्या मराठी अनुवादाचे दोन ग्रंथ, रामायणावरील स्थलदर्शन सम्यकदर्शन आणि पात्रदर्शन घडवणारे तीन ग्रंथ आणि रामदर्शन अशा आठ ग्रंथांचा समावेश आहे.

अपुरा पैसा, सरकारी दिरंगाई, जागेची अडचण, काम करणारे हात कमी अशा अडचणींना तोंड देत गाडगीळांनी कोशाच्या योजनेतला पहिला टप्पा पूर्ण केला आहे. कोशाच्या पुढच्या टप्प्याचं काम सुरू झालं आहे. आर्थिक बोजा न पडता काम सुरळीतपणे करता यावं तेवढीच त्यांची सध्या इच्छा आहे.

कोशाच्या कामात आपल्या तरुण सहाय्यकांच्या सहभागाबद्दल गाडगीळ आवर्जून बोलतात. त्यांच्यापैकी एक म्हणजे निर्मला कामत. गेली ८–१० वर्षं त्या गाडगीळांबरोबर काम करत आहेत. गाडगीळांच्या व्यक्तिमत्त्वाची आणि कार्याची त्यांनी करून दिलेली ही ओळख.

# कोशकार श्री. अमरेंद्र गाडगीळ


रामनवमी २१ एप्रिल ८३ चा दिवस. पुण्याच्या श्रीरामकोशमंडळाचा कृतज्ञता समारंभ साजरा होत होता. अर्थातच त्या कार्यक्रमाचे संयोजक श्रीरामकोशाचे प्रमुख संपादक श्री. अमरेंद्र तथा नानासाहेब गाडगीळ होते. काहीसे थकलेले तरीही तितक्याच उत्साहाने नानासाहेब आपल्या संस्थेचं गेल्या दशकातलं कार्य सांगून भावी काळाची रूपरेषा स्पष्ट करीत होते. त्या निमित्ताने संस्थेला साहाय्य केलेल्या सर्वांचे मनापासून आभार मानत होते. सहजच मनात विचार आला. खरंच यांना अपेक्षित साहाय्य लाभलं का ? जनतेने-शासनाने त्यांच्या कार्याचे मोल ओळखलं का ? या अन् अशा अनेक प्रश्नांच्या आवर्तात गुरफटलेले मन नकळत एक दशक मागे वळलं. श्रीरामकोशाच्या इतिहासात गुंतलं आणि एक गोष्ट प्रकर्षानं जाणवली की, गेल्या तपाच्या वाटचालीत श्रीरामकोशाची धुरा नानासाहेबांनी सांभाळली एकाकीपणाने.

गणेशकोश नुकताच हातावेगळा झाला होता. अवघ्या अकरा महिन्यांच्या कालावधीत गणेशविषयक सर्व संदर्भांचा अंदाजे चारशे पृष्ठांचा एक कोश प्रकाशित करणे हे दुर्घट काम नानासाहेबांनी जिद्दीने, श्रद्धेने सफल केले होते. त्याच समाधानात नवे संकल्प स्फुरले. प. पू. श्रीधरस्वामींचा आशीर्वाद लाभला आणि श्रीरामकोशमंडळाची स्थापना झाली. नव्या कोशाचा आराखडा तयार होऊ लागला. कामाची वाटणी झाली सहकाऱ्यांचे संपादकमंडळ स्थापन झाले; पण जसजसा काळ जाऊ लागला तसतसे नानासाहेबांना हे जाणवायला लागले की, त्यांना अपेक्षित असलेल्या वेगाने काम होत नव्हते. मग ते संकलन लेखनाचे असो की, द्रव्यार्जनाचे असो. संकल्प साऱ्यांनीच सोडला होता; पण तो पूर्ण करण्याची जबाबदारी नानासाहेबांवरच येऊन पडली. कारणे काहीही असोत; परंतु हा प्रचंड खटाटोप पूर्ण करण्यास त्यांना एकटयालाच पुढे व्हावे लागले. खरं तर त्यांचा कामाचा वेग आधीच विलक्षण होता. त्यात एकटयाने काम तडीस नेण्याचे ठरवताच त्यांना आपले इतर उद्योग नाइलाजाने आटोपते घ्यावे लागले. कारण त्यांनी जेव्हा ही सहा खंडात्मक श्रीरामकोशाची योजना आखली, त्या वेळेला ते मुंबईच्या वोरा अँड कंपनी या प्रसिद्ध प्रकाशन संस्थेच्या मराठी विभागाचे संपादक होते. त्यासाठी नवनवी पुस्तके संपादन करण्यात त्यांचा दिवसाचा बराच वेळ जात होता. नवनव्या योजनांनी समृद्ध केलेल्या या विभागाला अनेक वेळा पारितोषिके देऊन शासनाने त्यांच्या कार्याचा गौरव केलेला आहे.

याशिवाय लहान मुलांसाठी ते गोकुळ मासिकही चालवीत होते.

तसेच वोरा कंपनीच्या वतीने वेगवेगळी पुस्तके संपादन करणाऱ्या नानासाहेबांनी बाल-कुमार साहित्यसंमेलनाची स्थापना केली आणि या संस्थेचे पहिले संमेलन पुण्यात मोठ्या धूमधडाक्याने साजरे करून ती संस्था विश्वस्तांच्या हाती सोपवलीही. कारण त्यांचे श्रद्धास्थान असलेल्या समर्थ रामदासांची तीनशेवी निर्याणतिथी जवळ येत होती. अशा वेळी इतर काय करतील याचा विचारही न करता आपल्या कार्याची दिशा ठरवून नानासाहेबांनी समर्थ रामदास संशोधन प्रबोधन संस्थेची स्थापना केली. वेगवेगळ्या राज्यांत एकाच वेळी त्रिशतसांवत्सरिक महोत्सव सुरू केला; पण शेवटी श्रीरामकोशाप्रमाणेच येथेही घेतलेले निर्णय अंमलात आणण्याची जबाबदारी त्यांच्यावरच पडली आणि त्यांनी ती स्वीकारलीही.

हे सारं करत असताना त्यांच्या विलक्षण महत्त्वाकांक्षेने किंबहुना 'उत्कट भव्य तेचि घ्यावे' या समर्थवचनाला अनुसरून त्यांनी श्रीरामकोशाप्रमाणेच हनुमानकोश, वाल्मीकि



**उगवत्या पिढीसाठी यांनी पुन्हा एकदा लेखणी हाती घ्यावी.**

रामायणाची संशोधित पाठावृत्ती, श्लोकसूची हे ग्रंथ वाजवी किंमतीत देण्यासाठी प्रकाशित केलेच; पण त्याचबरोबर शिशुगटाच्या वाचकांपासून नवसाक्षर वाचकांपर्यंत विविध तऱ्हेच्या वाचकांसाठी साधी, सोपी, परंतु मूळ वाल्मीकि रामायणानुसार असलेली रामकथा पंचविध स्वरूपात तयार केली. कारण रामायण हा आपल्या देशाचा इतिहास सर्वांना शुद्ध स्वरूपातच समजला पाहिजे. मग तो चिकित्सक–अभ्यासक असो की, श्रद्धाळू सर्वसामान्य असो. याच भावनेने नानासाहेबांनी त्यासाठी आवश्यक असलेले सर्व साहित्य अत्यंत कमी किंमतीत प्रकाशित करण्यास सुरुवात केली. रामाप्रमाणेच समर्थांचा दासबोध, मनोबोध, आत्माराम हे सद्ग्रंथही प्रकाशित केले, तेही अल्पमूल्यात. अधिकाधिक लोकांना याचा लाभ घेता यावा म्हणून केवळ पाच रुपयांत दासबोध लोकांना दिला.

श्रीरामकोश आणि समर्थ रामदास संशोधन–प्रबोधन या दोन्ही संस्थांच्या वतीने त्यांनी समाजकारणासाठी जसे वाङ्मयीन कार्य केले तसेच सांस्कृतिक कार्यक्रमही तितक्याच धडाडीने साजरे केले. रामनवमी, दासनवमी या प्रमुख उत्सवांबरोबरच प्रासंगिक व्याख्यानमाला आखल्या, वेगवेगळ्या स्पर्धा घेतल्या, बक्षिसे दिली. या क्षेत्रातील मान्यवंतांचे सत्कार केले. ते एकट्याच्या जबाबदारीवर, निष्ठेने, श्रद्धेने केले.

या साऱ्या उद्योगांसाठी त्यांना दिवसाचे चोवीस तासही अपुरे वाटू लागले. समाजातल्या प्रत्येक घटकासाठी कार्य करणाऱ्या संस्था स्वत: निर्माण करून त्यांनी अनंतहस्ते जनताजनार्दनाची सेवा केली. प्रत्येक संकल्प सिद्धीस जाण्यासाठी ते अहर्निश झटले. प्रसंगी वाईटपणाही करारी बाण्याने स्वीकारला; पण कोणत्याही परिस्थितीत कामाचा वेग मंदावू दिला नाही. कारण त्यांचं कामावर–कार्यावर विलक्षण प्रेम आहे. आपली ही भूमिका स्पष्ट करताना ते नेहमी म्हणतात की, माझा व्यक्तीवर रागलोभ नाही. माझे कामावर प्रेम आहे. त्याच दृष्टीने त्यांनी काम पाहिले ते कोणी केलं हे त्यांच्या दृष्टीनं महत्त्वाचं नाही त्यामुळे कदाचित काही दुखवलेही गेले असतील, कोणावर अन्यायही झाला असेल. त्यातूनच त्यांच्या या वृत्तीची इतरांना ओळख न पटल्यामुळे त्यांना एकट्यालाच सारी जबाबदारी उचलावी लागली. अर्थात त्यांची त्याबाबत कसलीच तक्रार नाही. कारण संकल्प त्यांनी केला म्हणजे त्याची पूर्तता ते येनकेन प्रकारेण करणारच. मग हाती असलेल्या साधनांचाही विचार न करता ते झेप घेणार, हा त्यांचा स्वभाव आहे. दुर्दम्य आत्मविश्वास, डोळस श्रद्धा आणि अविरत कष्ट करण्याची चिकाटी हे त्यांच्या तपश्चर्येचे मूलाधार आहेत.





आजवर नानासाहेब गाडगीळांनी लोकांना देण्यासाठी जे जे इच्छिलं ते सारं त्यांनी या त्रिगुणांच्या बळावर मिळवलं; पण यातून त्यांनी गमावलं किती आणि कमावलं काय याचा विचार केल्यास, एका शब्दात सांगायचं तर बहुतांशी गमावलंच. कारण या सर्व संस्था कार्यरत राहाण्यासाठी अमाप द्रव्यनिधी हवा. बरोबरीने सर्व क्षेत्रात (द्रव्यार्जनासह) काम करणारे सहकारी हवेत. यातलं काही एक जवळ नसताना त्यांनी संकल्प केला आणि अविश्रांत मेहनतीच्या व श्रद्धेच्या बळावर तो तडीस नेला. अर्थातच त्यासाठी त्यांना आणि त्यांच्या पत्नी सौ. मंगलाबाईंसह सर्व कुटुंबियांना अनेक परीचा शारीरिक–मानसिक त्रास सहन करावा लागला. जणू या साऱ्या संस्था त्यांच्या स्वत:च्या लाभासाठी त्यांनी स्थापन केल्या होत्या; पण नानासाहेबांसह या सर्वांनी आप्तेष्ट–सुहृदांच्या सदिच्छेने सर्व अडचणींवर मात करून श्रीरामकोशाचा संकल्प सिद्धीस नेला. अत्यल्प किंमतीत विविध ग्रंथ त्यांनी समाजाला दिले. रामकोशाचा प्रचंड खर्चिक डोलारा त्यांनी कुशलतेने पेलला.

या साऱ्या दानात त्यांचे प्रकृतिस्वास्थ्य गेले, लेखणी हरवली. एकोणीसशे बेचाळीसच्या दुसऱ्या महायुद्धात 'भडकत्या ज्वाला' ही लोकप्रिय लेखमाला लिहिणारे किंवा मंगल प्रकाशनातून राष्ट्रसेवकाची शिदोरी, ताई आणि भाऊ, प्रवासी राम, वटपत्र लिहिणारे नानासाहेब विविध संस्थांच्या कार्यव्यापात बाजूलाच राहिले! उत्कृष्ट पत्रकारितेने लेखनारंभ करणारे नानासाहेब कोशकार झाले. संपादक झाले; पण त्याचबरोबर संस्थाचालकत्वाची जबाबदारी सर्वार्थाने स्वीकारावी लागल्याने क्षणाचीही उसंत न घेणाऱ्या नानासाहेबांना व्यक्तिगत लिखाणाला सवड मिळालीच नाही. तसेच प्रकृतीची काळजी घेणंही त्यांना कधी जमलं नाही.

आजपर्यंत त्यांनी समाजाला भरभरून दिलं. रामायण महाकाव्याला कोशाचं स्वरूप देऊन चिकित्सक अभ्यासकांची सोय पाहिली. रामायणसंहिता, दासबोध यांसारखे बहुमोल साहित्य स्वत:च्या जबाबदारीवर अल्पमूल्यात उपलब्ध करून दिले. लेखकांची एक पिढी घडविली. समाजाला त्यांच्या रूपाने कुशल संयोजक, चिकित्सक संपादक आणि ज्ञानी वक्ता लाभला; पण समाजाला त्यांच्यातला लेखकही हवा आहे. संस्कारक्षम साहित्य ही आजची गरज आहे आणि त्यासाठी त्यांनी पुन्हा एकदा लेखणी हाती धरायला हवी. प्रकृतिस्वास्थ्य सांभाळून उगवत्या पिढीसाठी लेखन करायला हवे. कारण कर्तृत्ववान व्यक्तींच्या कर्तृत्वाला वयाची मर्यादा आड येत नाही. तेजसां हि न वय: समीक्ष्यते!

—निर्मला कामत

४ लाख ६३ हजार वाचकांची एकमुखी प्रशंसा




चौथी
डिलक्स
आवृत्ती

लेखक : वि. ग. कानिटकर

॥ पृष्ठसंख्या ५४० ॥ मोठा डबल क्राउन आकार ॥ भरपूर छायाचित्रे ॥
॥ मूळ किं. १४० रु. ॥ सवलतीत ९५ रु. ॥

चौथ्या डिलक्स आवृत्तीचे खास आकर्षण

**माइन काम्फ**

या हिटलरच्या दुर्मिळ आत्मचरित्राची सचित्र ओळख

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.

## मुक्ताफळे

# शांततेचे पारितोषिक

'सर्व सभासदांनी बसून घ्यावे. नोबेल शांतता पारितोषिक कमिटीचे कामकाज आता सुरू होत आहे. सेक्रेटरी, पहिले नाव कुणाचे आहे?'

'इंदिरा – प्रियदर्शिनी – फेरोज – गांधी भारतरत्न!'

'व्हॉट इज भारतरत्न?'

'सर, त्यांनी स्वत:च स्वत:ला घेतलेला तो सन्मान आहे. त्यांचं नाव सुप्रसिद्ध ब्रिटिश धनिक स्वराज पॉल यांनी सुचविलेले आहे.

'नाव सुचवणारा माणूस एक उपटसुंभ उद्योगपती आहे. इंदिरा गांधींची त्याच्यावर मेहेरबानी आहे. स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी या तोंडपुजा माणसाने हे नाव सुचवलेले आहे. असे नाव आपण स्वीकारू शकत नाही.'

'अध्यक्षमहाराज, स्वत:च्या फायद्यासाठी सत्तेवरील माणसाची खुषामत करणे यात काहीच वावगं नाही. केवळ यामुळंच आपण बाईंच्या नावाचा विचार टाळू शकत नाही.'

'ठीक आहे. आपण विचार करू; पण ज्या बाईंनी आसामात आपल्या पक्षाचे सरकार सत्तेवर यावे या स्वार्थापायी शेकडो माणसे मारली–'

'अधिकृत आकडा १२६ आहे, १६२ जखमी होते. त्यातले काही नंतर मेले तरी आकडा फक्त १५० च्या आसपास जानो. शिवाय आपण हे लक्षात घ्यायला हवे की, २०२ वेळा गोळीबार करून केवळ एवढीच माणसे मेलेली आहेत!'

'बरं, काही शेकडो मारली! तर अशा बाईंना आपण शांततापारितोषिक देणं कसं शक्य आहे?'

'अध्यक्षमहाराज, लोकशाहीशिवाय शांतता आणि शांततेशिवाय लोकशाही संभवत नाही, आसामात यासाठी इंदिराजींनी निवडणुका घेतल्या. लोकशाहीविरोधी म्हणजे पर्यायाने शांतताविरोधी माणसे मारून. बाईंनी जागतिक शांततेत भरच घातलेली आहे!'

'या हत्याकांडात स्त्रिया व मुलेही मारली गेली–'

'सन्माननीय सभासद घोटाळा करीत आहेत. सुमारे ३००० स्त्रिया व मुले मारली गेली, ती मेली, हत्याकांडात. भारतातील निवडणुका घेणाच्या हट्टाचाच तो प्रक्षोभ असला, तरी इंदिरा गांधींच्या पोलिसांवर त्याचा दोष नाही. इंदिरा गांधींच्या पोलिसांनी आणि शिपायांनी मारली ती सर्व तरुण मुले होती–'

'अध्यक्षमहाराज,मी आपले या गोष्टीकडे लक्ष वेधू इच्छितो की, आसामात बाँबफेक केली असती,तर लाखांवर माणसे मरू शकत होती.मागे बंगालमधील हत्याकांडाची बिहारमध्ये प्रतिक्रिया झाली. तेव्हा इंदिराजींच्या वडिलांनी बाँबफेकीची धमकी दिली होती! इंदिराजीदेखील ते करू शकत होत्या; पण त्या शांतताप्रेमी असल्याने त्यांनी बाँबफेकीला सक्त विरोधच केलेला असावा. आसामात शांतता नांदावी,तिथे शांत वातावरणात लोकशाही अवतरावी म्हणून इंदिराजींनी जी संयमपूर्ण कृती केली, त्याबद्दल त्यांचा उचित सन्मान व्हायलाच हवा–असे माझे स्पष्ट मत आहे.'

'माझा विरोध आहे याला. माणसे मारून आसाम शांत झाला का? पुन: चळवळ सुरू होत आहे. विरोधकाला गोळ्या घालूनच प्रत्येक प्रश्नाची सोडवणूक करू पाहणाऱ्या व्यक्तीला आपण शांततापारितोषिक दिले तर जगात आपले हसे होईल!'

'हसे होण्याची भीती कोणाला घालता? यापूर्वी काय हसे झालेले नाही? हेन्री किसिंजर, इस्रायलचे पंतप्रधान बेगिन यांना नाही आपण शांतता पारितोषिके दिली? तेव्हा काय कमी हसू झाले?'

'ऑर्डर-ऑर्डर! मागच्या निर्णयावर टीका करण्याचा या कमिटीला अधिकार नाही. टू द पॉईंट बोला!'

'आसाममध्ये घुसलेल्यांना हाकलून काढणे याशिवाय तिथल्या प्रश्नावर तोडगा काय असू शकतो?'

'तो आपल्यापुरता प्रश्न नाही! आपला त्याच्याशी काही संबंध नाही! सगळे नॉन अलाइन्ड देश, जगात शांतता नांदावी म्हणून एकत्र जमतात. परिषद संपली की लगेच एकमेकांच्या उरावर बसतात. म्हणून आपण काय त्यांच्या नेत्यांचा शांततापारितोषिकासाठी विचारच करायचा नाही की काय? सुदैवाने आपण ज्या नावाचा विचार करीत आहोत, त्या नॉन अलान्ड देशांच्या गटाच्या अध्यक्षा आहेत!'

'पण त्यांनी प्रत्यक्षात केलंय काय? लिबिया छाडवर स्वारी करतो, इराक इराणमध्ये सैन्य घुसवतो, भारतीय वांशिकांची श्रीलंका कत्तल करतो–'

'अध्यक्ष महाराज, जगात जर सर्वत्र शांतता प्रस्थापित झाली तर मग हे पारितोषिक द्यायचा प्रश्नच येणार नाही! शांतता नाही म्हणून तर ती निर्माण करण्याच्या प्रयत्नाना महत्त्व. उशीर करण्यात अर्थ नाही. फिडेल कॅस्ट्रोसारख्या चोवीस तास लष्करी गणवेष घालणाऱ्या हिंसक माणसाकडून अध्यक्षपद हिसकावून घेण्याचे मोठं काम भारतरत्न इंदिराजींनी केलेले आहे. केवळ त्यांनी काही शेकडो माणसे मारली, असल्या फडतूस कारणास्तव आपण त्यांना यंदाचे शांतता पारितोषिक नाकारणार आहोत काय?'

'सेक्रेटरी, पुढचं नाव वाचा. आजच्या दिवसात आपल्याला काम आटोपायचे आहे की नाही?'

'जयवर्धने–श्रीलंकेचे अध्यक्ष–'

–ग्यानबा

## ललित मुंबई

# कथालेखकांच्या व्यथा !

माझ्या कलाकृतीचा कोणी सच्चा आस्वादक नाही, कोणी रसिक, मला जाणून घेणारा असा या काळात नाही; पण असो, काळ अनंत आहे आणि पृथ्वीहीविपुल आहे, तेव्हा माझ्या जातोचा असा कोणी निदान भविष्यात तरी निघावा एवढीच आशा आहे :— ही कलावंतांची योडयाफार फरकाने केलेली प्रातिनिधिक तक्रार असं समजायला हरकत नाही ! कलानिर्मिती आणि आस्वादाच्या प्रांतात शिरणं म्हणजे अनेक कडु-गोड शल्य आणि व्यथा हौशीनं स्वीकारणं ! प्रत्येक कलाप्रकारातल्या आणि कलाकाराच्या शल्याची जात निराळी; पण शल्य असणं मात्र सार्वत्रिक !

नुकताच 'ग्रंथाली' तर्फे एक कार्यक्रम झाला. त्यात कथाकारांनी आपल्या व्यथांना वाट करून दिली होती. त्या वेळी या सार्वत्रिक कलावंताच्या दुःखाची अगदी प्रकर्षानं आठवण झाली.

या दशकातल्या किंवा खास करून अगदी सध्याच्या काळातल्या कथाकारांची दुःखं दोन प्रकारची. एक साहित्यिक म्हणून, दुसरं कथाकार म्हणून. ( साहित्यिक आणि कथाकार या दोन निराळ्या गोष्टी आहेत असं काही यातून सुचवायचं नाही ! कथाकार म्हणून येणाऱ्या अडचणी याचा अर्थ कथा हा साहित्यप्रकार हाताळताना येणाऱ्या अडचणी. )

कथा या साहित्यप्रकाराची लोकप्रियता कमी होते आहे का? त्यामुळे तिच्या मागणीवर काही परिणाम होतो आहे का ? फुटकळ कथालेखनाचं ठीक आहे; पण कथासंग्रहाची मागणी, त्यातही कादंबरीच्या तुलनेनं कमी होते आहे का ? आणि त्यामुळे कथासंग्रह प्रकाशित करणं आर्थिकदृष्ट्या कठीण होत आहे का ? या गोष्टीचा दर्जेदार कथालेखनावर काही परिणाम होतो आहे का ?

एकमेकांशी संबद्ध अशा आणि त्यातही व्यावहारिक स्वरूपाच्या प्रश्नांचा हा एक संच झाला. बहुतेक कथाकार वक्त्यांना हे प्रश्न बरेच सतावत होते आणि त्यांच्यावर उलटसुलट चर्चा पुष्कळ झाली. यांबरोबरच कथाप्रकार हाताळताना येणाऱ्या अडचणी, चांगल्या कथावाङ्मयाचे निकष, पूर्वीचे आणि आजचे कथाकार, कथा आणि कथाकारांचं व्यक्तिमत्त्व अशासारख्या साहित्य—समीक्षाविषयक प्रश्नांचीही चर्चा झाली? परंतु दोन वक्ते वगळता त्याबाबतकोणी भरीव मुद्दे मांडले नाहीत.

कथाकाराला येणारी प्रमुख अडचण कोणती असेल, तर कोपऱ्यात टाकलं जाण्याची धास्ती, दुर्लक्ष होईल काय ही भीती. कथा प्रसिद्धीला येण्याचे मार्ग तीन दैनिकं, मासिकं आणि दिवाळी अंक. या तीन्हींनाही काही ना काही तरी मर्यादा आहे. दैनिकात येणाऱ्या मजकुराला शब्दसंख्येचं बंधन असतं आणि त्याला अल्पजीवित्व असतं. मासिकांचं प्रसारण आणि वाचकवर्ग मर्यादित असतो आणि दिवाळी अंकासारख्या मासिकांमध्ये मजकुराची एवढी भाऊगर्दी असते आणि लेखकावरही एवढा ताण असतो को, कथेच्या गुणवत्तेकडं लक्ष देणं कठिणच.

म्हणजे कथा वाचकापर्यंत पोचण्याचे हे सर्व मार्ग अशा गंभीर रीतीनं अधू बनले आहेत. तेव्हा ठरलेला मार्ग म्हणजे कथा संग्रहित स्वरूपात वाचकाच्या हातात देणं आणि इथेच तर खरी मेख आहे. अनिल डांग्यांनी आपल्या भाषणत म्हटल्याप्रमाणे कथा लिहिल्या—वाचल्या जाव्यात, छापल्या जाव्यात आणि संग्रहित व्हाव्यात, या मूळ गृहीतकृत्यावर सर्वांचं एकमत होईल; पण हे असं होत नाही हेही खरं आहे. वक्त्यांपैकी काही अपवाद वगळता सर्व लेखकांनी हीच तक्रार मांडली की, प्रकाशक सांगतात, कथा संग्रहाला मागणी नाही. कादंबऱ्या लिहा. त्यांना खप आहे आणि ही एक प्रातिनिधिक समजूत आहे.

आता ही समजूत कुणी ठरवली ? लक्ष्मण लोंढे विचारतात, एखाद्या गोष्टीची मागणी ठरवताना बाजाराची पाहणी केली जाते, मागणीचं विश्लेषण, अभ्यास केला जातो. असा काही मार्केट सर्वे कथा कादंबऱ्यांच्या बाबतीत प्रकाशकांनी केला आहे काय ? प्रकाशक छापू इच्छित नाहीत, वाचक वाचू इच्छित नाहीत, यामध्ये मूळ उदासीनता कोणाची ?

आणि जर कथासंग्रह वाचण्यात वाचकाची उदासीनता आहे असं मानलं, तर तिचं कारण काय ? काही वक्त्यांनी याला आपल्या परीनं उत्तर देण्याचा प्रयत्न केला. पैकी हरिश्चंद्र थोरात यांनी असं म्हटलं की, आज कथा वाङ्मयाचा दबदबा नाही. कथावाङ्मयामध्ये वाचण्यासारखं कोणी लिहीत नाही. उदाहरणार्थ, गौरी देशपांडे 'अॅनिमिक' कथा लिहितात. त्यामुळे साहजिकत्या कोणी वाचत नाही. दुसरं म्हणजे साहित्यातला सध्याचा जोमदार प्रवाह दलितांचा. दलित लेखक कथावाङ्मयाकडे वळत नाहीत. त्यामुळे कथावाङ्मयात काही भरीव घडत नाही.

तर गोविंद नारायण मुसळे यांनी आपल्या घणाघाती भाषणात असं म्हटलं की, कोण म्हणतो कथांना मागणी नाही आणि प्रकाशक कथासंग्रह छापू इच्छित नाहीत ? वाचण्यासारखं लिहिलं तर त्याला भरपूर मागणी आहे. उदाहरणार्थ माझे अमुक इतके कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. वाचक कथा वाचत नसतील, तर त्याचं कारण म्हणजे ते कथा वाचू इच्छित नाहीत आणि त्या त्यांना कळत नाहीत आणि अशा न कळणाऱ्या कथा लिहिणं यासाठी लेखकांना स्वतःलाच दोष द्यावा लागेल. या लेखकांच्या कथांमधून सूचकता पराकोटीला पोचलेली असते आणि तिच्या अवगुंठनातून खरा, अभिप्रेत अर्थ जाणून घ्यायला कष्ट पडतात. उदाहरणार्थ, विलास सारंग यांची एक कथा मला कळली नाही. मग मी एका प्राध्यापकांकडे गेलो, ही समजावून द्या म्हणून (प्राध्यापक असण्याव्यतिरिक्त त्यांचं क्वालिफिकेशन म्हणजे ते सत्यकथेचे वर्गणीदार होते; ) पण त्यांनाही ती समजली नव्हती. म्हणजे पहा. आता

कोण वाचेल असं काही ! किंबहुना सत्यकथा बंद पडली, त्याचं कारणही हेच आहे. त्यात काही लेखक कळणाऱ्या कथा लिहायचे आणि काही न कळणाऱ्या. पैकी दुसऱ्या जमातीतल्या लेखकांमुळे सत्यकथा बंद पडली. तेव्हा लेखकांनो, लिहा; काळाच्या पुढे जाऊनही लिहा; पण इतके पुढे जाऊ नका की तुम्ही काळाच्या, समकालिनांच्या नजरेआड व्हाल कारण नाही तर तुम्हाला नक्कीच एकटं पडावं लागेल.

आज सर्वसामान्य वाचकाच्या जीवनात ताण, चिंता, दुःख असंच सारं काही आहे. हे सारं त्याला साहित्यातूनही परत वाचावं लागलं तर त्याला ते कसं आवडेल ? त्याला साहित्यातून काय पाहिजे असेल तर ते अशा दुःखद वास्तवापासून दूर जाणं, स्वप्नरंजन. त्याचा ताण कमी करण्यासाठी काही तरी उपाय. तो साहित्यानं द्यावा तरच वाचक त्याचे स्वागत करेल.

गोविंद नारायण मुसळे यांनी आपल्या भाषणात कथाकारांना धीर देताना असंही म्हटलं की ,प्रयत्न करा. कादंबरीला मागणी आहे ना ?तर मग तुम्हीही कादंबरी लिहा. प्रयत्नांनी तुम्हाला ते नक्कीच जमेल.

गोविंद नारायण मुसळे यांचं भाषण आणि त्यामागच्या समजुती या इतक्या उघडपणे भयंकर आहेत, चुकीच्या आहेत आणि प्राथमिक दर्जाच्या आहेत की, गांभीर्यानं विचार करून त्यांचं खंडन करावं अशी सुजाण वाचकांसाठी जरुरी नाही. रुचेल, पचेल तितपत लिहा. मागणी तसा पुरवठा करा, चार घटका करमणूक करणारं हलकं फुलकं लिहा. काळाच्या पुढे जाऊ नका. सोपे सोपे विचार, सोप्याशा पद्धतीनं मांडून चमच्यानं वाचकांना भरवा, असं जर सर्व लेखकांनी आपलं धोरण ठरवलं, तर लवकरच साहित्यात काही वाचनीय शिल्लक राहील की नाही याची शंकाच आहे.

## शहाणपणाचा सूर

मुसळ्यांच्या या विधानांना ज्ञानेश्वर नाडकर्णी आणि श्री. दा. पानवलकर यांच्या भाषणात उत्तरं मिळाली. या दोघांनीही सकस कथालेखनाविषयी भरीव विचार मांडले. नाडकर्णी म्हणतात, ' मला माझा वाचक कोण वगैरे काही माहीत नाही किंवा वाचकांकडून खुषी-पत्रं येण्या न येण्याचीही मी फारशी पर्वा करत नाही. मी संपादकांसाठी किंवा प्रकाशकासाठी लिहीत नाही. मग मी कुणासाठी लिहितो ?तर माझ्यासाठी, मला वाटतं म्हणून. मला जीवनाचं गूढ अजून उकललं नाही म्हणून मी लिहितो, त्याविषयी विचार करतो. यासाठी लागणारी प्रतिभा, अनुभवविश्व हे सर्व मला माझ्या डोक्यातून मिळतं. मी त्या लेखनावर कष्ट करतो. लेखनकामासाठी करतो. मी काही बहुजनहिताय, बहुजनसुखाय वगैरे लिहू शकणार नाही. माझ्या अनुभव विश्वातल्या गोष्टी त्याच माझ्या लेखनात उतरतील. सर्वांपर्यंत पोचावं म्हणून कराकरा मांडी खाजवणारी ग्रामीण माणसं माझ्या कथांत शिरणार नाहीत कारण तो माझ्या अनुभवाचा भाग नव्हे.

आता सोपं लिहिणं किंवा कठीण कथेवर व्यापक टीका टिप्पणी जोडणं हा काय प्रकार आहे ? एखादं चित्र कठीण आहे, तर चित्रकारानं चित्र न लावता फक्त छापील दोनतीन पानं टीका-टिप्पणीच तिथे लावावी का ? सोपंच लिहायचं झालं, तर कथा न लिहिता त्याचा बाळबोध अर्थ काढणारं सुगम भाष्यच का लिहू नये ?

नाडकर्णींच्या बोलण्यातून महत्त्वाचा मुद्दा जाणवला तो हा की, सोपं आणि कठीण वगैरे भेद कठीण आहेत. कारण प्रत्येक अनुभवाबरोबर त्याचा एक घाट येतो आणि त्या स्वरूपातच लेखकानं त्याची कल्पना केलेली असते. या घाटामध्ये ढवळाढवळ करणं, म्हणजे त्या विशिष्ट कथेचं ते वैशिष्ट्य हरवून टाकणं.

असाच मुद्दा श्री. दा. पानवलकरांच्या भाषणातून पुढे आला. अनेक कथा या त्या विशिष्ट घाटातच लिहिल्या जायला हव्यात किंवा लेखकांनी मुद्दाम तसे कष्ट त्यामागे केले आहेत. या सर्वांना सोपं लिहा वगैरे सांगणं म्हणजे त्यांच्या प्रयत्नांवर बोळा फिरवणं. एखादी गोष्ट समजत नसेल, तर तुमची ती पात्रता नव्हे असं समजा. आपल्याला आणि आपल्या कथेला एवढं स्वस्त करून टाकू नका.

सकस कथेचा उगम हा लेखकाच्या समृद्ध व्यक्तिमत्त्वातूनच होत असतो लेखकानं बारकाईनं केलेला अभ्यास, वाचन, लेखनातले परिश्रम हे चांगल्या लेखनासाठी आवश्यक आहे माणसांची अनुभवविश्वं तोकडी रहातात. कारण ती जाणून घेण्याचा प्रयत्न करत नाहीत, डोळसपणे जगत नाहीत, परिश्रम घेत नाहीत. हा माझा प्रांत नाही, तो माझा विषय नाही असं म्हणणं हा करंटेपणा झाला. ज्याला डोळसपणे जगायचं आहे, त्याला असं म्हणता येणार नाही. तेव्हा छापणं, लिहिणं हे निकष नव्हेत. कोणीही साक्षर लिहू शकतो आणि लिहिलेलं सर्व छापलं जाऊ शकतं. तेव्हा आपल्या लेखनाला दर्जा हा आपण आपल्या परिश्रमानं द्यायचा असतो.

नाडकर्णी आणि पानवलकरांच्या भाषणानं कार्यक्रमाला एक उचित असा शहाणपणाचा सूर मिळाला. लेखकाची तपश्चर्या आणि सांगण्यासारखं आपल्याकडे काही तरी आहे यावरचा त्याचा विश्वास हे मुद्दे त्यांनी ठळक केले. आणखीही काही चांगले मुद्दे, काही विचार करण्यासारखे मुद्दे मांडले गेले. प्र. ना. परांजपे म्हणतात, आज कथालेखनाची व्याख्या बदलली असावी. कथा, आत्मवृत्त, आत्मानुभवलेखन वगैरे सर्व वाङ्मयप्रकारांची आज सरमिसळ झाली आहे आणि त्या सर्वांचा विचार केला, तर कथावाङ्मयही विपुल आहे, दर्जेदार आहे असं म्हणता येईल. काहींचं म्हणणं असं दिसलं की, जी. ए. कुलकर्णींनी कथाविश्व झाकोळून टाकलं आहे. त्यामुळे कुणाला काही नवं, चांगलं लिहिण्याचा धीर होत नाही ! एका लेखकानं अशी तक्रार केली की, पोटापाण्यामागे लागलेल्या आम्हाला फुरसत, झोकून द्यायला वेळ मिळणं कठीण असतं व नवेनवे अनुभव मिळवणं कठीण जातं आणि या उद्योगात मानसिक शक्तीही फार जाते.

कथासंग्रह छापले न जाणं या कथाकारांच्या मूळ व्यथेकडे परत जायचं झालं, तर त्याचं काय उत्तर सापडतं ? किंवा वेगळ्या शब्दांत मांडायचं, तर काही सन्माननीय अपवाद वगळता जबरदस्त कथाकार का नसावेत ? याला एक उत्तर असं देता येईल की, जीवनात समरसून असणाऱ्या लेखकाच्या विविध पातळीवरच्या आणि गुंतागुंतीच्या अनुभवांसाठी कथा, त्यातही लघुकथा हा प्रकार अपुरा वाटण्याची शक्यता आहे. तसं हेही संपूर्ण सत्य नव्हे, कारण व्यामिश्र अनुभवही टोकदार, नेमके मांडणाऱ्या आणि जीवनाचा तेवढाच तीव्रतेनं ठाव घेणाऱ्या चांगल्या लघुकथाही आपल्या परिचयाच्या आहेत.

तेव्हा दुसरं स्पष्टीकरण म्हणजे याबाबत लेखकानं स्वतःच घेतलेला निर्णय आणि त्याला भावणारा आणि म्हणून त्यानं निवडलेला साहित्यप्रकार किंवा त्या त्या काळामध्ये प्रचलित होणारा साहित्यप्रकार. यामागे काही तार्किक कारण असेलच असं नाही.

शेवटी एका विशिष्ट मर्यादेपलीकडे कथा, कादंबरी, कविता, नाटक वगैरे सर्व भेद वरवरचे ठरतात आणि महत्त्वाचा असतो तो सकस अनुभव आणि त्याची सुयोग्य अशा पद्धतीनं मांडणी, मग ती कोणत्याही वाङ्मयप्रकारात असो.

—ललिता बर्वे



## ह्या ना त्या निमित्ताने

# देशी बर्टन व देशी लिझ् टेलर

फिरोझ रानडे

लग्नाचा मुहूर्त वगैरे गोष्टी निघाल्या की श्यामला आपल्या धाकटया बहिणीच्या लग्नाची आठवण येते.

आता त्या गोष्टीला चांगली ३०–३२ वर्षे झाली असतील. लग्नमंडपात लग्नघाईत सगळया गोष्टी चालू होत्या. श्यामच्या बहिणीच्या व भावी मेव्हण्याच्या मध्ये आंतरपाट धरला होता. भटजीमंडळी कमीत कमी कर्कश आवाज काढण्याचा प्रयत्न करून मंगलाष्टकं म्हणत होती.

सकाळचा ९–१२ चा सु-मुहूर्त होता. आता सगळयांच्या घडयाळांत ९–१२ वाजायला आले होते; पण भटजी बुवांचे घटकापात्र अजुनी चांगलेच वर तरंगत होते. झाले, ९–१२ झाले, १३ झाले, १४ झाले पण घटकापात्र काही डुबायला तयार नव्हते. आता काय करावयाचे ? सेकंदकाटा धावत होता त्याची मिनिटे होणार होती.

श्याम व त्याचा भाऊ मोठे हवालदिल झाले. घडयाळाप्रमाणे मुहूर्त टळत होता व घटकापात्राप्रमाणे तो अजून यावयाचा होता. आता हे साधावे कसे ? श्यामचा भाऊ तसा थोडा चिडकाच; तो चिडचिडून म्हणाला, ‘चायला, ढकला की ते पात्र आत !’

त्या चायलाप्रमाणे भटजींनी पात्र आत ढकलले. लगेच आंतर–पाट दूर झाला. वधूवरांनी एकमेकांना हार घातले. वाजंत्री–बँडवाल्यांनी आवाजाचा मोठा भडका उडवून दिला.

आता श्यामच्या बहिणीचे लग्न लागले ती घटिका शुभ होती की नाही कुणास ठाऊक पण तिचा संसार मोठा उमदा झाला. ती स्वत: खूप शिकून ॲडव्होकेट झाली, नवरा मोठा अंमलदार झाला, मुलगी डॉक्टर होऊन अमेरिकेत स्थायिक झाली, मुलगा इंजिनियर झाला वगैरे वगैरे.

वर म्हटल्याप्रमाणे आता हृया गोष्टीला चांगली ३०–३२ वर्षे होऊन गेली आहेत. आताच्या लोकांचा मुहूर्तावर वगैरे विश्वास असण्यापेक्षा रविवारी हॉल मिळण्यावर जास्त असतो. घटकापात्र म्हणजे काय असते ते आता एखाद्या राजा केळकर संग्रहालयातच पहायला मिळेल !

पण ही झाली श्याम व तत्सम सर्वसामान्य माणसांच्या कुटुंबातल्या लग्नाची गोष्ट. थोरा–मोठयांच्या लग्नाचा, त्यांनी गाठलेल्या मुहूर्ताचा अजूनही गौरव होतो, वर्तमानपत्रात त्याला प्रसिद्धी मिळते. भरपूर कौतुक होते.

परवा असेच दिल्लीला एका गाजलेल्या लग्नाचा मुहूर्त साधला गेल्याबाबतची मोठी कौतुकाची बातमी सर्व वर्तमानपत्रांत झळाळून गेली होती.

ते लग्न म्हणा, सलोखा म्हणा, फार नावाजलेल्या दोन कुटुंबांत होता. त्यामुळे त्याला योग्य प्रसिद्धी मिळणे सहाजिकच होते. आता वराचे हे काही पहिले लग्न नव्हते, तसेच वधूचे पण हे काही पहिले लग्न नव्हते. किंबहुना त्यांचे पूर्वी एकदा आपसात लग्न होऊन त्यांनी तलाक पण घेतला होता; पण मोठया लोकांच्या बाबतीत हृया गोष्टी फार गौण असतात.

आता आपल्या रिचर्ड बर्टन व लिझ टेलरच्या लग्नांचे बघा ना. डझनांनी त्यांची लग्ने झाली आहेत व अर्थात तेवढेच डझन तलाकही झाले आहेत. रिचर्डने वेगवेगळया बायकांशी तर लग्नं केली होतीच; पण खुद्द लिझ टेलरशीच मुळी त्याचे दोनदा का चारदा लग्न व तलाक झाले होते !

पण म्हणून उद्या रिचर्डने वा लिझने परत एकदा लग्न केले तर त्यांचे कौतुक होणार नाही म्हणता? नाव नको ! उलट त्यांचे लग्न कुठे झाले, कोणत्या मुहूर्तावर झाले, त्यानंतर ते पन्नास साठीचे जोडपे मधुचंद्राला कुठे जाणार आहे हृयाची अगदी रसभरित वर्णने वर्तमानपत्रात अगदी छायाचित्रांसह–म्हणजे फक्त लग्नाची छायाचित्रे, मधु-चंद्राची नाहीत हो–रकानेच्या रकाने भरून येतील व ते सहाजिकच आहे. बर्टन आणि टेलर ही नाही म्हटलं तरी बडी नावे आहेत !

दिल्लीला परवा झालेल्या लग्नाची ही गोष्ट अशीच बर्टन-टेलरपद्धतीची आहे. वर चांगला साठीला आलेला व वधू पण तशीच चाळीस-पंचेचाळीसची. वराची पुष्कळ लग्ने व तलाक झालेले तर वधूचीही पुष्कळ लग्ने व तलाक झालेले !

एवढेच नव्हे तर पूर्वी हृयाच जोडप्याचे एकदा लग्न व एकदा तलाक झालेला होता व तो तलाकसुद्धा काही कमी हुंडा देण्यावरून वा स्कुटर दिली नाही म्हणून नाही तर वधूच्या पूर्वीच्या प्रियकराच्या भानगडी होत्या म्हणून !

त्या वधूचा पूर्वीचा प्रियकर होता. आता लग्नानंतर नवऱ्याची साधारणपणे असते तशीच अपेक्षा होती. ती म्हणजे वधूने आता पूर्वीचे संबंध विसरून जावेत. बायकोची दोन ठिकाणी भक्ती वा प्रेम कोणता भारतीय चालवून घेईल ?

पण वधू वस्ताद ! ती आपल्या पूर्वीच्या प्रियकराचे संबंध तोडायला तयार नव्हती. शेवटी व्हावयाचे तेच झाले. त्या संसाराचे बारा वाजले !

आता त्याच जोडप्याचे परत लग्न लागले होते. मागल्या वेळी कदाचित सुमुहूर्त गाठला गेला नसल्याने संसाराचे बारा वाजले असावेत म्हणून हृया वेळी ज्योतिषाने पावणेबाराचा मुहूर्त काढला होता. त्याचे मोठया कसोशीने पालन करण्यात आले होते. त्याच्या-

करता मोठी धावपळ करावी लागली होती; पण एवढे करून मूहूर्त गाठला गेला होता व त्याचे वर्तमानपत्रांतून यथोचित कौतुक पण झाले होते.

हे सगळे मूहूर्त व लग्नकौतुक वाचून श्यामला फार आनंद व समाधान वाटले होते.

हृयाचे कारण तो त्या वधु-वरपक्षाचा काही जवळचा नातेवाईक होता म्हणून नाही. जवळचा कोठला ? तो लांबचासुद्धा नातेवाईक नव्हता. त्याचे आनंदाचे कारण एकच होते ते म्हणजे हिंदुस्थानातल्या दोन बलाढ्य पक्षांचे–लोकदलाचे व भाजपचे ते लग्न होते, मिलाप होता व त्या लग्नाकरता ज्योतिषांनी काढून दिलेली पावणेबाराची वेळ व मूहूर्त साधला गेला होता !

आता हृया लग्नामुळे श्यामला जसा आनंद वाटला तसे समाधान वाटणेही योग्यच होते.

आता हे पक्ष काही प्रथम एकत्र येत होते असे नाही. पूर्वी म्हणजे ६०–६५ साली काही प्रांतांतून हृयांची युती झाली होती. लग्ने झाली होती; पण ती बर्टन टेलर नमुन्याप्रमाणे दोन–अडीच वर्षांपेक्षा जास्त टिकली नव्हती.

त्यानंतर ज्या वेळी जनता पक्ष स्थापन झाला त्या वेळीही हे दोन पक्ष एकत्र येऊन महात्मा गांधींच्या समाधीसमोर शपथ घेते झाले होते; पण अशी शपथ 'नातिचरामि' लग्नाचे वेळी सगळेच घेत असतात व वर मोकळेपणाने चरायला मोकळे होतात !

त्या वेळी त्याच लोकदलातल्या काही 'मधू'ना हे सुखाचे लग्न पहावले नाही. त्यांनी जन–संघाशी प्रेमाचे व आपुलकीचे संबंध आहेत म्हणून झोड उठवली. दोन ठिकाणी श्रद्धा कशी राहू शकते ? असा प्रश्न उपस्थित केला व शेवटी जनता पक्ष बुडाला व त्या कासवावर बसलेले जनता सरकारही बुडाले !

मग जनतापक्ष का बुडाला त्याचा खल होऊ लागला. मोठाले विद्वान प्राध्यापक व नावाजलेले डॉक्टर्स त्यावर निबंधच्या निबंध लिहून गेले. कोणी त्या वेगवेगळ्या पक्षांची संस्कृतीच वेगळी होती हे कारण दिले होते. कोणी त्या पक्षांची जडण–घडण वेगळी वेगळी होती म्हणून हा पक्ष फुटला असे प्रतिपादन केले होते. कोणी हे पक्ष फक्त निवडणूक जिंकण्याच्या स्वार्थी हेतूने एकत्र आले होते म्हणून हे असे झाले होते असे म्हटले होते.

हे सगळे निबंध–प्रबंध वाचून श्यामला खूप हसू येत असे. हिंदुस्थानात इतका Rational विचार करून कसे चालेल असे त्याचे म्हणणे.

जनता पक्ष बुडाला त्याचे कारण त्याची स्थापना ज्योतिषाने काढून दिलेल्या मुहुर्तावर झाली नसावी किंवा विरोधी पक्षाने त्यांच्यावर जादूटोणा केला असावा वा काही मांत्रिक आणून त्यांच्याकडून जनता पक्षाची शकले उडतील अशी पूजाअर्चा करवली असावी इतका साधा व हिंदी विचार हृया विचारवंतांच्या मनाला शिवत कसा नाही ? हृयाचे त्याला राहून राहून आश्चर्य वाटे.

हृया वेळी भाजपच्या व लोकदलाच्या पुढाऱ्यांना हृया प्रश्नातली गोम कळली होती. प्रथम करावयाची गोष्ट म्हणजे हृया पक्ष–जमाईकरता योग्य मूहूर्त काढून घ्यावयाचा व तो कसोशीने पाळावयाचा.

ते तर आता झाले होते. आता लोकदल–भाजप युती पक्की होणारच; पण त्याचे सरकारही सत्तेवर येणार व ते पूर्वीसारखे दोन–अडीच वर्षें रहाणार नाही तर वर्षांनुवर्षं राहील ! फक्त एक करायला पाहिजे ते म्हणजे सगळ्या गोष्टी अगदी ज्योतिषाला विचारून व मूहूर्त काढून त्याप्रमाणे करायला पाहिजेत.

ते हे दोन्ही पक्ष करतील हे त्यांनी पावणेबाराचा मूहूर्त साधला त्यावरून स्पष्ट दिसतेच आहे. □




निश्चयाचा महामेरू ।
बहुत जनांसी आधारू
अखंड स्थितीचा निर्धारू
श्रीमंत योगी ।।

श्रीमंत योगी

(शिवछत्रपतींची चरित-कहाणी)

स्वामीकार रणजित देसाई यांची
सर्वोत्कृष्ट कलाकृती

पृष्ठे डेमी १०००
मूळ किंमत रु. १५०/–
सवलतीत रु. ५०/–
नोंदणीची अखेरची मुदत
१५ सप्टेंबर १९८३
प्रसिद्धी ५ नोव्हेंबर १९८३

प्रमुख पुस्तक विक्रेत्यांकडे
नोंदणी चालू

अजब पुस्तकालय,
कोल्हापूर २.
मेहता पब्लिशिंग हाऊस,
पुणे ३०.

## भाजप–लोकदल आघाडी

# उत्तर भारतात इंदिरा गांधींना जबरदस्त आव्हान !

अभय गोखले

भारतीय जनता पक्ष व लोकदल यांनी 'राष्ट्रीय लोकशाही आघाडीची' स्थापना केली आहे. गेले काही दिवस लोकदलाचे अध्यक्ष चरणसिंग अशी आघाडी करण्यासाठी प्रथम जगजीवनराम यांच्या पक्षाशी बोलणी करत होते; परंतु काही कारणाने (बहुधा या आघाडीचे अध्यक्ष कोणी व्हावे या कारणावरून) चरणसिंग व जगजीवनराम यांचे फिसकटले व चरणसिंग तडकाफडकी भारतीय जनता पक्षाशी आघाडी करून मोकळे झाले व सर्वांनाच त्यांनी आश्चर्याचा धक्का दिला. या दोघांची सध्या तरी आघाडीच रहाणार आहे. विलिनीकरणाचा प्रश्नच उद्भवत नाही असे भाजपचे नेते वारंवार सांगत आहेत. अर्थात भाजप व लोकदल यांचा हा पहिलाच विवाह नव्हे. अगदी मागे वळून पाहिल्यास १९६७ साली चरणसिंगांच्या भारतीय क्रांतिदलाबरोबर (लोकदलाची जुनी आवृत्ती) त्या वेळच्या जनसंघाने जवळीक करून उत्तरप्रदेशात राज्य केले होते; परंतु काही काळाने त्यांचे बिनसले. आतापर्यंत जनसंघ (भाजप) व लोकदल (चरणसिंग म्हणजेच लोकदल) यांचे बरेच वेळा ऐक्य झाले व बिनसले ते चरणसिंगांच्या हेकट स्वभावामुळेच; परंतु एक गोष्ट येथे लक्षात घ्यावयास हवी की, चरणसिंग व जनसंघ (भाजप) हे काही वेळा भांडणे होऊनही परत एकत्र येऊ लागले, याचे कारण चरणसिंग एक तर मोठे संधिसाधू आहेत, सत्ता मिळविण्याकरिता ते कोणताही विधिनिषेध बाळगत नाहीत आणि दुसरे म्हणजे समाजवाद्यांप्रमाणे ते जनसंघाचे कट्टर टीकाकार व द्वेष्टे कधीच नव्हते.

१९७१ साली परत बड्या आघाडीत चरणसिंगांचा भाक्रांद व जनसंघ होते; परंतु या बड्या आघाडीचा इतका फज्जा उडाला की, त्यापुढे आघाडीचे राजकारण करण्याचा विचारही मनात आणण्यास विरोधी पक्ष घाबरत असत. त्यानंतर १९७५ मध्ये आणीबाणीमुळे सर्व विरोधी पक्ष एकत्र येण्याची प्रक्रिया सुरू झाली. दरम्यान चरणसिंगांनी इतर सटरफटर पक्ष (राजनारायण यांचा पक्ष, त्याचप्रमाणे स्वतंत्र पक्ष) एकत्र करून भारतीय लोकदलाची स्थापना केली होती. १९७७ मध्ये जनता पक्षाची स्थापना झाल्यावर चरणसिंगांचा भारतीय लोकदल व जनसंघ परत त्यात एकत्र आले. जनता पक्ष केंद्रात सत्तेवर आल्यावर त्यामध्ये जनसंघ व भालोदच्या खासदारांची संख्या सर्वांत जास्त होती. तेव्हा पंतप्रधान होण्यासाठी चरणसिंगांनी जनसंघाला आपल्याकडे खेचण्यास सुरुवात केली; पण जेव्हा मोरारजी देसाई, चरणसिंग व जगजीवनराम यांच्यातून नेता निवडण्याचा प्रश्न आला तेव्हा जयप्रकाश नारायण यांनी मोरारजी देसाई यांच्या बाजूने कौल दिल्याने व मोरारजी आणि जगजीवनराम यांच्यात चरणसिंगांनी जगजीवनराम यांना विरोध दर्शविल्याने मोरारजींचा मार्ग मोकळा झाला व पंतप्रधान होण्याची कित्येक वर्षांची त्यांची (मोरारजींची) ईर्षा पुरी झाली; परंतु तशीच ईर्षा (जबरदस्त) बाळगणारे चरणसिंग मात्र अतृप्त राहिले व जनता पक्षाच्या पाडावास त्यांची पंतप्रधानकीची लालसाच पुढे कारणीभूत झाली. १९७७ च्या लोकसभा–निवडणुकांत जागावाटपाच्या बाबतीत जनता पक्षातील भालोद व जनसंघ हे घटक संपूर्ण उत्तर भारतात तिकिटवाटपाच्या बाबतीत सामंजस्याने वागले. या दोन्ही घटकांचे मिळून खासदार जनता पक्षात निम्म्याहून अधिक होते. सुरुवातीला जनसंघ-घटक मोरारजींच्या बाजूला झुकलेला असला तरी तो चरणसिंगांच्या विरोधात नव्हता. मोरारजींचा हेकट स्वभाव व चरणसिंगांचा आडमुठपणा यांच्यात सांगड घालण्याचे काम करताना जनसंघाच्या नेत्यांना त्या दोघांबद्दल वरूनवरून प्रेम दाखवावे लागे. जनता पक्ष फुटू नये व इंदिरा गांधींना संधी मिळू नये म्हणून जनता पक्षातील जनसंघ घटकाने वेळप्रसंगी स्वतःकडे कमीपणा घेऊन जे प्रयत्न केले त्याला तोड सापडणार नाही ! जनता पक्ष दोन–अडीच वर्षे सत्तेवर राहिला त्याचे श्रेय चंद्रशेखर यांच्यासारख्या नेत्यांबरोबरच जनसंघाकडेही जाते. जागा–वाटपाच्या बाबतीत विधानसभेच्या निवडणुकात तर जनसंघ व भालोद हे घटक आणखी जवळ आले. संपूर्ण उत्तर भारत या दोघांनी जास्तीत जास्त प्रमाणात आपल्या दोघात वाटून घेतला. नंतर मग उत्तर भारतात जनता पक्षाने विधानसभा–निवडणुकांत नेत्रदीपक यश संपादन केल्यावर त्या त्या राज्यात मुख्यमंत्री निवडतानाही या दोन घटकांनी जवळीक करून मुख्यमंत्रीपद व इतर महत्त्वाची मंत्रीपदे आपापसात वाटून घेतली व संघटना काँग्रेस आणि समाजवादी या इतर घटकांना बघत ठेवले. मोरारजींनी राज्यपालांची नियुक्ती करताना संघटना काँग्रेसच्या लोकांचाच विचार केल्याने भालोदप्रमाणे जनसंघही त्यांच्यावर नाराज होता हे एक कारण होतेच.

मुख्यमंत्रीपदाच्या वाटपात उत्तर प्रदेश ( रामनरेश यादव ), बिहार (कर्पुरी ठाकूर) व हरयाणा (देवीलाल), शिवाय ओरिसा (बिजू पटनायक) हे लोकदलाचे नेते यशस्वी झाले ते जनसंघाच्या पाठिंब्यानेच. जनसंघाच्या पाठिंब्याशिवाय, विशेषतः उत्तर प्रदेश, बिहार, हरयाणात भालोदचे नेते मुख्यमंत्रीपदी विराजमान होऊच शकले नसते ! या राज्यांत जनसंघाचे आमदार लोकदलाच्या जवळजवळ बरोबरीने निवडून आले होते. मग दुसऱ्या क्रमांकाचे पद

या राज्यात जनसंघाला देण्यात आले. उरलेल्या उत्तर भारतात, हिमाचलप्रदेशात जनसंघाचे शांताकुमार, मध्यप्रदेशात कैलास जोशी व राजस्थानात भैरवसिंग शेखावत हे सर्व जनसंघाचे नेते मुख्यमंत्रीपदी विराजमान झाले. शिवाय दिल्ली मेट्रॉपॉलिटन कौन्सिलमध्येही मुख्यकार्यकारी पार्षद म्हणून जनसंघाचे केदारनाथ सहानी विराजमान झाले. या राज्यात दुसरे पद लोकदलाच्या माणसांना मिळाले. अशा प्रकारे सत्तेची वाटणी करून घेतल्यावर या दोन्ही घटकांचे चांगले चालले होते. त्यात खोडा घातला लोकदलाच्या राजनारायण यांनी. आर. एस. एस.विरुद्ध सतत वक्तव्ये करून त्यांनी जनसंघाच्या लोकांना बिथरवले. जनसंघवाले त्यामुळे आणखी दृढतेने मोरारजींच्या बाजूने उभे राहिले. चरणसिंगांचा, पंतप्रधानपदाच्या स्पर्धेत जनसंघाने आपल्याला पाठिंबा न दिल्याने जनसंघावर राग होताच; परंतु ते जनसंघाबद्दल आशा बाळगून होते. त्यानंतर काही बेजबाबदार वक्तव्यांवरून मोरारजींनी चरणसिंगांचा राजीनामा मागितला. नंतर मग चरणसिंग व राजनारायण यांच्या जनता पक्षविरोधी कारवायांना ऊत आला. या वेळेसही जनसंघाच्या नेत्यांनी मध्यस्थाची भूमिका पत्करून जनता पक्षाच्या भल्याकरिता मोरारजींना, चरणसिंगांना मंत्रीमंडळात परत घ्यावयास लावले. अर्थात ही जनसंघनेत्यांनी केलेली घोडचूक होती. कारण चरणसिंग व राजनारायण यांच्या चाळघांनी ते जनता पक्षात एकाकी पडले होते. त्याचा फायदा घेणे जरुरीचे होते व मोरारजींसारख्या मुत्सद्द्याला ही गोष्ट बरोबर समजली होती. जनसंघाच्या नेत्यांनी चरणसिंगांना परत मंत्रीमंडळात घ्यावयास लावून आपण चरणसिंगविरोधी नसल्याचे दाखवून दिले होते. नंतर मग राजनारायण यांना मोकाट सोडलेले असल्याने लोकदलाच्या मुख्यमंत्र्यांना सतावण्याचे प्रकार जनसंघाने सुरू केले. प्रथम हरयाणाच्या देवीलाल यांची उचलबांगडी होऊन भजनलाल आले. उत्तर प्रदेशचे रामनरेश यादव जाऊन बनारसीदास मुख्यमंत्री झाले, तर शेवटी बिहारच्या कर्पूरी ठाकूर यांचा बळी गेला व त्यांचे जागी श्यामसुंदर दास आले. अशा प्रकारे राजनारायणप्रभृतींनी चालवलेल्या आर. एस. एस.वरील टीकेचा समाचार घेण्यात आला. याबाबतीत जनसंघाला, संघटना कॉंग्रेस व समाजवादी यांच्याबरोबरच असंतुष्ट कॉंग्रेसजनांची मदत झाली आणि वरील घटकांना त्याचा फायदाही मिळाला. संघटना कॉंग्रेसचे बनारसीदास, समाजवादी श्यामसुंदर दास व जगजीवनरामवादी भजनलाल हे मुख्यमंत्री झाले ते भालोद व जनसंघ या जनता पक्षातील घटकातील सामंजस्य संपल्यानेच. याउलट जनसंघाचे मुख्यमंत्री उखडण्यात भालोदला यश मिळाले नाही. मध्यप्रदेशात व्ही. के. सकलेचा, हिमाचलप्रदेशात शांताकुमार, राजस्थानात भैरवसिंग शेखावत व दिल्लीत केदारनाथ सहानी या जनसंघाच्या मुख्यमंत्र्यांना सतावण्याचे व त्यांचे आसन डळमळित करण्याचे प्रयत्न राजनारायण, चरणसिंग यांच्या साथीदारांनी केले; परंतु जनसंघाची स्थिती तेथे भरभक्कम असल्याने भालोदच्या पदरी निराशाच पडली !

या सर्व गोष्टींचा उद्वेग झाला त्यातच चरणसिंगांना पंतप्रधान होण्याची घाई झाल्याने आर. एस. एस. च्या प्रश्नाचे निमित्त करून जनता पक्ष फुटला, यशवंतराव चव्हाण यांनी जनता पक्ष सरकारविरुद्ध मांडलेला अविश्वासाचा प्रस्ताव हे जनता सरकार पाडण्यास निमित्त झाले. जनता पक्ष सरकार पाडण्यास राजनारायण, चरणसिंग मधू लिमये, एस. एस. मिश्रा, जॉर्ज फर्नांडिस, हेमवतीनंदन बहुगुणा, कर्पूरी ठाकूर, विजू पटनायक हे आघाडीवर होते. अर्थात यशवंतराव चव्हाणांची कॉंग्रेस, व इंदिरा कॉंग्रेस यांच्या सहकार्याशिवाय जनता सरकार खाली खेचणे वरील बंडखोरांना शक्य झाले नसते. त्यातच राष्ट्रपती संजीव रेड्डी यांनी आपल्या एके काळच्या सहकाऱ्याला (मोरारजी देसाई) सहाय्य न करता ज्या इंदिरा गांधींनी १९६९ मध्ये राष्ट्रपपतिदाच्या निवडणुकीत संजीव रेड्डींशी आयत्या वेळेस दगाबाजी करून त्यांना तोंडघशी पाडले होते त्या इंदिरा गांधींना, संजीव रेड्डींनी अप्रत्यक्षरीत्या मदतच केली. चरणसिंगांना इंदिरागांधींच्या पाठिंब्यानेच सरकार स्थापन करणे शक्य झाले होते. अशा चरणसिंगांना ते अल्पमतात असूनही संजीव रेड्डींनी मंत्रीमंडळ बनवण्यासाठी पाचारण केले व जगजीवनराम यांचा न्याय्य हक्क डावलला. अशा प्रकारे चरणसिंगांच्या जनता (एस) चे सरकार हे काळजीवाहू सरकार म्हणून काम पाहू लागले. ही चरणसिंगांना राष्ट्रपतींकडून मिळालेली एक प्रकारची भेटच होती. इथपासून जनसंघ व भालोद यांच्या दिशा बदलल्या. राजनारायण, बनारसी दास, मधू लिमये, जॉर्ज फर्नांडिस, कर्पूरी ठाकूर या कट्टर आर. एस. एस.-जनसंघ विरोधकांनी चरणसिंग वेढले गेल्याने नंतर जनता (एस) व जनसंघ जवळ येणे शक्यच नव्हते. १९८० च्या निवडणुकांत जनतापक्षात जनसंघ असूनही जनता पक्षाला लोकसभेच्या अवघ्या ३१ जागा मिळाल्या. आपल्या उत्तरप्रदेशातील भक्कम पाठिंब्याच्या जोरावर चरणसिंगांच्या जनता (एस)ने एकट्या उत्तरप्रदेशात लोकसभेच्या २९ जागा मिळवल्या व इतरत्र आणखी बारा जागा मिळवून एकंदर ४१ जागांच्या सहाय्याने लोकसभेतील तो सर्वात मोठा विरोधी पक्ष बनला. विधानसभांच्या निवडणुकांतही विरोधी पक्षांची एकी नसल्याने सर्व ठिकाणी विरोधी पक्षांचा पराभव झाला. फक्त प. बंगाल व त्रिपुरात मार्क्सवादी कम्युनिस्टांनी इंदिरा कॉंग्रेसचा अश्वमेध अडवला. हिमाचल व हरयाणात इंदिरा कॉंग्रेसने पक्षांतरे घडवून आणल्याने तेथे इंदिरा कॉंग्रेसची सरकारे स्थापन झाली व त्या राज्यांत निवडणुका घेण्याचा प्रश्नच उद्भवला नाही.

दरम्यान दुहेरी सदस्यत्वाच्या प्रश्नावरून जनसंघ जनतापक्षातून बाहेर पडला व त्यांनी भारतीय जनता पक्षाची स्थापना केली. त्याअगोदर जगजीवनराम यांनीही जनता पक्षाला रामराम ठोकला होता. जनता (एस)ही फाटाफुटीपासून मुक्त नव्हता. राजनारायण व बनारसीदास यांचे चरणसिंगांशी फिसकटले व ते बाहेर पडले. त्यानंतर बहुगुणांना इंदिरा कॉंग्रेसबद्दल नवीन साक्षात्कार झाल्याने ते जनता (एस) मधून इंदिरा कॉंग्रेसमध्ये शिरले. काही दिवसांनी त्यांना इंदिरा कॉंग्रेसमध्ये काडीचीही किंमत न दिल्याने ते इंदिरा कॉंग्रेसमधूनही बाहेर पडले. त्यांच्यापाठोपाठ चंद्रजित यादवही जनता (एस)चा त्याग करून निघून गेले. नंतर मग उरलेल्या लोकांनी जनता (एस) या नावाचा त्याग करून पूर्वीचे लोकदल हे नाव पक्षाला दिले. केरळ, हरयाणा, हिमाचलप्रदेश यांच्या निवडणुका

**दुहेरी सदस्यत्वाचा प्रश्न हे एक निमित्त**

जाहीर झाल्यावर मधू लिमये, फर्नांडिस, देवीलाल, कर्पूरी ठाकूर यांच्या विरोधास न जुमानता चरणसिगांनी हरयाणा विधानसभेच्या निवडणुकीत भाजपबरोबर समझोता केला. या निवडणुकांत हिमाचल प्रदेशात विधानसभेच्या ६८ जागांपैकी २९ जागा जिंकून भाजपने आपण सर्वांत शक्तिशाली विरोधीपक्ष असल्याचे दाखवून दिले. हरयाणात भाजप, लोकदल यांना आघाडीचा काही फारसा उपयोग झाला नाही. चरणसिंगांची पारंपारिक जाटांची मते त्यांना पडली; पण भाजपने लोकदलाबरोबर समझोता केल्याने भाजपचा पारंपारिक मतदार मध्यमवर्गीय व छोटे व्यापारी भाजपवर नाराज झाले त्यातच देवीलाल व चरणसिंगांच्यातील मतभेद वाढल्याने त्याचा निवडणुकींवर परिणाम होऊनही लोकदल–भाजप यांना विधानसभेत सर्वांत जास्त जागा मिळाल्या; परंतु हरयाणाचे राज्यपाल गणपतराव तपासे यांनी विधानसभेतील सर्वांत मोठा गट (एकच पक्ष) इंदिरा काँग्रेसचा आहे असे कारण देऊन देवीलाल यांचा न्याय्य हक्क डावलला व भजनलाल यांना मंत्रीमंडळ बनवण्यास पाचारण करून एक नवीन प्रथा सुरू केली, मग भजनलाल यांनी आपली कारागिरी दाखवून विरोधीपक्षाचे बरेच आमदार फोडून आपले आसन स्थिर केले. त्यानंतर मध्यप्रदेशात विधानसभेच्या दोन व लोकसभेच्या दोन जागांबरोबरच गुजराथमधील तीन, राजस्थान, बिहारमधील प्रत्येकी एक एक पोटनिवडणूक जिंकत भाजपने आपली विजयी दौड चालूच ठेवली. दरम्यान लोकदलाची साडेसाती अजून संपलेली नव्हती. मध्यंतरी चरणसिंगांच्या हुकूमशाही वर्तणुकीला कंटाळून देवीलाल, कर्पूरी ठाकूर, मधु लिमये, बिजू पटनायक, कुंभाराम आर्य, जॉर्ज फर्नांडिस, शरद यादव हे नेते लोकदलातून बाहेर पडले व जनता पक्षात शिरले. अशा प्रकारे पूर्वीच्या भारतीय क्रांतिदलात असलेले लोकच आता चरणसिंगांबरोबर लोकदलात राहिले, निरनिराळ्या पोटनिवडणुकांत व राज्यांच्या निवडणुकांत दारुण पराभव पत्करावा लागल्याने चरणसिंग फार निराश झाले व त्यांनी प्रथम भाजपबरोबर युती करण्याचा प्रयत्न केला. एक वेळ तर भाजपची घोडदौड पाहून आपला पक्ष भाजपमध्ये विलीन करण्याचाही विचार त्यांच्या मनात येऊन गेला; परंतु या वेळेस भाजप फॉर्मात असल्याने त्यांनी काही अशक्य अटी चरणसिंगांना घातल्या व तो प्रश्न तेथेच निकालात निघाला. नंतर मग आंध्र व कर्नाटकाच्या निवडणुकांत भाजपने चांगली कामगिरी केली. या निवडणुकांत लोकदलाची कामगिरी नगण्य होती. चरणसिंगांनी दरम्यान जगजीवनराम यांच्याशी जवळीक करण्याचा प्रयत्न केला, पण तो जमला नाही.

## दोघांची ताकद पहायला हवी

दिल्ली, जम्मू–काश्मिरमधील निवडणुकांतील पराभवाने भाजपचे डोळे उघडले. त्यातच मध्यप्रदेश, राजस्थान, गुजराथ, कर्नाटक या राज्यांतील विधानसभांच्या पोटनिवडणुकांत व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत भाजपने मार खाल्ल्याने त्यांना आपली 'एकला चलो रे' ही भूमिका बदलणे भाग पडले व ते इतर विरोधी पक्षांना ऐक्याचे आवाहन करू लागले. लोकदलाचे चरणसिंग भाजपनेत्यांचे पाय जमिनीला लागण्याचीच वाट पहात होते. दोघांनाही आधाराची आवश्यकता असताना त्यांच्या युतीची बोलणी झाल्याने बोलणी यशस्वी झाली व राष्ट्रीय लोकशाही आघाडी अस्तित्वात आली. या आघाडीचे संसदेतील प्रमुख चरणसिंग असतील तर आघाडीचे अध्यक्ष वाजपेयी असतील. राज्यसभेतील आघाडीचे नेतृत्व अडवाणी करतील. या आघाडीचे लोकसभेत ४१ सदस्य असून राज्यसभेत २१ सदस्य आहेत. या आघाडीमुळे बऱ्याच काही गोष्टी साध्य होणार आहेत. पहिली महत्वाची गोष्ट म्हणजे भाजपमधील आर. एस. एस. गटाला या आघाडीने धक्का दिला आहे. आर. एस. एस. चे एकला चलो रे धोरण उडवून लावण्यात आले आहे दिल्ली, जम्मूकाश्मिरच्या निवडणुकांत आर. एस. एस. ने इंदिरा काँग्रेसला मदत केल्याने भाजप नेत्यांना आता मदतीकरिता आर. एस. एस. वर संपूर्णपणे अवलंबून रहाणे शक्यच नव्हते. मग आर. एस. एस. ला शह देण्यासाठी वाजपेयी, जेठमलानी, सिकंदर बख्त, कन्वरलाल गुप्त प्रभृतींनी अंतर्गत विरोधाला न जुमानता चरणसिंगांच्या लोकदलाशी आघाडी केली. चरणसिंग हे लोकदलाचे सर्वेसर्वा असल्याने त्यांनी स्वतःच्या अधिकारात आपल्या पाठिराख्यांचा सल्ला न घेता आघाडीला मान्यता दिली. आर. एस. एस. ला शह देण्याबरोबरच वाजपेयींनी लोकदलाशी आघाडी करून जनता पक्ष, कम्युनिस्ट, काँग्रेस (एस) बहुगुणा, जगजीवनराम, चंद्रजित यादव इत्यादि भाजपला अलग पाडण्याचा प्रयत्न करणाऱ्यांनाही शह दिला आहे. आता एक तर जनता पक्ष, कम्युनिस्ट, काँग्रेस (एस) इत्यादींना आघाडी करावी लागेल किंवा भाजप–लोकदल यांच्या आघाडीत प्रवेश मिळविण्याकरिता प्रयत्न करावे लागतील. नाही तर शेवटचा प्रयत्न म्हणून

**DIAMOND GROUP**

Ward 9, H. No. 637 / 1, Station Road,
ICHALKARANJI

*For* **quality Warping, Sizing, weaving, Bleaching, & Mercersing.**

*Phone : 2442*

भाजप–लोकदल आघाडी कशी अयशस्वी होईल व कशी फुटेल याकडे आशेने नजर लावून बसावे लागेल. भाजप-लोकदल यांना आघाडीचा कितपत लाभ मिळेल? भाजपशी आघाडी करण्याच्या प्रश्नावरून लोकदलात आताच कुरबुरी सुरू झाल्या आहेत. भाजपमधील आर. एस. एस. गटही याबाबतीत भाजपसमोर काही अडचणी निर्माण करण्याचा प्रयत्न करेल.

या दोघांची ताकद प्रथम तपासून पहावयास हवी. उत्तरप्रदेशात विशेषतः पश्चिम उत्तरप्रदेशात चरणसिंगांची ताकद जबरदस्त आहे. चरणसिंग व जनसंघ यांच्या युतीने नेहमीच उत्तरप्रदेशात कांग्रेसचा पराभव केलेला आहे. १९७३ च्या निवडणुकांत जनसंघ व भाक्रांदवाले वेगवेगळे लढूनही त्यांना उत्तरप्रदेशात अनुक्रमे ६१ व १०३ जागा मिळाल्या होत्या, तर १९७७ मध्ये जनता पक्ष स्थापन झाल्यावर उत्तरप्रदेश विधानसभेत ४२५ जागांपैकी जनता पक्षाला साडेतीनशेच्यावर जागा मिळाल्या होत्या. त्यातील बहुतेक सर्व जागा लोकदल व जनसंघ घटकांच्याच होत्या. उत्तरप्रदेशात श्रीमंत जाट शेतकरी, मध्यमवर्गीय शेतकरी, मुसलमान हे लोकदलाचे मोठे आधारस्तंभ आहेत तर जनसंघाच्या पाठीमागे कायस्थ, ब्राह्मण, छोटे व्यापारी, मध्यमवर्गीय यांचा भरभक्कम आधार आहे. काहींच्या मते जनसंघ (भाजप) अलीगढ, मोरादाबाद येथील दंगलीत हिंदुत्ववादी, जातीयतावादी म्हणून बदनाम झाल्याने लोकदलाचे पारंपारिक मुसलमान मतदार या आघाडीला पाठिंबा देणार नाहीत. मात्र मला तसे वाटत नाही. कारण इंदिरा गांधी दिवसेंदिवस हिंदुत्ववादी बनत असताना भाजप मुसलमानांचा विश्वास मोठ्या प्रमाणावर संपादन करत आहे. दिल्लीतील निवडणुकांत मुसलमानांनी भाजपला भरघोस मतदान करून भाजपबद्दल आपली भूमिका बदलल्याचे दाखवून दिले आहे. गुजराथ, मध्यप्रदेश, कर्नाटकातील निरनिराळ्या निवडणुकांतही मुसलमानानी भाजपला चांगला पाठिंबा दिला. आज जनता पक्षामध्ये नसतील एवढे मुसलमान भाजपमध्ये आहेत! वाजपेयी, सिकंदर बख्त, जेठमलानी, अरीफ बेग यांची मुसलमानांतील लोकप्रियता वादातीत आहे. दिल्ली, मध्यप्रदेश, जम्मूकाश्मिर, महाराष्ट्र, कर्नाटक, पंजाब, बंगाल, आसाम, केरळ, आंध्रप्रदेश या राज्यांत लोकदलाचा विशेष प्रभाव नसल्याने या राज्यांत भाजपला आघाडीचा विशेष उपयोग होणार नाही; परंतु लोकसभेच्या बहुसंख्य जागा उत्तर विभागातील असल्याने व या भागात भाजपच्या बरोबरीने लोकदल शक्तिमान असल्याने आघाडी फायदेशीर होईल. उत्तरप्रदेशात लोकसभेच्या ८५ जागा आहेत. बिहारमध्येही भाजपला लोकदलाचा उपयोग होईल. कर्पूरी ठाकूर हे लोकदलातून गेल्याने तेथे लोकदल कमकुवत बनले असले तरी तेथील जाटांची मते चरणसिंग आघाडीला मिळवून देऊ शकतील. बिहारमध्ये लोकसभेच्या ५४ जागा आहेत. हरयाणात देवीलाल जरी लोकदलातून गेले असले तरी तेथील जाटांवर चरणसिंग चांगला प्रभाव पाडून आहेत. लोकदलाची कामगिरी हरयाणात नेहमीच चांगली झालेली आहे. याबाबतीत फक्त जाटांनी भाजपच्या पारंपारिक मध्यमवर्गीय, व्यापारी, हिंदुत्ववादी मतदारांशी जुळवून घ्यावयास हवे. हिमाचलप्रदेशात भाजप खूपच प्रबळ आहे. लोकदलाच्या थोड्याशा मदतीने तो इंदिरा कांग्रेसला खडे चारू शकेल. राजस्थानमध्ये भाजपकडे भैरवसिंग शेखावतांसारखा गुणी नेता आहे. राजस्थानात जाटांची संख्या बरीच असल्याने भाजप–लोकदल आघाडीला तेथे इंदिरा कांग्रेसशी चांगली टक्कर देता येईल. राजस्थानमध्ये लोकसभेच्या २४ जागा आहेत. आंध्रप्रदेश, कर्नाटकात लोकदलाचे स्थान नगण्य असले तरी तेथील शेतकऱ्यांवर चरणसिंगांचा बऱ्यापैकी प्रभाव आहे. पंजाबमध्ये थोडीबहुत जाटांची मते आहेत. मात्र भाजप व चरणसिंगांनी अकालींविरुद्ध कडक भूमिका स्वीकारल्याने आता या आघाडीला पंजाबमधील हिंदू व चरणसिंगांच्या जाट किसान मतदारांवरच अवलंबून रहावे लागेल. भाजप व लोकदल यांची आघाडी निवडणुकांमध्ये अभेद्य राहिली व त्यांनी स्थानिक पातळीवर जनता, कम्युनिस्ट कांग्रेस (एस) जगजीवनराम यांच्याशी जागांबाबत समझोता केला तर या आघाडीला उत्तर भारतातील भरभक्कम पाठिंब्यामुळे लोकसभेच्या बऱ्यापैकी जागा मिळावयास काही हरकत नाही.

सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे या आघाडीने जनतेचा विश्वास संपादन करावयास हवा. ही आघाडी संधिसाधू राजकारणावर आधारित नसून एखादे विशिष्ट ध्येय साध्य करण्यासाठी स्थापन करण्यात आली आहे याचा लोकांना विश्वास वाटला पाहिजे. त्या दृष्टीने महागाई, भ्रष्टाचार व इतर अनेक अन्यायांना वाचा फोडणारे विषय हातात घेऊन संयुक्तपणे प्रखर आंदोलन देशभर उभारणे या आघाडीला जमले पाहिजे. नुसता इंदिरा गांधी या व्यक्तीला विरोध करून मते खेचण्याचे दिवस आता संपले आहेत. लोकांचा जनता पक्षाच्या कटु अनुभवावरून आघाडीवरील व विरोधी पक्षांच्या तथाकथित ऐक्यावरचा विश्वास उडाला आहे. इंदिरा गांधींची तथाकथित हुकुमशाही त्यांना नको असली तरी जनता पक्षाचा तमाशाही त्याना नकोय. लोकांना केंद्रात स्थिर सरकार हवे आहे. तेव्हा लोकदल–भाजप यांच्या या आघाडीने कोणतेही काम संयुक्तपणे करताना वादविवादाचे प्रसंग टाळावयास हवेत. आज भाजपकडे वाजपेयी, अडवाणी, बख्त, जेठमलानी, जोशी, विजयाराजे शिंदे, भैरवसिंग शेखावत यांच्यासारखे नेते आहेत. त्यामानाने लोकदलाकडे चरणसिंग सोडले तर अखिल भारतीय पातळीवरील दुसरा कोणीही नेता नाही! इंदिरा गांधी या आघाडीमुळे नक्कीच घाबरल्या आहेत. कारण उत्तर भारतात या आघाडीच्या रूपाने जबरदस्त आव्हान त्यांच्या समोर उभे ठाकले आहे. जनतापक्ष व मार्क्सवादी कम्युनिस्ट यांनी या आघाडीला पाठिंबा दिल्यास इंदिरा गांधी नक्कीच हबकून जातील. खरा प्रश्न आहे तो ही आघाडी कायम राहील का? आणि राहिली तर लोकांचा विश्वास संपादन करू शकेल का? □


सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही.

–डॉ. य. दि. फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. म. रा. बिवलकर
प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

# पेणमधील पूरग्रस्त शेतकऱ्यांची परवड

**कोकणातला पूर आता ओसरलाय; पण पुराचा जबरदस्त तडाखा बसलेले कोकणातले शेतकरी मात्र अजून सावरलेले नाहीत. या पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या पुनर्वसनासाठी सरकारनं तातडीनं हात द्यावा ही कोणाचीही इच्छा असणार; पण आजची आपली सरकारी यंत्रणा ही तातडीची गरज पूर्ण करू शकत नाही. त्यासाठी आंदोलनं करावी लागतात, चळवळीची शक्ती दाखवून द्यावी लागते. पेणमधल्या पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाचा हा एक अनुभव...**

**सुबोध वागळे**

कोकणातील पुरासंबंधीच्या बातम्या तशा आता जुन्या झाल्या आहेत. त्यानंतर दुसरीकडे पूर आले, इमारती पडल्या, दंगली झाल्या. मुख्यमंत्री, प्रदेशाध्यक्ष बदलले अन् कोकणची बातमी हेडलाइनवरून खाली आणि मग आतल्या पानावर जाऊनही बरेच दिवस उलटले. मुख्य सचिव धावून गेले. मदतयोजना जाहीर झाल्या. दुष्काळ-आयुक्त कामाला लागले. पक्षोपक्षांच्या नेत्यांनी, आमदारांनी, खासदारांनी कोकण-दौरे केले. महाराष्ट्राचे मिनी चंद्रशेखर, शरदराव पवार जाऊन आले. अगदी मुख्यमंत्रीदेखील पहाणी करून आले. वर्तमानपत्रांनी फोटो छापले. नियतकालिकांनी विशेष प्रतिनिधी पाठवले. स्थानिक वार्ताहरांनी आँखो देखे ' हाल ' पाठवले. ' एश्टघा ' सुरू झाल्यावर मुंबईतले चाकरनामे रजा काढून गावाची हालहवाल बघून आले. एकूण काय आता मुख्यमंत्री, वर्तमानपत्रे, नियतकालिके अन् अगदी चाकरमानेसुद्धा आपआपली कर्तव्ये पार पाडून 'कोकणातला पूर' हा विषय विसरायला मोकळे झाले. पंचा लावलेला कोकणातला शेतकरी मात्र फुटलेल्या नळधांकडे अन् चिखलभरल्या खाचरांकडे हताशपणे बघत राहिला !

ह्या पूरग्रस्तांचे पुढे कसे होते ? त्यांच्यासाठी जाहीर झालेल्या मदतीचे खरे स्वरूप काय असते ? त्यातले त्यांना मिळते किती ? मधल्यामध्ये जाते किती ? जे मिळते त्यासाठी किती आटापिटा करावा लागतो ? ह्याबद्दल सगळेच अनभिज्ञ असतात. खुद्द शेतकरीदेखील मिळेल ते पदरात पाडून पुढच्या वर्षीच्या पुराची, वादळाची किंवा अवर्षणाची आणि मुख्य म्हणजे मुंबईहून येणाऱ्या मनिऑर्डरची वाट पहात स्वस्थ बसतो.

मात्र ह्याला काही अपवाद असतात. ते स्वस्थ न बसता चळवळ करतात. धडपड करतात. अशाच एका अपवादात्मक धडपडीची कथा मी मांडणार आहे. रायगड जिल्ह्याच्या पेण तालुक्यात मुंबई–गोवा रस्त्यावर वडखळ हे गाव आहे. अंतुल्यांचा वडखळनाका इथलाच. ह्या वडखळनाक्यावरून मुंबई-गोवा रस्ता नागोठण्याच्या दिशेने जातो. पुढचा रस्ता तसा छान सपाट आहे. पुढे साधारण सहा कि. मी. वर ' गडब ' गाव लागते. साधारण पंधरा कि. मी. वर पालखार गाव लागते. हृया पट्ट्यात अनेक छोटी छोटी गावे येतात. गडब, खारपाळे, देवळी, कासू, पांडापूर ही काही महत्त्वाची गावे. वस्ती मुख्यतः आगरी समाजाची. काही आदिवासी पाडे मुख्य व्यवसाय शेतीचा अर्थात भातशेती. बहुतेक भातशेती रस्त्याच्या पश्चिमेला असलेल्या खारवट जमिनीमध्ये. हृया जमिनीला नुसतेच ' खार ' किंवा ' खारेपाट ' म्हटले जाते. हृया खार जमिनीच्या पश्चिमेला अंबानदीची खाडी रस्त्याला जवळजवळ समांतर वाहते. पांडापूर व पालखार गावांच्यामध्ये रस्त्याला छेदून येऊन निगडानदी अंबानदीला मिळते. भरतीच्या वेळी समुद्राचे पाणी हृया संगमापर्यंत आत घुसते. हृया खारेपाटात इथले शेतकरी वर्षानुवर्षे भात पिकवतात. खारेपाटातली शेती साध्या जमिनीतल्या भातशेतीपेक्षा तशी वेगळीच. हृयात मुख्य धोका असतो खाडीच्या आत घुसणाऱ्या पाण्याचा. हृया पाण्यापासून जमिनीचे रक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांनी कित्येक वर्षांपूर्वीपासून बांध उभे केले आहेत. मैलोनमैल लांब असणाऱ्या हृया बंधाऱ्यांना ह्या भागात ' बाहेरकाठ ' म्हटले जाते. सामान्यतः हे बंधारे खाडीचे पाणी थोपवून धरण्यास पुरे पडतात; पण अपवादात्मक परिस्थितीत मात्र पाणी बाहेरकाठ्यांना भगदाडे पाडून आत घुसते. ह्या भगदाडांना खांडी म्हणतात. खांडीमधून घुसलेले हे पाणी मात्र अनर्थ घडवून आणते.

२७ जून १९८३ रोजी अशीच अपवादात्मक परिस्थिती निर्माण झाली. आकाश फाटल्यासारखा पाऊस कोसळत होता. सहा तासांत जवळजवळ आठ इंच पाऊस पडला असे लोक सांगतात. निगडा आणि अंबा दोन्ही नद्या तुडुंब वाहात होत्या अन् दुर्दैवाने त्याच वेळी भरतीचे पाणी खाडीत चढू लागले. दोन्ही बाजूंनी वाढणाऱ्या ह्या पाण्याचा दाब साहजिकच संगमाजवळ वाढू लागला. त्या दाबाने त्या संगमाजवळच्या पांडापूर व कासू ह्या दोन खारींच्या कमजोर बाहेरकाठ्यांना भल्यामोठ्या खांडी गेल्या. छोट्या-मोठ्या खांडी बुजवण्याची शेतकऱ्यांची तयारी अन् सवय असते; पण हा प्रकार भयानक होता. हा हा म्हणता गडब ते पांडापूर ह्या पट्ट्यातल्या सहा हजार एकर जमिनीवर चार फूट पाणी चढले.

त्याआधीदेखील १५–१६ जून व २२–२३ जूनला खांडी पाडून थोडे फार पाणी आत घुसले होते; परंतु २७ जूनचे पाणी महाभयानक होते. बऱ्याच जणांना माहीत असेल की, भातशेतीच्या एका पद्धतीनुसार आधी भाताचे रोप नर्सरीत वाढवतात व मग त्याची

शेतात लावणी केली जाते. बऱ्याच वेळा ही नर्सरी शेतातल्या एका तुकड्यात असते. ह्या नर्सरीला ह्या भागात पेरा किंवा डायटा म्हणतात. २७ जूनला पाणी घुसले तेव्हा पेऱ्यातल्या रोपांची उंची साधारण तीन इंच असावी. त्याच्यावर चार फूट पाणी चढले होते. एवढे पाणी तीन चार दिवस होते. सगळे पाणी उतरायला मात्र बरेच दिवस लागले. आधीच्या पावसात घुसलेल्या पाण्यामुळेच पेऱ्यांचे बऱ्यापैकी नुकसान झाले होते. ह्या दणक्याने मात्र पेरे जवळजवळ पूर्ण नष्ट झाले. आत घुसणाऱ्या पाण्याच्या जोरदार प्रवाहात बहुसंख्य रोपे वाहून गेली. आंतरबांध फुटले. पाण्याचा दाब व चिखलाचा थर ह्यामुळे उरलेली रोपे कुजून गेली.

२९ जूनला तहसीलदार पहाणीसाठी आले. त्या वेळीदेखील जमीन पूर्णपणे पाण्याखाली होती. नुकसानीचा अंदाज करणे शक्यच नव्हते. ३० जूनला ह्या भागातला एक कार्यकर्ता श्री. अरुण शिवकर ह्यांच्या पुढाकाराने शेतकऱ्यांची एक बैठक झाली. जवळजवळ साडेतीनशे शेतकरी हजर होते. बैठकीत कृतिसमितीची स्थापना करून तिचे अध्यक्षपद श्री. अरुण शिवकर ह्यांच्याकडे देण्यात आले. तातडीची मागणी म्हणून पूरग्रस्तांना सहाय्य करण्यात यावे, ताबडतोब नवे बियाणे व खते देण्यात यावी असे सरकारला सुचवण्यात आले. एकरी २० किलो बियाणे व ५० किलो खत असे मागणीचे प्रमाण ठरले.

## अधिकाऱ्यांची धावाधाव

खरे तर बियाणांच्या पुरवठ्याची मागणी शेतकऱ्यांनी याआधीच केली होती. आदल्या वर्षी म्हणजे ८ व ९ नोव्हेंबर १९८२ ला ह्या भागात चक्रीवादळ व त्यापाठोपाठ झालेल्या अवेळी पावसाने शेतकऱ्याला चांगलाच दणका दिला होता. त्या वेळी बहुतेकांच्या खळ्यात मळण्या रचलेल्या होत्या. मळणीचा तळातला व व वरचा भाग पावसामुळे पूर्णपणे खराब झाला. मधल्या भागातील दाणादेखील उबेमुळे काळा पडला. ह्या काळा दाणा बियाणाच्या दृष्टीने पूर्ण निरुपयोगी होता. त्याच वेळी ह्या नुकसानाचे रीतसर पंचनामे शासनाकडून करून घेण्यात आले होते. त्यानंतर जि. प. च्या सर्वसाधारण सभेत ह्या शेतकऱ्यांना मे महिन्यापर्यंत बियाणे देण्यात यावे असा ठराव झाला होता. ह्या भागातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या याद्या जि. प. कडे सादर करण्यात आल्या होत्या; परंतु पाऊस आला तरी शेतकऱ्यांना बियाणे मिळाले नव्हतेच. शेतकरी थांबणार तरी किती? त्याने कर्ज काढून, उसनवार करून पेरण्या उरकून घेतल्या.

आता ह्या पेरण्या वाहून गेल्यावर मात्र शेतकऱ्यांनी आपल्या मागण्या जोरदारपणे मांडल्या व त्याचा पाठपुरावा करण्याचे ठरवले. १ जुलैला मागण्यांचे निवेदन तहसीलदारांना दिले गेले. २ जुलैला शेती विकास अधिकारी, कृषिसभापती (जि. प.) ह्यांच्या गाठी घेण्यात आल्या. ३ जुलैला पुन्हा पुढील कार्यक्रम ठरवण्यासाठी पुन्हा बैठक बोलावण्यात आली. त्यात ठरल्यानुसार ५ जुलैला गावोगावच्या पस्तीस प्रतिनिधींनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन आठ दिवसांत प्रश्न न सुटल्यास आंदोलनाचा इशारा दिला. त्याच वेळी निवेदनाबरोबरच पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या याद्या (नुकसानाच्या अंदाजासकट) सादर करण्यात आल्या. जिल्हाधिकाऱ्यांनी मी शासनाला सर्व कळवतो असे आश्वासन दिले व तहसीलदारांना नुकसानीचे पंचनामे करण्यास सांगितले.

८,९,१० तारखेच्या मुंबईच्या वृत्तपत्रांतून ह्या भागातल्या पुराच्या बातम्या फोटोसकट झळकल्या मग मात्र अधिकाऱ्यांची धावाधाव सुरू झाली. दि. १२ जुलैला जिल्हाधिकारी, जिल्हापरिषदेचे अध्यक्ष व गट विकास अधिकारी जातीने पहाणी करण्यास आले. खारेपाटातल्या चिखलातून चालत जाऊन त्यांनी झालेला अनर्थ पाहिला. मग मात्र कामाला थोडी गती मिळेल असे लोकांना वाटू लागले.

कृतिसमितीचे प्रयत्न मात्र धडाक्याने चालूच होते. १४ तारखेला ह्या भागातले आमदार श्री. मोहन पाटील ह्यांच्याबरोबर महसूलमंत्री श्री. शांताराम घोलप ह्यांची भेट घेण्यात आली. मी मुद्दाम विचारले, 'आमदार कधी आले होते का ह्या भागात?' त्या दिवसापर्यंत तरी आमदार तिकडे फिरकले नव्हते! मंडल आयोगाच्या प्रकरणात सभागृहात जो गोंधळ झाला त्यानंतर एका वृत्तपत्रातल्या फोटोत ह्या आमदारांना 'काय धमाल केलीय!' ह्या थाटात हसताना पाहिले होते. ह्या धमालीत त्यांना दोन तासांच्या अंतरावरल्या मतदारसंघातल्या पूरग्रस्तभागात यायला वेळ मिळाला नसावा! घोलपांनी मात्र त्या वेळी जिल्हाधिकाऱ्यांना नुकसानीचा अंदाज घेऊन खते व बियाण्याचे वाटप करण्यास सांगितले.

१५ जुलैला पूरपरिस्थिती हाताळणाऱ्या खास अधिकाऱ्यांना हे सभासद मंत्रालयात भेटले. त्यांनी तर बॉंबगोळाच टाकला! रायगडच्या पूरपरिस्थितीबाबत कोणतीही माहिती आमच्याकडे आलेली नाही असे त्यांनी स्पष्ट सांगितले! दहा दिवसांच्या काळात कलेक्टर अलीबागहून मुंबईला योग्य अधिकाऱ्याकडे ही माहिती पाठवू शकले नाहीत. समितीतर्फे त्यांना हवी ती सर्व माहिती ताबडतोब देण्यात आली. त्यांनीदेखील तातडीने बिनतारी यंत्रणेद्वारा कलेक्टरना पुढचे आदेश दिले.

ह्या सगळ्या प्रकारावरून आपल्या समस्यांची दखल शासनाकडून कशा प्रकारे घेतली जात आहे हे शेतकऱ्यांना कळून चुकले. दिवस तर भराभर चालले होते. त्यानंतर बियाणे मिळाल्यावर पेरण्या करण्याने काही साधणार नव्हतेच. पुन्हा लोकांनी कर्जे काढली, उधार-उसनवारी केली आणि पेरण्या केल्या. कृतिसमितीने सोमवार दि. १८ ही शेवटची मुदत दिली व १९ तारखेपासून आंदोलन सुरू करण्याची घोषणा केली.

१७ तारखेला रविवार असूनही तहसीलदारांनी कृतिसमितीशी बोलणी करण्यास सुरुवात केली. 'आणखी दोन दिवस मुदत द्या; मी मागण्या पूर्ण करतो' असे सांगितले. केवळ त्यांच्यावर अवलंबून न राहता २९ तारखेला पुन्हा महसूलमंत्री शांताराम घोलप यांची व सावंत ह्यांची कृतिसमितीने भेट घेतली. रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात पूरस्थितीसाठी जी भट लागू करण्यात आली तीच ह्या विभागातील पूरग्रस्तांसाठी लागू करण्याचा त्यांनी आदेश दिला. त्यानुसार १० किलो बियाणे व २५ किलो खत (त्यातले १० कि. बियाणे व ५ कि. खत मोफत उरलेले कर्जस्वरूपात) असे तातडीने सहाय्य देण्यात येणार होते. कृतिसमितीने केलेल्या मागणीच्या (एकरी २० किलो बियाणे व ५० कि. खत.) तुलनेत हे अल्प होते. आता ह्या मागणीचा पाया कोणता? १९८० साली असाच पूर आला होता.

शेतकऱ्यांनी आपल्या शेतीच्या अनुभवाच्या बळावर एकरी २० किलो बियाणे व १०० कि. खत अशी गरज निश्चित करून तशी मागणी सरकारकडे केली होती. त्या वेळी सरकारने फक्त २० किलो बियाणे व ५० कि. खत दिले. १९८१ साली पुन्हा पूर आला. मात्र उशीरा. त्यामुळे फक्त ५० किलो खताचे वाटप करण्यात आले. त्या आधारावर ही मागणी करण्यात आली होती. थोडे का होईना सहाय्य मंजूर झाले होते. आता शेतकरी कामाकडे परतायला उत्सुक होते.

## शासकीय दिरंगाई

आता शुक्रवारचे आंदोलन न करण्याचा निर्णय लोकांपर्यंत पोचवणे भाग होते. त्यासाठी कृतिसमितीच्या सदस्यांबरोबर तहसीलदारांनी गावोगाव जाऊन शेतकऱ्यांना भेटावे असे ठरले. दुसऱ्या दिवशी कृतिसमितीचे सदस्य वाट पहात होते. तहसीलदार पोलीस–अधिकाऱ्यांना घेऊन एकटेच गावोगाव गेले. लोक जागोजागी जमले होतेच. तहसीलदारांनी लोकांना निर्णय सांगितला. बरोबरच्या पोलिसांनी 'चला चला, घरी चला! तुमच्या मागण्या मान्य झाल्या आहेत, आता घरी चला!' म्हणत लोकांना हुसकावले. तहसीलदारांनी काही ठिकाणी हे सहाय्य एकरी असल्याचे सांगितले तर काही ठिकाणी प्रत्येक शेतकऱ्याला. बरोबरच पोलीस. कृतिसमितीचे सदस्य नाहीत. असा सगळा गोंधळ उडाला!

नंतर असे सांगण्यात आले की, हे सहाय्य एकरी अथवा प्रत्येक शेतकऱ्याला नसून प्रत्येक खातेदाराला आहे, म्हणजे ज्याच्या नावावर सातबाराचा उतारा त्यालाच हे मिळणार! ह्यामुळे अनेकजण वंचित राहाणार होते आणि हे मिळणारे सहाय्य तर अत्यल्पच ठरत होते. पुन्हा सगळे धावत तहसीलदारांकडे. तहसीलदारांनी बोट दाखवले जिल्हाधिकाऱ्यांकडे. त्यांनी मुंबईला फोन लावला व शेवटी २५ तारखेला हे सहाय्य प्रत्येक शेतकऱ्याला द्यावे असा निर्णय दिला. हे सहाय्य 'एकरी' द्यावे ही मागणी विचारार्थ वर पाठवण्याचे मान्य केले.

पूरग्रस्तांच्या सरकारी याद्यांत गोंधळ असल्याचे दि. २६ रोजी कृतिसमितीच्या लक्षात आले. प्रत्येक गावातल्या फार तर दहा–बारा लोकांची नावे यादीमध्ये होती. खरे तर नोटीस लावून, दवंडी पिटून, पंचांना सांगून, सर्वांच्या नुकसानीचे पंचनामे व्हायला पाहिजे होते; परंतु तलाठी व ग्रामसेवकांनी घरबसल्या जवळच्या लोकांची नावे घालून, पंचनामे केल्याचे दाखवून याद्या वर पाठवल्या. पुन्हा धावाधाव! २६ तारखेलाच संध्याकाळी तहसीलदारांकडे कृतिसमितीचे सदस्य गेले. २६ तारखेला तहसीलदारांची अचानक बदली झाली! २७ तारखेला नव्या तहसीलदारांनी आणखी एक दिवसाची मुदत मागितली.

दरम्यान २६ तारखेलाच कृतिसमितीच्या काही प्रतिनिधींनी मुंबईला व सहकारखात्याच्या अंडर सेक्रेटरींकडे जी. आर. बाबत स्पष्टीकरण मागितले. त्यांनी जी. आर. ची एक प्रतच हातात दिली. त्यात उल्लेख होता हे कर्ज प्रतिहेक्टर असल्याचा त्यांच्या निदर्शनास हे आणताच त्यांना तावडतोब फोनवरून जिल्हाधिकाऱ्यांना तसे कळवले.

त्यानंतर दि. २८ जूने रोजी निवासी उप-जिल्हाधिकारी (आर. डी. सी.) पेणच्या विश्रामगृहात लोकांना भेटण्यासाठी आले. प्रत्येक गावातल्या दोन प्रतिनिधींनी त्यांची भेट घेतली. याद्यांमधल्या गोंधळाबाबत त्यांना सांगितल्यावर त्यांनी याद्यांचे नूतनीकरण करण्याचे मान्य केले. त्याचबरोबर त्याआधीच्या दहा दिवसांतल्या पावसाने ज्यांचे नुकसान केले अशा शेतकऱ्यांचा समावेश याद्यांमध्ये करण्यास त्यांनी मान्यता दिली. हे सहाय्य जे प्रतिहेक्टर दिले आहे ते अत्यल्प असून ते प्रतिएकरी द्यावे. (१ हेक्टर = २.५ एकर) ह्या मागणीचा स्वत: पाठपुरावा करण्याचे मान्य केले. गावातल्या लोकांना एवढ्यासाठी कामे सोडून यावे लागू नये म्हणून गावोगावी वाटपकेंद्रे सुरू करण्याचे मान्य केले. दुसऱ्या दिवसापासून तलाठी गावोगाव हिंडून नव्याने पंचनामे करू लागले.

ह्या सगळ्या व्यापात एक महिना उलटून गेला होता. ह्यानंतर पेरण्या करायच्या म्हणजे हंगामावर पाणी सोडण्यासारखेच होते. अर्थात शेतकरी अनुभवाने शहाणे झाले होते. त्यांनी याआधीच पेरण्या उरकल्या होत्या; परंतु त्यानंतरही पाणी वारंवार घुसत होतेच. त्यामुळे ह्या पेरण्यांचेही खूप नुकसान झाले होते. त्यामुळे खताची आवश्यकता वाढली होती. मंजूर झालेले सहाय्य त्या मानाने अत्यल्प होते.

हे सगळे पाहिल्यावर असे लक्षात येते की, ह्या पूरग्रस्त शेतकऱ्यांची शासनाने कशी परवड केली. आरडाओरड, वृत्तपत्रप्रसिद्धी झाल्याशिवाय शासकीय यंत्रणा झडझडून कामाला लागतच नाही. आमदार, खासदार फिरकत नाहीत. निर्णय घेताना पावला-पावलावर टोलवाटोलवी होते. जिल्हाधिकाऱ्यांना दिलेली निवेदने अलीबागेहून मुंबईला दहा दिवसांनीदेखील पोहोचत नाहीत. जे निर्णय घेतले जातात ते अत्यंत घिसाडघाईने घेतले जातात. आता हेक्टरी २५ कि. खताचा निर्णय कोणत्या तर्काने घेतला ते त्यांचे त्यांनाच माहिती! घेतलेल्या निर्णयाची सुस्पष्ट कल्पना अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांनादेखील नसते. जी. आर. मध्ये खातेदारास म्हटले होते, शेतकऱ्यास म्हटले होते की हेक्टरी म्हटले होते, ह्याबाबत सगळ्या अधिकाऱ्यांनी घातलेला गोंधळ लज्जास्पद होता. तहसीलदारासारखे अधिकारीदेखील प्रत्येक वेळी चालढकल, गोलमाल करून वेळ साजरी करतात. ऊठसूठ वर जिल्हाधिकाऱ्यांकडे बोट दाखवतात. त्यांना तलाठ्याकडून याद्या तयार करून घेण्याचे कामदेखील व्यवस्थित करता येऊ नये, ह्या सगळ्याला काय म्हणावे? खरे तर पुराच्या आपत्तीने हताश झालेल्या शेतकऱ्याला लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी ह्यांनी स्वत: जाऊन दिलासा दिला पाहिजे. त्याला उठून उभे राहता येईल इतकी मुदत दिली पाहिजे. ते सगळे दूरच राहिले. इथे पूरग्रस्त शेतकऱ्याला मदत मंजूर करून घेण्यासाठी २४ दिवस धडपड, धावपळ करावी लागते! मुंबईला महसूलमंत्र्यांपर्यंत जावे लागते. त्यानंतर मंजूर झालेली ही नाममात्र मदत मिळविण्यासाठी पुन्हा आठ-दहा दिवस झगडावे लागते; ह्या कर्माला काय म्हणावे? एका तरुण परंतु अनुभवी, अधिकाऱ्यांना ओळखून असणाऱ्या, धडपड्या कार्यकर्त्यांमुळे ह्या शेतकऱ्यांच्या पदरात निदान एवढे तरी पडले. इतरांचे हाल कल्पनेनेच जाणावेत हे बरे!

हा झाला ह्या प्रश्नाचा तात्कालिक भाग. माहिती गोळा करताना

आधीच्या वर्षी आलेल्या पुराचा संदर्भ आला होता. त्यासंबंधी विचारता कृतिसमितीचा अध्यक्ष अरुण शिवकर म्हणाला, 'मी १९८० सालापासूनचे तीन पूर स्वतः पाहिलेयत. त्याआधीदेखील जवळजवळ दरवर्षाआड ही आपत्ती येतच होती.' १९८० साली पूर आला. अरुणच्या पुढाकाराने शेतकऱ्यांनी रास्ता रोको आंदोलन केले. त्या वर्षी एकूण नऊ लाखांचे सहाय्य देण्यात आले. १९८१ साली पुन्हा पूर, पुन्हा आंदोलन, पुन्हा रास्ता रोको. परत ९ लाखांचे वाटप. १९८२ साली पूर आला नाही; पण पाऊस कमी झाला. त्यातून जे पीक आले त्याचे नोव्हेंबरमधल्या अवेळी पावसाने नुकसान केले. १९८३ साली मात्र पुन्हा पूर आला. आता हा पूर दरवर्षी का येतो? ह्यावर काही उपाय नाही का?

## प्रश्न सुटलेला नाही !

आधीच सांगितल्याप्रमाणे गडब ते पांढापूर पट्ट्यातल्या खारेपाटाभोवती एक सलग बाहेरकाठा (बांध) आहे. ह्याची दुरुस्ती व देखभाल पूर्वी शेतकरी स्वतःच करत. त्याला 'जोळ पद्धत' असे नाव होते. प्रत्येक खारीच्या शेतकऱ्यांचा एक गट असे. तो गट आपल्या हद्दीतल्या बाहेरकाठ्याची सगळी जबाबदारी घेत असे. संकटाच्या वेळी त्या गटाच्या मदतीस इतर गट धावून जात. काही वर्षांपूर्वी खारलँड बोर्डाची स्थापना झाली. त्या वेळी बोर्डाने हे बाहेरकाठे ताब्यात घेण्याची तयारी दाखवली. बऱ्याच जणांनी बाहेरकाठे बोर्डाच्या ताब्यात दिले. काही जणांच्या मनात सरकारच्या कार्यक्षमतेबाबत किंतु असल्याने किंवा इतर कारणामुळे त्यांनी मात्र बाहेरकाठे आपल्याच ताब्यात ठेवले. ह्या पट्ट्यातल्या दक्षिणेकडच्या पांढापूर व कासू ह्या दोन खारी खाजगी राहिल्या, बाकी सर्व सरकारच्या ताब्यात दिल्या गेल्या. मागील तीन वर्षांत बोर्डाने आपल्या ताब्यातले बाहेरकाठे रोजगार हमी योजनेद्वारा मजबूत करून घेतले. बाहेरकाठ्यांची रुंदी वीस फूट करण्यात आली. त्याला दगडाचे पीचिंग करण्यात आले. पांढापूर व कासू ह्या दोन खारींचे बाहेरकाठे मात्र तसेच कमजोर राहिले. दुर्दैवाने हृया दोन खारीच निगडा व अंबानदीच्या संगमाजवळ येतात. जेव्हा पाऊस व भरती एकच वेळ साधतात तेव्हा दोन्ही बाजूंनी वाढणाऱ्या पाण्याचा दाब हृया संगमावरच्या जुनाट व कमजोर बाहेरकाठ्यांवर पडतो. भल्यामोठ्या खांडी पाडून पाणी आत घुसते आणि पार गडबजवळच्या खारकारावीपर्यंतच्या सहा–सात हजार एकर जमिनीवर पसरते. आतले सगळे आंतरबांध फुटतात. पिके वाहून जातात. बुडतात. चिखलाचे थर बसतात. प्रचंड नुकसान होते.

अशा परिस्थितीत पांढापूर व कासू हृया दोन महत्त्वाच्या खारींच्या कमजोर बाहेरकाठ्यांचे काम अग्रक्रमाने व्हायला हवे; परंतु हृया खारी खाजगी असल्याने खारलँड बोर्ड त्याला हात लावायला तयार नाही. ह्या खाजगी खारी बोर्डाच्या ताब्यात देण्यासाठी संबंधित शेतकरी कधीपासूनच तयार नव्हे उत्सुक आहेत. बोर्डाकडे ह्या खारी ताब्यात घेण्यासाठी पाठपुरावा केल्यानंतर त्यांनी तयारी दर्शवली. तसे ग्रामपंचायतींकडून ठराव करून घेतले. शेतकऱ्यांकडून अर्ज, फॉर्मस भरून घेतले. खारी ताब्यात घेण्यास आता बोर्डाची काहीच हरकत नाही. त्यांचेकडे बाहेरकाठ्याचे नूतनीकरणास पुरेसा निधीही उपलब्ध आहे. अडचण आहे फक्त एका प्रशासकीय बाबीची. तेवढ्यावर हा प्रश्न गेली दोन वर्षे अडकून पडला आहे. शासनाने मंत्रीमंडळाच्या स्तरावर हृया खारी ताब्यात घेण्याचा निर्णय घेतल्याशिवाय ही प्रक्रिया सुरू होऊ शकत नाही. एवढी आरडाओरड हृया प्रश्नावर होऊनदेखील शासन हृयाबाबतीत का निर्णय घेत नाही हे कळायला मार्ग नाही. आर्थिक स्वार्थ, राजकीय हितसंबंध की केवळ दफ्तरदिरंगाई ? याचे उत्तर मंत्रीमंडळच देऊ शकेल !


एवढे सगळे समजल्यावर आणखी काही प्रश्न माझ्या मनात उभे राहिले; परंतु ते मी अरुणला मात्र विचारले नाहीत. त्या प्रश्नांची उत्तरे मलाही माहीत होती न् त्यालाही. ही सगळी धावपळ करण्याऐवजी पुन्हा आंदोलन का केले नाही ? अरुणसारख्या शेतकऱ्यामध्ये काम करणाऱ्या तरुण कार्यकर्त्यापुढे हा प्रश्न सतत असतोच. शासकीय यंत्रणा, अधिकारी व हितसंबंधित व लोकप्रतिनिधी हृयांचा थंडपणा खरे तर शिरजोरपणा, मग्रुरी इतक्या टोकाला गेली आहे की, सत्याग्रह, धरणे, मोर्चे, उपोषणे असल्या फालतू गोष्टींना ते दाद देत नाहीत. रास्ता रोकोसारखे परिणामकारक उपाय पोलिसी बळाचा निष्ठुर वापर करून दडपले जातात. शेवटी सामान्य शेतकऱ्याच्या आंदोलनात भाग घेण्याच्या क्षमतेवरही मर्यादा असतात. हृया मर्यादांचे भान कार्यकर्त्याला ठेवावे लागते आणि त्यामुळेच रास्ता रोकोसारखे परिणामकारक परंतु धोकेबाज हत्यार फार कमी वेळा व जपून वापरावे लागते.

दुसरे प्रश्न म्हणजे एकरी कर्ज मंजूर करण्याच्या मागणीचा पाठपुरावा का करण्यात आला नाही ? किंवा बाहेरकाठे ताब्यात घेऊन सुधारण्याच्या मागणीचा पाठपुरावा नीट का झाला नाही ? हे प्रश्नही शेतकऱ्यांच्या संघटनेपुढे नेहमीच उभे राहतात. ज्या संघटनेत पूर्ण वेळ नेते, कार्यकर्ते आहेत ते प्रश्न धसास लावू शकतात; पण अरुण शिवकरसारख्या कार्यकर्त्यांचे साथीदार शेतकरी असतात. आपल्या शेतापासून ते फार काळ दूर राहू शकत नाहीत. पेरणीचे दिवस आले, लावणी आली की सगळी कामे बाजूला ठेवून आपल्या वावरा खाचराकडे त्यांना परतावे लागतेच. तो त्यांचा आणि त्यांच्या कुटुंबाचा उद्याच्या जीवनाचा प्रश्न असतो.

मी अरुणला विचारले, 'तुझ्या खाचराचे काय ?' त्यावर त्याने सांगितले की, ही धावपळ तो करीत असतानाच पलीकडच्या आमटेम परिसरातल्या सात गावातल्या लोकांनी त्याच्या शेतीचे काम करून ठेवले होते. त्याची मजुरी सोडाच; पण जाण्यायेण्याचा खर्च घेण्यासही त्यांनी नकार दिला ! गेल्या मे–जूनमध्ये हृया आमटेमच्या सात गावातल्या लोकांनी अरुणच्या नेतृत्वाखाली आंदोलन करून कित्येक वर्षे रखडलेली पाणीयोजना मंजूर करून घेतली होती. एवढेच नव्हे तर सरकारवर अवलंबून न राहता श्रमदान करून विक्रमी वेळात ती पूर्ण देखील केली होती; परंतु तो किस्सा वेगळाच आहे.

अरुण शिवकर व त्याचे लढाऊ साथीदार शेतकरी आपल्या खाचराकडे कामासाठी परतलेयत. सहाय्याचे वाटप कूर्मगतीने का होईना सुरू झाले आहे; पण हे सगळे पाहिल्यापासून माझ्या मनात टोचणारा प्रश्न अजूनही सतावतोच आहे. पुराच्या आपत्तीने हताश झालेल्या हृया शेतकऱ्यांची जी परवड करण्यात आली त्याबद्दल मला-तुम्हाला नक्की काय वाटते ? वेदना, संताप, दुःख की वैषम्य ? की चक्क काहीच नाही ? □

# कुंपण आणि आकाश



मंगला गोडबोले

**संसारातले हे खटकणारे क्षण संवेदनशील स्त्रियांना वैवाहिक आयुष्याच्या सुरुवातीलाच कुठे तरी जाणवतात. त्यातल्या दुबळ्या, पराभूत स्त्रिया सुरुवातीलाच त्या वास्तवाला शरण जातात.**

स्वतःच्या कमाईच्या शंभराच्या काही नोटा पहिल्यांदा हातात पडल्या तेव्हा ती हरखली ! लहानपणी शाळेत पाच–दहा रुपयांचं बक्षीस मिळाल्यावर हरखायची तशी ! फरक इतकाच की आता तीही लहान राहिली नव्हती आणि ती रक्कमही. तसं तिला काही कमी नव्हतं. राहातं घर होतं, नवऱ्याला चार आकडी पगार होता, सुसज्ज, आटोपशीर संसार होता. आयुष्यात 'हे हवं... ते हवं' असं मनापासून वाटण्याचा, असोशीचा जो काळ असतो तोही गेलेला होता. तरीसुद्धा नेहमी आयतं जेवणाराला एखादे वेळेस बदल म्हणून स्वत: रांधून खावंसं वाटावं तसं तिला वाटलं होतं. अलीकडे निवळला असला तरी मुळात तिचा स्वभाव मनस्वी ! त्यामुळं एकदा डोक्यात आल्यावर तिनं कामाला कंबरच कसली. झबल्यादुपट्यात, पिठामिठात, लडबडलेली आपली डिग्री शोधशोधून बाहेर काढली. पुस्तकांवरची धूळ झटकली. मेंदूवरचा गंज खरवडून टाकला. संवेदनांना तेलपाणी केलं. सगळी सामग्री जमतेय तेवढ्यातच योगायोगानं एका समाजशास्त्रीय पाहणीला मदत करण्याचं काम घरबसल्या तिला मिळालं. दीड–दोन महिने कसे मजेत गेले ! सुरुवातीला 'कसं जमेल एवढं' असं म्हणता म्हणता 'एवढ्यात संपलंसुद्धा ?' या चुटपुटत्या शेवटाकडे आपण कसे आलो हे तिचं तिलाही समजलं नाही. हा मधल्या काळातला प्रवास तिच्या घराला समजला नाही. कारण कोणीच त्या घटनेकडे फारशा गांभीर्यानं पाहिलेलं नव्हतं. 'आमचं व्यवस्थित करून पुढे काहीही कर' ही प्रचंड सवलत तर तिला घरानं अगदी पहिल्यापासूनच दिलेली होती. त्यामुळं 'व्यवस्थित करून' तिनं रमी खेळली काय, भिशी मांडली काय आणि काम केलं काय, घरादाराच्या दृष्टीनं सगळंच सारखं होतं. तिच्या हातात चार पैसे आल्यावर मात्र घराच्या प्रतिक्रिया अधिक टोकदार झाल्या.

'अधूनमधून करत जा असं. बरं तेवढंच टॅक्स फ्री इन्कम' नवरा खुषीत येऊन म्हणाला.

'एक एक ग्रॅम सोनं घेत जा. तेवढीच आस्ते आस्ते लेकीच्या लग्नाची सोय होईल !' वडीलधाऱ्यांनी सल्ला दिला.

'मला सायकल'...'मला मोत्याच्या बांगड्या' मुलांच्या मागण्या पुढे आल्या. कोणी तरी आपल्याकडे काही मागावं आणि ते देण्याची कुवत आपल्यात असावी या कल्पनेनं क्षणभर तीही सुखावली; पण क्षणभरच ! एकदम मनात विकल्प आला, हा सगळा सोहळा या नोटांचा आहे ! माझा वेळ चांगला जाणं, माझं मन रमणं याला कोणाच्या लेखी काहीच किंमत नाही. जॉब सॅटिस्फॅक्शन हा शब्द तिचा नवरा स्वत:बाबत असंख्य वेळा उच्चारायचा. कॉलेजमधली मुलगी नावडत्या विषयाच्या किंवा नावडत्या शिक्षकांच्या तासाला सरळ दांडी मारून घरी यायची. गुडघ्याएवढा तिचा मुलगा, बोअर, वैताग असले शब्द वाक्योवाक्यी वापरायचा. आवडीचं काम करण्याची आणि नावडतं टाळण्याची कमी-अधिक सवलत त्या सर्वांनाच होती. अपवाद फक्त तिचा ! तिनं ठरलेली दैनंदिन कामं जन्मभर त्याच निष्ठेनं, त्याच अग्रक्रमानं, त्याच जबाबदारीनं केलीच पाहिजेत आणि ते शिवधनुष्य पेलता पेलता दमछाक झाली नाही तर ऐच्छिक इतर काम केलं पाहिजे ज्यातून ठोस उत्पन्न–म्हणजे अर्थातच काही आर्थिक कमाई–झाली पाहिजे, तरच घरदार त्याची बूज राखेल. त्यासाठी दोन गोष्टींची तडजोड पत्करेल. त्याची कदर करेल. पैसा निर्माण करू न शकणारं काम मात्र व्यर्थ !

अर्थप्राप्ती, पुढे पैसा ही जीवनाची प्रधान प्रेरणा मानवी संस्कृतीच्या उगमापासूनच असली पाहिजे. आजच्या काळात तर ती अटळ आहे. त्यामुळंच परिस्थितीच्या रेट्यानं ज्यांना आयुष्यभर नोकरी करणं भाग आहे अशा तरुण, शहरी स्त्रियांचा प्रश्न एका अर्थानं सोपा आहे. त्यांच्या परिस्थितीची अपरिहार्यता समाजाला दिसत असते. दरमहा सालोसाल उभे राहाणारे पगाराचे आकडे त्यांच्या कर्तबगारीची साक्ष देतात. आर्थिकदृष्ट्या ज्यांची परिस्थिती इतकी बिकट नसते त्यांची मात्र सामाजिकदृष्ट्या या प्रश्नाबाबत परिस्थिती बिकट असते. काम करावंसं वाटतंय; पण प्रयोजन स्पष्ट नाही, पैसे मिळाले तर आवडेल; पण खणखणीतपणे मोजून घेण्याचं धाष्टर्य नाही आणि पैशांसारखा नगद मोजून घेण्याजोगा लाभ नसेल तर कामामध्ये अंतिम स्वरूपाची निष्ठा नाही असा काही तरी हा तिढा असतो.

वास्तविक संसाराव्यतिरिक्त कुठलंही लहानमोठं काम करणं स्त्रीच्या हिताचं असतं. मग त्यातून पैसा हाती लागो अगर न लागो. कामाच्या निमित्तानं स्त्रीभोवतीची घराची चौकट थोडी शिथिल होते. तिचा आत्मविश्वास वाढतो. सांस्कृतिक, सामाजिक संदर्भांमध्ये ती अधिक अद्ययावत होते, तिचं पत्नीपण, थोडं-फार पालकपण सुधारण्याचीही शक्यता असते, कौटुंबिक नात्यांचे बंध ओलांडून व्यापक मानवी नाती ती बघू शकते, स्वत:च्या नैसर्गिक शक्ती वापरण्याच्या अधिकाधिक शक्यता तिच्यापुढे खुल्या होतात. नव्हे, एकूण माणूस म्हणूनच ती जीवनाला अधिक मोकळेपणाने सामोरी जाऊ शकते. (घरात डांबलेल्या स्त्रीला हे सर्व मिळवणं अशक्य नाही; पण त्यासाठी फार मोठा प्रयास व निग्रह बाळगावा लागतो.)


पण मुळात बाईचं माणूसपण जोपासण्याची गरज आपल्याकडे कितीजणांना वाटते ? आणि त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न कोणकोणत्या पातळ्यांवर होतात ? बाईचं संसाराव्यतिरिक्तचं कोणतंही काम हा तर आपल्याकडे सनातन गोंधळाचा आणि वैचारिक दुहीचा विषय आहे. मुळामध्ये शारीरिक कष्टाचं काम कनिष्ठ आणि बौद्धिक व्यापार श्रेष्ठ अशी सांगड, ब्राह्मणांना बौद्धिक व शूद्रांना कष्टाची कामं वाटून देतानाच आपल्या परंपरेनं घातलेली आहे; पण स्त्रीच्या बाबतीत मात्र शारीरिक कष्टाचं, गृहसंवर्धनाचं काम अटळ आहे आणि कितीही बौद्धिक भराऱ्या मारल्या तरी हे काम करण्यावर स्त्रीची प्रतिष्ठा आजही तोलली जात आहे. एखादी गृहिणी ' शिकलेली असून ' किंवा ' नोकरी करणारी असून ' पायापुसणं झटकते, श्रावण-शुक्रवारी स्वत: पुरणपोळ्या करते किंवा वर्षाचं पापडलोणचं घरीच करते ह्याचं कौतुक कमी का होतं चारचौघात ? प्रज्ञावंतांबद्दल, शास्त्रज्ञांबद्दल असं गंमतीनं म्हटलं जातं की, ज्या वेळी ते सर्वांस रिकामे बसलेले दिसतात त्या वेळीच त्यांचा मेंदू प्रचंड उलथापालथी करीत असतो. स्त्रीला मात्र असं वाह्यत: रिकामं दिसण्याची सोय नाही. ह्या सगळ्याचा कळत-नकळत स्त्रियांवर परिणाम होत जातो. त्यामुळं दैनंदिन कामं आणि अशा प्रकारची सामाजिक बौद्धिक आवाहनं यांचं नीटसं मूल्यमापन पुष्कळ बायकांना करता येईनासं होतं. कधीं त्या किरकोळ गृहकर्मांना अवास्तव महत्त्व देऊन सर्व शक्ती त्यांच्यावरच खर्चून टाकतात तर कधी या दैनंदिन चाकोरीबाहेरचं कुठलंही काम " आपल्याला झेपणारच नाही." असं मनाशी ठरवून त्यापासून चार पावलं दूरच रहातात. संसार आणि बौद्धिक काम ही युती मनातून खोडून टाकतात.

ही सगळी चर्चा परवा तिच्याशी झाली ती तिच्या त्या ' सुप्रसिद्ध ' कमाईवरूनच. तणतणतच आली होती ती. तसं तिला फार उशीरा जाणवलं होतं असंच म्हटलं पाहिजे. संवेदनाशील स्त्रियांना हे आयुष्याच्या–निदान वैवाहिक आयुष्याच्या सुरुवातीलाच कुठे तरी जाणवून जातं. त्यातल्या त्यात कणा नसलेल्या, दुबळ्या, परभृत स्त्रिया असतात. त्या सुरुवातीलाच या अटळ वास्तवाला शरण जातात. घरसंसाराच्या भिंती आभाळापर्यंत उंचावून बाहेर बघण्याच्या शक्यताच नाहीशा करतात. तर त्यातल्या त्यात महत्त्वाकांक्षी, धडाडीच्या असणाऱ्या स्त्रिया स्वत:बरोबर कुटुंबाचीही जाणीवपूर्वक घडण करू बघतात. घरातले नोकर, मुलं, नवरा या क्रमाक्रमानं अखेर त्या समाजालाही आपल्या कामाचं पैशापलीकडचं महत्त्व समजावून देतात आणि एका अर्थानं स्वत:बरोबरच एकूण स्त्रीजीवनाची उंचीही त्या वाढवत असतात. दुर्दैवानं त्यांची संख्या थोडी असते. म्हणून तर सुरुवातीला 'तिला' आलेले अनुभव बहुतेकींना कडू तोंडाने घ्यावे लागतात.

त्या दिवशी ती किती कडवटपणे म्हणाली, " पैसे-पैसे काय हो ? दोन महिन्याच्या या कामाइतके पैसे मी सहा महिने लोकांची धुणीभांडी करून किंवा वर्षभर फरश्या पुसूनही मिळवले असते; पण मला तसे नको होते. माझं हे म्हणणं कुणाला समजत नाही त्याला करू तरी काय ?"

मी मान डोलावली. तिचं म्हणणं समजत होतं या अर्थी आणि तिची अगतिकता दूर करणं शक्य नाही या अर्थीही ! तिला मात्र माझ्या मान डोलावण्यानंही बरं वाटलेल दिसलं. □

---



# आपली मुलं

मूल झालं की आपोआप आपण पालक होतो असा अनेक आई–वडिलांचा गैरसमज असतो; पण चांगले पालक होण्यासाठी काही तयारी जाणीवपूर्वक करावी लागते. गैरसमजावर आधारलेल्या पालकत्वासंबंधीच्या कल्पना बाजूला ठेवाव्या लागतात. बालमानसशास्त्राचा विचार मनात ठेवून दिलेली पालकत्वासंबंधीची माहिती उपलब्ध असते का ? आपण तिचा उपयोग करतो का ?

---

● शोभा भागवत ●

तो प्रसंग मला अनेकदा जसाच्या तसा आठवतो. चाळीतल्या दोन खोल्या. आत स्वैपाकघर. बाहेरच्या खोलीत बाळंतिणीची बाज, बाळाचा पाळणा. बाळ पाळण्यात झोपलेलं. थंडीचे दिवस. बाळाची आई म्हणजे त्या घरातली मोठी मुलगी बाळाच्या अंगावर पांघरूण घालत होती. पाळणा सगळीकडून झाकून टाकत होती. त्या मुलीचे वडील बाळाचे आजोबा सांगत होते–



# कुठे मिळेल पालकत्वाचे शिक्षण?

'अग, त्याच्या अंगावर पांघरुणं घालू नको. त्यापेक्षा खोली कशी उबदार राहील ते बघ.'

खोली उबदार ठेवणं जरा कठीण काम होतं. जास्त कौशल्याचं होतं; पण त्याचीच खरी गरज होती. अंगावर पांघरुणं घालणं ह्या सोईचा शॉर्टकट होता.

मुलं वाढवताना त्या आजोबांच्या शब्दांची मला वारंवार आठवण होते आणि वाटतं एका थंडीच्या निमित्तानं आजोबांनी केवढा मोलाचा सल्ला सगळ्या पालकांना दिलाय! पालक-शिक्षणाचं सारच या सल्ल्यात आहे.

मुलांना चांगलं वाढवण्यासाठी त्यांच्या भोवती चांगलं वातावरण असण्याची गरज असते. प्रेम, डोळसपणा, स्वातंत्र्य, मुक्तसंधी, कौतुक, जिव्हाळा, काळजी, सन्मान, संवाद, जबाबदारीची जाणीव असे या वातावरणातले अनेक प्रवाह आहेत. हे वातावरण निर्माण करायला आपण कमी पडलो की उपदेशाच्या शॉर्टकटवर आपण निभावून न्यायला बघतो.

'ऐकलं नाहीस तर मरेस्तोवर मारीन!' हा झाला शॉर्टकट; पण जे ऐकायचंय ते आपण का सांगतो आहोत, कशासाठी त्याचं महत्त्व; ते ऐकलं नाही तर होणारं नुकसान, जाणारा वेळ, मनस्ताप याची काहीही कल्पना मुलांना दिलेली नसते आणि ती अशा ऐनवेळी एक छोटं भाषण ठोकून देता येत नाही. ते संवादाचं वातावरण घरात कायम ठेवावं लागतं. पालकांना हे जमत नाही. मारण्याची वेळ येते. मुलांना कधीही मारू नये हे स्वतःला बजावलं पाहिजे ते वेगळंच!

'कारट्या, खोटं बोलतोस? थांब चांगली शिक्षा करतो!' हा झाला शॉर्टकट; पण मूल खोटं का बोलत आहे याची समज, मुलाच्या मनातले विचार, त्याला खोटं बोलायला भाग पाडणारी परिस्थिती, क्वचित पालकांच्या खोटेपणाचं समोर असणारं उदाहरण या वातावरणाचं काय करतो आपण?

'मला तू S. S. C. ला ९०% मार्क मिळवलेले दिसायला पाहिजेत, बाकी काही सांगू नको. काय वाट्टेल ते कर तू!' हा आणखी एक शॉर्टकट. मुलाची आवड, S. S. C. च्या वयातले त्याचे मानसिक प्रश्न, शारीरिक वाढीमुळे निर्माण होणारे प्रश्न, घरातलं वातावरण, शाळा, मित्र, मनावरची दडपणं या साऱ्यासाठी काय करतो आपण? याबद्दल



कधी गप्पा मारतो? बोलतो? मुलांशी मैत्री करतो आपण?

असे अनेक शॉर्टकटस् आपण शोधत असतो. अंगावर भाराभर पांघरुणं घातलेलं मूल जसं गुदमरतं, तसं आपलं मूल या शॉर्टकटस्नी गुदमरत असतं. खोली उबदार असली तर पांघरुणांची गरजच भासत नाही.

खोली उबदार ठेवण्याचं, मुलाभोवती त्याच्या वाढीला योग्य वातावरण ठेवण्याचं शिक्षण कुठे मिळतं?

आपण एकूणच आपल्या जीवनात ज्या ज्या काही गोष्टी शिकतो त्या कशा शिकतो? लहानपणापासून. पाहून, ऐकून काही गोष्टी सहजपणे आपल्यात मुरतात, काही गोष्टींचं पद्धतशीर शिक्षण शाळा–कॉलेज, इतर अभ्यासक्रम यातून आपण घेतो आणि यापलीकडचा मोठा भाग आपण स्वतःच्या प्रयत्नांनी शिकत असतो. अनेक प्रकारच्या संधी आपल्या दारावर रोज टकटक करत असतात. त्यांचं स्वागत केलं तर आपल्याला खूप गोष्टी शिकता येतात. या संधी म्हणजे एखादी घटना असू शकते, एखादं पुस्तक असू शकतं, एखादं माणूसही असतं. आपण वर्तमानपत्र वाचतो, नियतकालिकं वाचतो, पुस्तकं वाचतो, रेडिओ ऐकतो, टी. व्ही. बघतो, चित्रपट बघतो–यातूनही खूप काही शिकत असतो. आपल्या आसपासच्या माणसांच्या जीवनातले प्रसंग, त्यांच्या वृत्ती यातूनही शिकतो. म्हणजे हे सगळं आपल्या भोवती असतं. शिकण्यासाठी त्याचा उपयोग करायचा म्हटला तर होऊ शकतो. नाही तर आपण कोरडेही राहू शकतो.

पालकत्वाच्या शिक्षणाचंही असंच आहे. लहानपणी मुलाशी पर्यायानं आपल्याशी बरं-वाईट वागणारी अनेक मोठी माणसं आपण पहात असतो. आपल्या आईवडलांपेक्षा अमक्याची आई चांगली आहे, तमक्याचे वडील चांगले आहेत किंवा एखाद्या मैत्रिणीचे आईवडील बरे नाहीत ही तुलना मुलांच्या मनात असते. मुलांशी कसं वागावं, कसं वागू नये हे मनात कुठे तरी रुजत असतं ते मोठेपणी उगवून येतं.

पण हे एवढंच पालक–शिक्षण पुरेसं नसतं. कारण लहानपणी जीवनाची अनेक अंगं माहीत नसतात. अनेकदा घाईनं काढलेले निष्कर्ष असतात. ह्या मूळच्या पालक–शिक्षणात भर घालणं, चांगलं–वाईट ठरवत राहणं यासाठी आपल्या डोळसपणाची गरज

असते आणि ते काही फार कठीण काम नाही.

आपल्यावर आपल्या आई – वडलांच्या वागण्याचा परिणाम मात्र सर्वांत जास्त होत असतो. असं म्हणतात की, आई – वडील, मामा, मामी, काका, आजी इ. लोक मुलांशी जसे वागतात, तशी बरीच मुलं, मोठेपणी वागतात. असं वागणं सोपं असतं. कारण यात फारसा विचार करावा लागत नाही. आपण असे कोणासारखे वागतो हा विचार करून पहावा. आपली परिस्थिती वेगळी असते, प्रश्न वेगळे असतात. त्याला उत्तरं आपणच काढतो; पण मूळचं वागणं, या सगळ्याचा आधार कुठे तरी वडील माणसात असतो.

माझे पालकपण घडवणारे असे काही प्रसंग मला माझ्या आई–वडलांच्या संदर्भात आठवतात. माझ्या वडलांना लहान मुलांची अतिशय आवड होती. माझ्यावर त्यांची विशेष माया होती. मी थोडी मोठी झाल्यावर ते म्हणायचे, किती ग लवकर मोठी झालीस आता! ही एवढीशी होतीस, मांडीवर बसलीस तर डोकं तुझं माझ्या छातीला लागायचं.

लहानपणी उन्हाच्या दिवसात ते आम्हा मुलांना बाहेर खेळू द्यायचे नाहीत दुपारी. मला तर कुशीत घेऊन थोपटत गाणं म्हणायचे. वारा घालायचे. "नीज नीज माझ्या बाळा" गाणं म्हणायचे. ते करून गाणं ऐकून मी मुसमुसून रडू लागले.तेव्हा त्यांनी ते गाणं बंद केलं होतं.

आज मुलगी जेव्हा रात्री झोपताना कुशीत शिरते तेव्हा "तुला माझी उशी मला तुझी कुशी" म्हणते तेव्हा त्याचं मूळ मला माझ्या त्या लहानपणात दिसत असतं.

हे नातं अगदी कुशीला कुशीइतकं मर्यादित मात्र नसतं; पण हे खोलवरचे संस्कार पुसत नाहीत; मला लहानपणी फुलं खूप आवडायची. माझे वडील मला जवळजवळ रोज फुलं, वेण्या, गजरे आणायचे. एकदा तर एका शेपटयावर एक वेणी, दुसऱ्या शेपटयावर दुसरी वेणी आणि दोन्हीच्या मध्ये झोपाळ्यासारखी टांगलेली तिसरी वेणी अशी घातलेली मला आठवते. हे फुलांचं वेड आणि लोण माझ्या पुढच्या पिढीतही पोचलेलं आहे.

लहानपणातलं हे कौतुक खूप जणांच्या



वाटयाला येतं; पण वाढत्या वयात हे कौतुक जर विश्वासाचं रूप घेऊ शकलं नाही तर मुलं-पालक संबंध दुरावतात.

कॉलेजमध्ये असताना माझी एका मुलीशी मैत्री झाली. त्या मुलीबद्दल खूप लोकापवाद होते. माझ्या आईच्या मैत्रिणी तिला सांगायच्या, "तुमच्या मुलीला सांभाळा. तिची मैत्री सोडायला सांगा. ती बिघडेल!" माझी आई त्यांना म्हणाली होती, "मला माझ्या मुलीची खात्री आहे. ती मैत्रिणीला सुधारेल. ती बिघडणार नाही!" हे मला विश्वासानं सांगून आईनं माझ्यावर नकळत जबाबदारीच सोपवली होती.

माझे आई–वडील कुठे गेले होते हे सगळं शिकायला ? त्यांनी पालक शिक्षणाचा कुठलाही कोर्स केला नव्हता. त्यावरची पुस्तकंही वाचली नव्हती; पण मुलांवरच्या प्रेमानं आणि स्वतःच्या विचारशक्तीनं त्यांनी आपले मार्ग शोधले होते.

त्यांचं प्रेम फक्त स्वतःच्या मुलांपुरतंच मर्यादित नव्हतं. आम्ही मुलं मोठी झाल्यावर ते म्हणायचे, 'घरात लहान मूल नसलं की बरं वाटत नाही.' मग शेजारच्या लहान मुलांना आमचं घर म्हणजे पत्त्यांचंच घर वाटायचं. नात्यातल्या, मैत्रीतल्या कुणा कुणा वहिन्यांना माझे वडील म्हणायचे, "अग, बाजारात जाताना त्या पोराला कशाला नेतेस ? इथे सोडत जा. काही काळजी करू नको!" अशा प्रकारं एखादं छोटं मूल आमच्या घरात कायम खेळत असायचं. शेजारी कुणाच्या लहान मुलाचा रडण्याचा आवाज आला, आईला मूल ऐकत नाही असं वाटलं, वडील मुलाला मारणार असं वाटलं की माझे आई–वडील हळूच जाऊन त्या पोराला शांत करायचे.

हे असं तुमच्या घरातही घडत असेल. त्याचा चांगला परिणाम तुमच्या मुलांवरही होत असेल.

खूप पालकांचे अनुभव यापेक्षा वेगळेही असतात. ते म्हणतात लहानपणी आम्हाला नाही काही स्वातंत्र्य मिळालं, आम्ही धाकात वाढलो आणि त्याचे वाईट परिणाम आमच्यावर झाले. आता आमच्या मुलांशी आम्ही तसे वागणार नाही. असे पालक विचारी असतात. स्वतःच्या अनुभवांच्या पलीकडे जाऊन त्यांचं मूल्यमापन करण्याची, बरं-वाईट ठरवण्याची ताकद त्यांच्यात असते, असेही पालक आपल्याला होता येतं. मागच्या पिढीकडून मिळालेलं चांगलं पुढच्या पिढीपर्यंत पोचवता येतं. वाईट आपल्यापर्यंतच थांबवता येतं.

पालक-शिक्षणासाठी काही अभ्यासक्रम, छोटे कोर्सेस असतात. पुण्यात पालक शिक्षक संघातर्फे शांता किर्लोस्करांनी असे कोर्सेस चालू केलेले आहेत. त्यांनी आयोजित केलेल्या पहिल्या जबाबदार पालकत्वाच्या वर्गाला मी गेले होते, तो मुंबईच्या निर्मला सरदेसाईंनी घेतला होता. त्या कोर्सनं पालकत्वाकडे पहायची वेगळी दृष्टी मिळाली.

डॉ. थॉमस गॉर्डन या अमेरिकन पालक–शिक्षक–शिक्षणतज्ज्ञाचा उल्लेख अनेकदा होतो. त्याचे Parents Effectiveness Training म्हणजे PFT कोर्सेस अमेरिकेत फार लोकप्रिय आहेत. त्याचे Teachers Effectiveness Training म्हणजे TET कोर्सेसही चालू आहेत.

या अभ्यासक्रमात मुलांशी संवाद साधण्याची अनेक प्रकारची कौशल्यं पालक–शिक्षकांना मिळतात ती रोजच्या व्यवहारात उपयोगी पडतात. बालमानसशास्त्र, बालकांचा विकास, बालकांचं आरोग्य, बालकांचा आहार, बालसंगोपन यासंबंधात अनेक पुस्तकं मराठीतही उपलब्ध आहेत.

मुलांशी वागण्याबद्दल प्रत्यक्ष उदाहरणं देऊन सोप्या मराठीत लिहिलेली सहज वाचण्याजोगी काही छोटी पुस्तकं आहेत. त्यात कोसबाडच्या ताराताई मोडकांचं "बालकांचा हट्ट" हे पुस्तक आहे. मुलाचा हट्ट हा मुलाच्या मनाला आलेला ताप आहे हे समजून घेऊन मुलाशी कसं वागावं याबद्दल सुरेख लिहिलं आहे या पुस्तकात. ताराबाई मोडक आणि अनुताई वाघ यांनी मिळून लिहिलेलं कुरणशाळा हे पुस्तकही छान आहे. अपरिचित मुलांशी शिक्षणाच्या निमित्तानं संवाद साधताना या शिक्षकांनी केलेला विचार पालक शिक्षक सर्वांनाच दिशा दाखवतो.

कृष्णाबाई मोटे यांनी लिहिलेली कोसबाडला प्रकाशित केलेली अशीच चार छोटी पुस्तकं आहेत. मुल व शिस्त, न ऐकणारी मुले, अपत्यजन्माचा आनंद, लहरी मुले अशी या छोट्या पुस्तकांची नावं आहेत. कृष्णाबाईंनी अतिशय सहजपणे या पुस्तकात मुलांचं मानसशास्त्र समजावून दिलं आहे.

मुलांसंबंधीच्या पुस्तकांमध्ये अलीकडे प्रकाशित झालेल्या दोन पुस्तकांचा उल्लेख करायला हवा. एक शांता किर्लोस्करांचं "लालन पालन" आणि देवीदास बागूल यांचं "नवे बालसंगोपन" तरुण पालकांनी वाचलीच पाहिजेत अशी ही पुस्तकं आहेत.

अनेक मराठी नियतकालिकांमधून बालसंगोपनाबद्दल लेख येत असतात. दोन खास अंकांचा उल्लेख करते. शतायुषीचा दिवाळी ७९ चा बालक विशेषांक आणि आरोग्य दक्षता मंडळाचा १९८१ चा दिवाळीअंक यात पालकांना वाचण्यासारखं खूप आहे.

मागे मला अचानक रस्त्यावरच्या जुन्या पुस्तकांमध्ये एक पुस्तक मिळालं होतं. त्याचं नाव आज माहीत नाही. कारण त्याची वरची आणि शेवटची काही पानं नाहीत; पण हे पुस्तक अंतोन मकारेन्को या सोविएत शिक्षणतज्ज्ञाचं आहे. या पुस्तकात

☐ कुठल्याही परिस्थितीत मुलाच्या मनावर वाजवीपेक्षा जास्त ताण पडू न देणे, मानसिक खळबळ माजू न देणे महत्त्वाचे आहे.

☐ झोप आणि जाग, काम आणि विश्रांती, अभ्यास आणि फुरसत यांच्यातील पद्धतशीर विभागणी नसेल, घराबाहेर पुरेसा वेळ घालवता येत नसेल, घरात जिव्हाळ्याचा अभाव असेल तर मानसिक दौर्बल्य मुलात येते.




☐ आज नियम बनवला व उद्या तो मोडला, आज एक गोष्ट करू नको म्हटले व दुसऱ्या दिवशी ती करू दिली तर शिशूमध्ये चांगल्या सवयी बाणत नाहीत.

☐ मुलाला सांगायचे ते काम मनोरंजक पाहिजे, ते फार कठीण असता कामा नये, त्यात मुलाच्या सृजनशक्तीला वाव मिळाला पाहिजे, ते निव्वळ यांत्रिक असता कामा नये.

अशा अनेक गोष्टींबद्दल अनुभवांसह पद्धतशीर मार्गदर्शन आहे. जुनी पुस्तकं शोधताना असा खजिना कधी तरी हाती लागतो.

इंग्रजी वाचणाऱ्या पालकांसाठी तर या विषयावरची खूप पुस्तकं आहेत. बालसंगोपनासंबंधी सर्वात प्रसिद्ध पुस्तक आहे अमेरिकेतल्या डॉ. बेंजामिन स्पॉकचं बेबी अँड चाइल्ड केअर. या पुस्तकात बाळाच्या जन्माआधी पालकांच्या मनाची तयारी व्हावी म्हणून मार्गदर्शन आहे.

बाळाचे कपडे, साहित्य, दूध, अंगावर पाजणं, आहार, स्वच्छता, आजारपण, बाळाच्या सवयी, जन्मल्यापासून किशोर–वयापर्यंतची शारीरिक, मानसिक, सामाजिक वाढ या साऱ्यांबद्दल अतिशय तपशीलवार मार्गदर्शन आहे. डॉ. स्पॉक यांनी अमेरिकेतल्या तीन पिढ्यांना बालसंगोपनाचं शिक्षण दिलं आहे इतकं हे पुस्तक लोकप्रिय आहे. आजवर त्याच्या दोन कोटी ऐंशी लक्ष प्रती खपल्या अशी जाहिरात पुस्तकावर असते.

पुस्तकांची यादी काढू लागले तर या विषयावरचं प्रत्येक पुस्तक वाचलं पाहिजे असं वाटायला लागतं पण ते शक्य नसतं आणि जरुरीचंही नाही. 'Time', १५ ऑगस्ट ८३च्या अंकात What Do Babies Know हा लेख आहे. पाळण्यातल्या बाळांना जन्मापासून किती किती आणि काय काय कळत असतं याविषयीच्या संशोधनांची माहिती देणारा हा लेख आहे. त्यात लेखकानं म्हटलंय, "बाजारात बालसंगोपनासंबंधीच्या पुस्तकांचा पूर लोटतो आहे. काय करावं, काय करू नये याविषयी सतत लेख लिहिले जात आहेत आणि वर हे सगळे वाचून पालकांनी घाबरून जाऊ नये, हे सगळं सोपं आहे असा दिलासाही मिळतो आहे." तरीही पालक घाबरून जात आहेत.

सुदैवानं आपल्याकडे मराठीत असा पूर अद्याप आलेला नाही; पण नियतकालिकांमधले लेख, आकाशवाणीवरचे कार्यक्रम, टी. व्ही. वरचे कार्यक्रम खूप महत्त्वाची माहिती देतात. मुलांच्या दृष्टीनं महत्त्वाचे अनेक कार्यक्रम भोवताली घडत असतात, याकडे सुजाण पालकांचं लक्ष पाहिजे. मुलांना वाढवण्याबद्दलचे विचार, अनुभव, सूचना, सल्ले, नवी माहिती याचा अभ्यास निवृत्त मंडळींनी, महिला मंडळांनी केला आणि तरुण पालकांपर्यंत तो पोचवला तर मोठं समाजकार्य होईल.

मुलांची खेळणी, मुलांसाठी होणाऱ्या स्पर्धा, मुलांची पुस्तकं, मासिकं, मुलांसाठी चालवले जाणारे छंदवर्ग, व्यक्तिमत्त्वविकासाचे वर्ग, मुलांच्या प्रश्नांवर मार्गदर्शन करणाऱ्या संस्था या सर्व क्षेत्रात काय काय चालतं याच्याशी आपला संपर्क पाहिजे. आपलं पालकत्व यामुळं समृद्ध होत असतं.

रामजन्म, कृष्णजन्म, देवळात साजऱ्या करणाऱ्या धार्मिक वृत्तीच्या माणसांना आजच्या बालसंगोपनाबद्दलही कीर्तनकार, प्रवचनकारांनी सांगायला हवं. कृष्णाच्या बाललीला, रामाच्या चंद्र हवा हट्टाची गोष्ट, अश्वत्थाम्यानं दुधाचा हट्ट केला ती गोष्ट, अभिमन्यूनं पोटात असताना 'चक्रव्यूहभेद कसा करायचा ते ऐकलं ती गोष्ट. ह्या सगळ्या गोष्टी काही महत्त्वाचे संदेश देतायत असं नाही का आपल्याला वाटत ?

अशा ऐकलेल्या प्रत्येक गोष्टीचा, पाहिलेल्या अनुभवाचा आपल्या वागण्याशी, जगण्याशी संदर्भ जोडायला शिकलं पाहिजे. आपलं पालकपण समृद्ध करत राहिलं पाहिजे.

अलीकडे पुष्कळ पालक आपल्या मुलांबद्दल सुजाणपणे विचार करायला लागलेले आहेत. मुलांची वाढ, त्यांचा अभ्यास, त्यांचं व्यक्तिमत्त्व याबद्दल जागरूक राहू लागले आहेत. चांगलं व्यक्तिमत्त्व, व्यक्तिमत्त्वविकास म्हणजे काय याचाही जरा सामान्य माणसाच्या दृष्टीनं विचार करायला हवा. मुलाला केवळ अनेक गोष्टी येणं म्हणजे व्यक्तिमत्त्व-विकास नव्हे. असामान्यपणाच्या मागे लागून सामान्यपणाचा तळही निसटतो आणि असामान्यत्व दूरच राहतं. माणूस अधांतरीच राहतो. अशी अधांतरी वावरणारी किती तरी माणसं पाहतो आपण. सामान्यांशी त्यांचं नातं जुळू शकत नाही. असामान्य होण्याची अभिलाषा हे स्वप्नच राहतं. मग ही माणसं सतत असमाधान पसरवत राहतात. भोवतालच्या माणसांना जगणं कठीण करून सोडतात. यापेक्षा माणसाला माणूसपणाचा विकास करायला मदत केली पाहिजे.

चांगला पालक हा चांगला माणूस असतो. बायकोशी वाईट वागणारा माणूस मुलांशी चांगलं वागेल हे शक्य नाही. नवऱ्याला ताप देणारी बाई मुलांवर प्रेम करेल हे शक्य नाही. ऑफिसमधे बेजबाबदारपणे काम करणारा माणूस मुलं जबाबदारीनं वाढवेल हे शक्य नाही. पालकत्व ही एक वृत्ती आहे. ती संवाद साधण्याची कला आहे. खऱ्या अर्थानं समृद्ध जीवन जगण्याची कला आहे. ह्या अर्थानं आपण कुणीच सहजपणे उत्तम पालक नसतो. उत्तम पालक होऊ शकत नाही.

प्रयत्न करणं मात्र आपल्या हातात असतं. आजवर आपण मुलांना घडवतो असं आपण म्हटलं; पण मुलंही आपल्याला घडवत असतात हे लक्षात घेतलं पाहिजे. मुलांच्या निमित्तानं स्वतःला घडवत राहिलं पाहिजे. पालकशिक्षणात याचं फार महत्त्व आहे. □

## 'मुलं आपल्याला घडवतात'

खरं वाटत नाही ना ? ह्या घडवण्याला आपण प्रतिसाद दिला पाहिजे. त्यातून संवाद निर्माण होईल. घर्षणं कमी होतील. पालक आणि मुलं दोघांचीही व्यक्तित्वं समृद्ध होतील. स्वार्थापोटी मुलांची ओढाताण होणार नाही. कुटुंबात प्रत्येकाला हवं ते मिळायला हवं असेल तर प्रत्येकानं हवं ते थोडं सोडायची आपण होऊन तयारी दाखवायला हवी. नाही तर ज्याला जबरदस्तीनं अनेक गोष्टी सोडून द्याव्या लागतात तो आणि जो जबरदस्तीनं गोष्टी मिळवत राहतो—तो दोघंही अपूर्ण माणसं राहतात.

याबद्दल पुढील लेखात...

ज्यांना पहिली अपत्ये मुलीच आहेत आणि पुत्र व्हावा अशी इच्छा आहे त्यांनी संपर्क साधावा.

**वैद्य एम्. वाय्. परांजपे**
संजीवन चिकित्सक
सदाशिव पेठ, नृसिंहसदन
जनता बँकेसमोर
बाजीराव रोड
पुणे ४११ ०३०

**संजीवन औषधालय**
वैद्य एम्. वाय्. परांजपे
लोटलीकर बिल्डिंग
१ ला मजला, १६, एल्. जे. रोड
सिटी लाइट सिनेमाजवळ
माटुंगा (प. रे.) मुंबई ४०० ०१६

# ...तरीही समाजवादाचं त्याचं स्वप्न भंगलं नाही

**इग्नॅशिओ सायलोन**

इटलीमधील एका गरीब शेतकरी कुटुंबात जन्म.
वयाच्या १७ व्या वर्षी पहिल्या महायुद्धाविरुद्ध हिंसक मोर्चा आयोजित केल्याबद्दल अटक.
१९२१ मध्ये इटालियन कम्युनिस्ट पक्षाच्या स्थापनेत भाग. दोन वृत्तपत्रांचे संपादन.
'फॅसिझम' च्या विरोधकांना बंदी असताना इटलीमध्येच राहून अनेक पत्रके छापण्याचे कार्य.
अनेक देशांनी हद्दपार केल्यानंतर, १९३० मध्ये कम्युनिस्ट पक्षाचा त्याग केल्यानंतर स्वित्झर्लंडमध्ये वास्तव्य.
१९४० मध्ये समाजवादी पक्षाची धुरा स्वीकारली. इटालियन समाजवादी पक्षासाठी 'तिसऱ्या आघाडी' ची स्थापना.
अनेक कादंबऱ्या, विचार, नाटके वगैरे खात्यावर जमा.

**रघुपती भट्ट, पेठवडगाव ( कोल्हापूर )**

पाच वर्षांचे असताना इग्नॅशिओ सायलोननी एक प्रसंग पाहिला. चर्चमधून बाहेर पडणाऱ्या एका गरीब स्त्रीच्या अंगावर एका पोलिसाने आपला मोठा कुत्रा सोडला. त्या कुत्र्याने त्या बाईला रस्त्यावर पाडले. तिच्या अंगावरील कपड्यांच्या अक्षरशः चिंध्या केल्या. लोक पाहात होते; पण कोणी मदतीला पुढे आले नाही. त्या स्त्रीचा गुन्हा होता स्थानिक धर्मोपदेशकाच्या विरोधात जाण्याचा. अशा गुन्ह्यांना असलीच शिक्षा असे. पुढे प्रकरण कोर्टात गेले. न्यायाधीश सज्जन माणूस होता; पण समोर आलेला पुरावा लक्षात घेणे त्याला भाग होते. त्या गरीब बाईच्या बाजूने बोलायला कोणी आलेच नाही. तिच्या बाजूला ना कोणी वकील होता; पण स्थानिक धर्मोपदेशकाच्या बाजूने साक्ष द्यायला पैसे चारलेली अनेक मंडळी हजर होती. त्यांच्या साक्षीवरून सिद्ध झाले की, कुत्रा निरपराध होता; पण त्या बाईनेच कुत्र्याला भडकावले होते.

'इग्नॅशिओ सायलोन'—टॉग्लिअॅट्टीच्या खांद्याला खांदा लावून इटलीमध्ये कम्युनिस्ट पक्षाची स्थापना करण्यात भाग घेणारे एक लेखक आपण कम्युनिस्ट झालो त्या प्रक्रियेत वर उल्लेखलेला प्रसंग महत्त्वाचा मानतात.

शाळेतील एक प्रसंग ते देतात. एकदा ते धर्मगुरूसमवेत एक नाटक पाहात होते. सैतान आणि एक खोडकर मुलगा यांच्यामधील द्वंद्व त्यात होते. सगळी मुले कथेत अगदीच रंगून गेली होती. कथेच्या एका प्रसंगात तो छोटा मुलगा स्टेजच्या कोपऱ्यात लपून बसतो. पाठीमागून आलेल्या सैतानाला तो दिसत नाही तो मग त्या वेळी प्रेक्षकांना विचारतो 'तुम्ही त्या मुलाला कोठे पाहिलंत का ?'

तो प्रसंग आला तेव्हा इग्नॅशिओ आणि त्याचे मित्र कथेत अगदी रंगले होते. सैतानाने प्रश्न विचारल्यावर एकमुखी उत्तर आले, 'नाही'. नाटक संपल्यावर धर्मगुरूंनी एक व्याख्यान झोडले. 'तुम्ही खोटं बोललात'. ते म्हणाले, कारण कितीही चांगले असले तरी खोटं बोलणं हे पापच. इग्नॅशिओनी त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. 'आम्ही खरं बोललो असतो तर तो मुलगा सैतानाच्या हाती सापडला नसता का ?' पण धर्मगुरु आपला हेका सोडेनात. मग इग्नॅशिओंनी शेवटचा बाण टाकला. 'समजा सैतानानं तुमचाच पत्ता विचारला तर ?' मग खरं बोलणं पुण्य की खोटं बोलून पाप घ्यायचं ? त्यावर धर्मगुरु भलतेच खवळले.

छोटे छोटे प्रसंग; पण इग्नॅशिओच्या मनावर खोल ठसा उमटवत राहिले. खरं–खोटं, चांगलं–वाईट, न्याय–अन्याय यांच्या कल्पना समाजामध्ये अत्यंत पुसट आहेत असं त्यांना दिसून येत राहिलं. परिवर्तनाची प्रतिक्रिया घडत राहिली.

एकदा त्यांच्या भागात एक निवडणूक झाली. त्यांच्या भागातील एक मातब्बर माणूस निवडणुकीला उभा राहिला. त्यांच्या भागातील एका मोठ्या इस्टेटीचा तो मालक. त्याच्या शेतावर राबणाऱ्यांचीच संख्या मतदारसंघात जास्त होती. त्यांच्या हस्तकांनी प्रचारात मजेदार भाषा वापरली. 'कोणावरही मतदानाची सक्ती करण्यात येणार नाही,' ते म्हणत; 'पण मग जे लोक मालकांना मत देणार नाहीत त्यांना कामावर घ्यायची सक्ती मालकावर कोणी करू शकत नाही.'

इग्नॅशिओचे गावकरी गरीब होते. त्यांना संताप होता तो मर्यादित स्वरूपातच. इग्नॅशिओंच्या वडिलांनी त्या मातब्बर माणसाच्या बाजूला उभे राहण्याचे नाकारले, तेव्हा त्याचे वडील भाऊ त्यांच्याकडे आले. 'आपण त्यांच्यावर अवलंबून आहोत तेव्हा त्यांना पाठिंबा देणं चांगलं.' त्यांनी इग्नॅशिओच्या वडिलांना सांगितलं. बराच वेळ

त्यांचा वाद झाला. शेवटी तडजोड झाली की, मतदान गुप्त असल्याने त्या वेळी त्यांच्या मताप्रमाणे ते करू शकतील; पण तोपर्यंत तरी त्यांनी त्या मातब्बराच्या विरोधात जाऊ नये. त्याच्या बाजूने जायचे राहूदे पण निदान त्याचा विरोध तरी नको! इग्नॅशिओनी हा प्रसंग पाहिला.

त्या मातब्बराचा विरोधी होता एक फाटका डोळ्याचा डॉक्टर. तो एक दिवस गावात आला. त्याने मुलांना जमवले आणि त्यांना सल्ला दिला, 'तुमच्या आईवडिलांना एवढेच सांगा की, मतदान गुप्त आहे.' तो म्हणाला, 'मी गरीब आहे; पण तुमच्यापैकी कोणाचे डोळे खराब झाले असतील तर मी मोफत उपचार करेन.' मग मुलांनी एका गरीब बाईला आणले. त्याने तिला औषध दिले. वापर समजावून दिला आणि पुन्हा त्याने मुलांना सांगितले, 'तुमच्या आईवडिलांना आठवण करून द्या की, मतदान गुप्त आहे.'

निवडणूक झाली. त्या मातब्बराला विजयाची एवढी खात्री होती की, विजयोत्सव कसा करायचा याचीही सगळी तयारी करण्यात आली होती; पण इग्नॅशिओंच्या गरीब, श्रमजीवी बांधवांनी त्याला धक्का दिला. त्या फाटक्या माणसाला बहुमताचा कौल मिळाला होता. त्या मातब्बराच्या विरोधात गेलेल्यांची संख्या एवढी प्रचंड होती की, त्याच्या हस्तकांना कोणावरही कारवाई करता येणं शक्य नव्हतं इग्नॅशिओनी पाहिलेली, अनुभवलेली ही पहिली जनक्रांती होती. या क्रांतीचे शिल्पकार होते, दक्षिण इटलीमधील त्यांच्या डोंगराळ जिल्ह्यातले शांत सोशिक गावकरी.

'समाजवाद' म्हणजे काय हे नेमके कळायच्या अगोदरच इग्नॅशिओच्या मनात समाजवादाविषयी आकर्षण निर्माण झाले होते. 'समाजवाद आणला पाहिजे' असं एक मतही त्यांनी बनवून ठेवले होते. आसपास जे आहे त्यामधील कीड नाहीशी करायची असेल तर समाजवादाशिवाय खरं नाही असं त्यांना वाटत होतं. एकदा काय झालं, तीन सैनिकांवर अन्याय झाला. 'इग्नॅशिओ'नी खूप प्रयत्न केला; पण त्यांची काही दाद लागेना. मग इग्नॅशिओनी जमाव जमवला आणि त्या सैनिकांची सुटका घडवून आणली. मग त्या चौकीवर इग्नॅशिओ आणि त्यांचे मित्र एवढेच राहिले 'आता काय करायचे?' मित्रांनी विचारले.

आता सगळं गाव झोपी गेलं असेल. या संधीचा फायदा घेऊन समाजवाद आणू या. 'समाजवाद' म्हणजे वस्तू असल्याप्रमाणे इग्नॅशिओ म्हणाले.

१९१५ मध्ये एकदा त्यांच्या भागात एक भयानक भूकंप झाला. जवळजवळ पन्नास हजार लोक ठार झाले. लोकांना अन्याय सहन करण्याची इतकी सवय झाली होती की भूकंपसुद्धा लोकांनी अपरिहार्य म्हणून स्विकारला होता. घर गाडलं गेलेल्या एका बाईला सोडवायला लोक गेले तेव्हा तिनं बाहेर यायला नकार दिला होता. आपल्यावर सतत संकटं, अन्याय होत राहणारच, त्यातून आपली कोणीही सुटका करूच शकत नाही असं तिचं ठाम मत बनलं होतं.

पण भूकंपानंतर जे अनेक कार्यक्रम सरकारनं हाती घेतले त्यानं मात्र प्रेताच्या टाळूवरील लोणी खाण्याचा प्रकार झाला. तरुण इग्नॅशिओना त्या भ्रष्टाचाराची माहिती मिळाली तेव्हा ते खवळले सगळी माहिती घेऊन ते वरीष्ठांकडे गेले. वरीष्ठांनी सगळं ऐकून घेतलं पण त्यांना सगळं काही अगोदरच माहिती असल्याचं दिसत होतं. "तुझ्या तू अभ्यासात लक्ष घाल. यात कशाला पडतो आहेस?" त्यांनी इग्नॅशिओना सुनावलं. इग्नॅशिओनी प्रकरण धर्मगुरूंकडे नेलं. त्यांनीही तोच सल्ला दिला.

मग इग्नॅशिओ फारच अस्वस्थ झाले एकूण हे प्रकरण फारच थराला गेलेलं दिसत होतं. पण त्यांच्याकडे नावं होती, पुरावाही होताच. त्यांनी त्यांचा वृत्तांत 'समाजवादी' वृत्तपत्राकडे पाठवून दिला.

त्यांच्या अपेक्षेप्रमाणे त्या समाजवादी पत्राने त्यांचे दोन लेखांक छापले पण तिसरा लेखांक मात्र एका समाजवादी नेत्यानेच अडवला. त्याचे आणि भ्रष्टाचारात गुंतलेल्यांचे संबंध होते. इग्नॅशिओना समजले भ्रष्टाचाराचे हात किती दूरवर पोचलेले असतात. पण जेवढे प्रसिद्ध झाले तेवढयावर बराच गाजावाजा झाला होता. केस घालण्याइतपत त्यामध्ये साहित्य होते.

पण काही झाले नाही. इग्नॅशिओनी ज्यांच्यावर आरोप केले होते ते मजेतच राहिले. इग्नॅशिओंच्या आरोपांना उत्तर देण्याइतपत दखल घ्यावी असेही त्यांना वाटले नाही.

## अपयशाचे प्रतीक

अशा अनेक प्रसंगांतून इग्नॅशिओ समाजवाद, साम्यवाद याकडे झुकत गेले. एकवीस साली इटालियन कम्युनिस्ट पक्षाच्या स्थापनेमध्येही त्यांनी भाग घेतला होता. इग्नॅशिओंकडे आत्यंतिक कळकळ होती. ज्या खेडूतांमधून ते आले होते, त्यांच्यासाठी काही करण्यासाठी ते धडपडत राहिले. एक 'लेखक' म्हणून ते अत्यंत संवेदनशील होते. साम्यवादाची तत्त्वे त्यांना खूप आवडली होती. उद्याचा नवा समाज यातून जन्माला येणार आहे. ही एक ऐतिहासिक प्रक्रिया आहे असं त्यांना वाटत होतं. कम्युनिस्ट पक्षाचे क्रियाशील नेते म्हणून इटलीबरोबरच इतर अनेक देशांतील कम्युनिस्ट चळवळींशी त्यांचा संबंध आला. अनेक मान्यवर कम्युनिस्टांशी त्यांचा घनिष्ठ संबंध आला. कामगार आणि इतर श्रमिकवर्गांच्या लढ्यामध्ये भाग घेतल्याबद्दल युरोपातील अनेक देशांनी त्यांना हद्दपार केले. तुरुंगवास भोगायला लावला; पण इग्नॅशिओ आपल्या स्वप्नांना चिकटून राहिले.

पण जागतिक कम्युनिस्ट नेत्यात अग्रेसर असलेल्या इग्नॅशिओंनी १९४० मध्ये पक्षाचा त्याग केला. त्याचीही प्रक्रिया त्यांनी 'द गॉड दॅट फेल्ड' मधील आपल्या निबंधात दिली आहे.

नंतरच्या काळात कम्युनिस्ट इंटरनॅशनल आणि देशोदेशींचे कम्युनिस्ट पक्ष यामध्ये संघर्षांचे प्रसंग आले. इतर कम्युनिस्ट आणि आपल्यामध्ये काही फरक आहे हे रशियातील बुजुर्ग मान्य करायला तयार नव्हते. त्यांनी आखून दिलेला कार्यक्रमच सर्वांनी राबवला पाहिजे असा त्यांचा अट्टाहास असे. त्यामुळे रशियन नेत्यांमधील हेकेखोरवृत्ती, दुराग्रह वाढतच गेला. खरं म्हणजे इग्नॅशिओसारख्या माणसांना हे खपण्यासारखं नव्हतं; पण त्यांच्यापुढे तत्त्वांसाठी बलिदान केलेल्या माणसांचा आदर्श होता आणि त्याहीपेक्षा युरोपातील श्रमिकवर्ग, 'कम्युनिस्ट इंटरनॅशनल' पुन्हा बळकट बनवेल, रशियामध्ये घडले नाही तर पश्चिमेचा श्रमिक सुराज्य आणेल असा एक विश्वास होता.

लेनिन आणि ट्रॉटस्कीसारख्या बुजुर्ग कम्युनिस्टांना भेटण्याचा योग इग्नॅशिओंना वारंवार आला. त्यांना आढळलं की, ही बडी माणसेसुद्धा अत्यंत दुराग्रही आहेत. इतर रशियन कम्युनिस्टांप्रमाणे त्यांनाही विरोध; टीका सहन होत नसे. एकाच ध्येयाप्रत जाणारे अनेक मार्ग असू शकतात हे त्यांना मान्यच नव्हते. मार्ग एकच! तोही त्यांचाच! तुमचे त्यांच्याशी जरा दुमत झाले तरी तुम्ही 'विश्वासघातकी' 'संधिसाधू' किंवा भांडवलदारांचे भाडोत्री हस्तक!

म्हणून त्यांची एक रशियन मैत्रीण त्यांना म्हणाली, 'उद्या तुम्ही वाचलंत की क्रेमलिन-मधील चांदीचे चमचे चोरल्याबद्दल लेनिननं मला अटक केली तर खुशाल समजा की शेती किंवा औद्योगिक प्रश्नावरील कोणत्या-तरी क्षुल्लक बाबतीत लेनिनचे माझ्याशी पटले नाही!'

एकदा इग्नॅशिओंनी एका रशियन प्रकाशिकेला स्वातंत्र्याचा अर्थ समजावून दिला, स्वातंत्र्य म्हणजे शंका घेण्याची शक्यता. चूक करण्याची शक्यता, प्रयोग करण्याची शक्यता आणि याशिवाय राजकीयच नव्हे तर सामाजिक, धार्मिक, तात्त्विक, साहित्यिक यातील कोणाही पुढाऱ्याला 'नाही' म्हणण्याची शक्यता ज्यात गृहीत असते ते! ती प्रकाशिका थरारली. "ती प्रतिक्रांती ठरेल. आमच्याकडे तसले स्वातंत्र्य नाही याचा आनंद आहे," ती म्हणाली. "पण त्याऐवजी आमच्याकडे विश्रांतिगृहे आहेत की!" इग्नॅशिओंना हसू आलं. 'स्वातंत्र्याला' 'ऐवजी' असत नाही. ते म्हणाले, 'ती काही वस्तू नाही!' पण त्या प्रकाशिकेला काही त्यांचं म्हणणं कळलं नाही.

इग्नॅशिओ रशियामध्ये जे काही दिसले त्यामुळे खिन्न झाले. रशियातील तरुण पिढीचा उत्साह ओसरल्यासारखे घडत होते. रशियात हुकुमशाहीचा प्रभाव वाढतो आहे हे स्पष्ट दिसत होते. जे नष्ट करण्यासाठी कम्युनिस्ट तत्त्वप्रणाली आली तेच वेगळ्या नावाखाली, बुरख्याखाली निर्लज्जपणे जोपासले जात होते. त्यांचा देव अपयशी ठरला होता हेच त्यांना दिसत होते.

एकदा एक तरुण कम्युनिस्ट–नेता आणि इग्नॅशिओ लेनिनच्या स्मारकाजवळ बोलत उभे राहिले होते. त्या तरुणाला सतत खंत वाटायची आपण उशीरा जन्माला आलो याची. १९०५ किंवा १९१७ च्या क्रांतीत भाग घ्यायला मिळाला नाही. इग्नॅशिओ त्याला म्हणाले. अजून खूप क्रांत्या आहेत. तू काळजी करू नकोस. "कसल्या प्रकारच्या?" तो युवक अधीरतेने म्हणाला.

"समोर बघ" इग्नॅशिओंनी लेनिनच्या स्मारकाकडे बोट दाखवले. तेथे समाधीचे दर्शन घेण्यासाठी खेडुतांची रीघ लागली होती. 'लेनिनवर तुझे प्रेम असेल. मी त्याला अगदी जवळून ओळखत होतो. त्याच्या समाधीचे असे प्रदर्शन, पूजा म्हणजे त्याचा अपमान आहे. एक डबाभर पेट्रोल आण आणि एक क्रांती येथून सुरु होऊ दे.'

त्यानं किमान हसावं अशी इग्नॅशिओंची अपेक्षा होती पण युवक चळवळीचं नेतृत्व करणारा तो नेता अक्षरशः पांढराफटक पडला. भीतीनं तो अक्षरशः कापू लागला. त्यानं इग्नॅशिओंना विनंती केली की पुन्हा त्यांनी अशा प्रकारचं वक्तव्य करू नये ते धोक्याचं आहे.

इग्नॅशिओंच्या स्मृतीत तो युवक कायमचा कोरून राहिला. मूर्तीमंत भिती जवळ घेऊन जगणाऱ्या रशियन समाजाचे तो जणू प्रतीक होता. सुराज्य आणू इच्छिणाऱ्या साम्यवादी विचारसरणीचे अपयश दाखवणारा.

## आम्हीही वाचलेलं नाही.

जगभरचे कम्युनिस्ट रशियन कम्युनिस्टांवर भिस्त ठेवून आपला मार्ग आक्रमीत होते. पण त्यांचा जसा संपर्क होईल तसे एक तर भ्रमनिरास होऊन उलटया मार्गाने जायला पाहात होते किंवा रशियनांच्या पावलावर पाऊल ठेवून पक्के निर्ढावलेले, मुर्दाड बनत होते. तत्त्वनिष्ठांचे रुपांतर हुकुमशहात होत होते.

एका अशाच तत्त्वनिष्ठाची हकिकत इग्नॅशिओंनी दिलीय. एकदा तो चीनच्या दौऱ्यावरून परत आला. त्याने खाजगी बैठकीत सांगितले की कम्युनिस्ट इंटरनॅशनलची धोरणे अत्यंत चुकीची आहेत पण पुन्हा दुसऱ्या दिवशी अधिकृतपणे बोलताना तो नेमके उलट बोलला. इग्नॅशिओंना तो म्हणाला, हे असेच बोलायला हवे. याला राजकीय शहाणपणा म्हणतात!

इग्नॅशिओंचा मित्र आणि इटालियन कम्युनिस्ट पक्षाचा नेता टॉग्लिॲट्टी याला या गोष्टींची खंत लागली होती. कम्युनिस्ट नेत्यांचे जे नैतिक अधःपतन होत चालले आहे ते थांबवले पाहिजे असे म्हणताना त्याने गोराथेचे शब्द वापरले तो म्हणाला. 'प्रकाश अधिक प्रकाश!'

पण इग्नॅशिओंच्या डोळ्यादेखतच टॉग्लि-ॲट्टीसुद्धा त्या प्रवाहात फसला आणि पुन्हा त्याचाच एक भाग बनला.

१९२७ मध्ये कम्युनिस्ट इंटरनॅशनलच्या एका महत्त्वाच्या बैठकीत इटालियन कम्युनिस्ट पक्षातर्फे हजर राहण्याचा प्रसंग इग्नॅशिओवर आला खरं म्हणजे तो अधिकार टॉग्लिॲट्टीचा होता. पण टॉग्लिॲट्टी त्या वेळी पॅरीसमध्ये काम करीत होता. आपल्या देशाचे प्रतिनिधीत्व करणारा कोणी तरी हवाच या भावनेनं त्यानं इग्नॅशिओंना बरोबर घेतलं होतं.

सभेचा विषय होता. 'भांडवलशाही युद्धांविरुद्ध कम्युनिस्ट पक्षानी घ्यायचा पवित्रा.' पण तो केवळ वरचा विषय होता. खरा विषय होता तो बुजुर्ग कम्युनिस्ट ट्रॉटस्की आणि झिनोव्हिव यांना खतम करणं. स्टॅलिनला या दोघांची अडचण होत होती तेव्हा यांना प्रथम राजकीय दृष्टया खतम करण्याची जबाबदारी त्याला कम्युनिस्ट इंटरनॅशनलवर टाकायची होती. त्यासाठी सर्व जगाचे प्रतिनिधी बोलवले. सभेच्या आधी सर्व सदस्यांना विषय अगोदरच माहितो असावा या भावनेतून 'इंटरनॅशनल'च्या ऑफिसमध्ये चर्चात्मक बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या.

इग्नॅशिओ आणि टॉग्लिॲट्टी जेव्हा बैठकीला गेले तेव्हा ती अगोदरच सुरू झाल्यासारखे दिसले. जर्मन कम्युनिस्ट थालमान अध्यक्षपदी होता. त्याने एक प्रस्ताव वाचायला घेतला. ट्रॉटस्कीने रशियन कम्युनिस्ट पक्षाच्या राजकीय कचेरीला सादर केलेल्या एका कागदपत्राबद्दल त्याचा निषेध करणारा तो प्रस्ताव होता. हा प्रस्ताव मुख्य सभेत मांडण्यात येणार होता. प्रस्तावाचे वाचन झाल्यावर फिनिश प्रतिनिधी म्हणाला, 'या प्रस्तावाची भाषा फार मवाळ आहे. ज्यानं हे कागदपत्र सादर केले त्याचा श्रमिकवर्गाशी आता कसलाही संबंध राहिलेला नाही असं जाहीरपणे सांगावं.'

त्यानंतर टॉग्लिअॅट्टीचा सल्ला घेऊन इग्नॅशिओ उठले. उशीरा आल्याबद्दल माफी मागून त्यांनी संबंधित कागदपत्र बघायला मागितले. त्यावर थालमान म्हणाला,"आम्ही तरी कोठ वाचलेत ?"

आपण जे ऐकले त्यावर विश्वास न बसून इग्नॅशिओंनी पुन्हा विनंती केली. "ट्रॉट्स्कीचे कागदपत्र निषेधार्ह असतीलही; पण ते वाचल्याखेरीज मी माझे मत देणार नाही, त्यावर थालमान म्हणाला, "आम्हीच नव्हे तर येथे जमलेल्यांमध्ये रशियन कम्युनिस्ट सोडून कोणीच ते वाचलेले नाही !"

इग्नॅशिओ अवाक् झाले. थालमानसारखा एक मान्यवर नेता असं बोलतो आहे याच्यावर त्यांचा विश्वासच बसेना; पण इग्नॅशिओंच्या हरकतीमुळे बैठकीचे कामकाज थांबले होते. स्टॅलिनचे चमचे त्यामुळे संतप्त होऊन आरडाओरडा करू लागले.

मग स्टॅलिन उठून उभा राहिला. त्याने सर्वांना शांत केले. तो म्हणाला, "आमच्या राजकीय कचेरीने ते कागदपत्र गुप्त ठेवण्याचे ठरवले आहे. कारण त्यामध्ये रशियाच्या परराष्ट्र-धोरणाविषयी काही मजकूर आहे."

इग्नॅशिओ म्हणाले, "एखादे कागदपत्र गुप्त ठेवण्याचा तुमचा अधिकार आम्ही नाकारत नाही; पण जेव्हा आम्हाला मत व्यक्त करायचे असते तेव्हा ते वाचल्याखेरीज देणे मला कधीच रुचणार नाही !"

## पक्षाचा त्याग केला

स्टॅलिनच्या चेहऱ्यावरचे स्मित कायम होते; पण त्याचे चमचे विशेषत: फिनिश, बल्गेरियन आणि हंगेरियन प्रतिनिधी इग्नॅशिओ आणि टॉग्लिअॅट्टीच्या दिशेने हातवारे करून असभ्य भाषेत त्यांना शिव्या देऊ लागले. या दोघांमुळे त्यांचे कारस्थान फसू लागले होते. स्टॅलिनने त्यांना शांत केले. तो म्हणाला, "ठीक आहे. एखादा जरी विरोधी असला तरी हा प्रस्ताव येणार नाही. आजची बैठक थांबवू. आज आपल्यातील एकजण इटालियन लोकांना आपल्या अंतर्गत परिस्थितीची कल्पना देईल. मग आपण उद्या बसू."

त्या दिवशी बल्गेरियन कम्युनिस्ट कोलारोव याने त्यांना आपल्या हॉटेलवर बोलवले. प्रथम त्याने हलकी-फुलकी सुरुवात केली आणि लगेच मुद्द्याला हात घातला. "आपण अगदी मनमोकळेपणानं बोलू!" स्मितहास्य करीत त्याने सुरुवात केली. "मी ते कागदपत्र वाचलेत असं तुम्हाला वाटतं का ? नाही. मी ते वाचलेलं नाही. खरं सांगायचं म्हणजे कागदपत्रात मला रस नाही. याच्याही पुढं सांगायचं तर खुद्द ट्रॉट्स्कीनं जरी त्याची प्रत मला पाठवली तरी मी ते वाचायचं नाकारेन ! माझ्या इटालियन मित्रांनो, हा कागदपत्रांचा प्रश्न नाही. इटाली हा विद्यापिठांचा देश आहे हे मला माहिती आहे; पण आपण येथे विद्यापिठात नाही. आपण रशियामधील दोन गटांच्या सत्तेसाठीच्या झगड्यात उभे आहोत ! आपण कोणत्या गटाची बाजू घ्यायची ? हा प्रश्न आहे. कागदपत्र त्यात येत नाहीत. अपयशी ठरलेल्या चीनच्या क्रांतीबद्दलचे ऐतिहासिक स्थान काय असा प्रश्न नाही. दोन तडजोड नको असलेले शत्रू गट. त्यांची स्पर्धा आहे. आपण एक बाजू घ्यायला पाहिजे. मी ती घेतलीय. मी बहुमताच्या बाजूनं आहे. अल्पमतानं काय आणलंय, कोणते कागदपत्र सादर केलेत यात मला रस नाही. पुन्हा सांगतो मी बहुमताच्या बाजूनं आहे. कागदपत्रात मला रस नाही !' एखाद्या शाळा मास्तरासारखं त्यानं इग्नॅशिओंकडे पाहिलं. आपल्या बोलण्याचा परिणाम तो अजमावून पाहात होता आणि त्यांना उद्देशून तो म्हणाला, "माझं म्हणणं मी नीट मांडलं ना ?"

पण कोलारोवच्या नाट्यपूर्ण निवेदनाचा इग्नॅशिओवरही परिणाम झाला नाही की टॉग्लिअॅट्टीवर. त्याच्या म्हणण्यापुढे मान तुकवण्याचे दोघांनीही नाकारले. त्यांना निरोप देताना कोलारोव म्हणाला, 'तुम्ही दोघे अजून बच्चे आहात. राजकारण म्हणजे काय हे तुम्हाला अजून समजलेलं नाही.

दुसऱ्या दिवशी त्यांना स्टॅलिनने विचारले, 'तुमचे आता समाधान झालेय का ? एखादा प्रतिनिधी जरी विरुद्ध असला तरी ठराव आणता येणार नाही. ट्रॉट्स्कीविरुद्धचा ठराव एकमताने संमत झाला पाहिजे.'

टॉग्लिअॅट्टीचा सल्ला घेऊन इग्नॅशिओ म्हणाले, 'ठराव विचारात घेण्यापूर्वी संबंधित कागदपत्र आम्हाला बघायला मिळाले पाहिजेत.'

पुन्हा आरडाओरडा चालू झाला; पण स्टॅलिन मात्र शांत होता. त्याने सांगितले की, तो ठराव आता मागे घेण्यात येत आहे. स्टॅलिनचे चमचे मात्र चांगलेच खवळले होते. सर्वांनी ठरविले की, इटालियन कम्युनिस्टांच्या या प्रवृत्तीवरून स्पष्ट दिसते की, त्यांच्या लढ्याची दिशा चुकीची आहे. मग त्यावर बैठक झाली. चर्चा झाली आणि त्यामध्ये सिद्ध झाले की, इटालियन कम्युनिस्ट पक्षाची ही मूळ घटना आहे तीच भांडवलशाही, बूर्झ्वा विचाराने प्रभावित आहे.

इग्नॅशिओ आणि टॉग्लिअॅट्टी थक्क झाले. कम्युनिस्ट इंटरनॅशनलचे सदस्य असे करू शकतात, वागू शकतात हे धक्कादायक होते. सत्य बोलल्याबद्दल इटालियन पक्षाचेच मूळ काढले जाते हे सहन न होण्यासारखे होते. त्यांनी दोघांनी मिळून आपल्या खोलीत परतल्यावर रशियन कम्युनिस्ट पक्षाच्या राजकीय कचेरीला आपल्या वागण्याचे स्पष्टीकरण देणारे एक पत्र लिहिले. हे पत्र बुखारिनने घेतले आणि ताबडतोब त्यांना परत बोलावून घेतले. पत्र परत घेण्याचा सल्ला दिला. अगोदरच त्यांच्या वागण्यामुळे जो काही गोंधळ निर्माण झालेला आहे त्यात आणखी भर या पत्राने पडेल असं तो म्हणाला.

इग्नॅशिओचं मन अत्यंत उद्विग्न झालं. देशोदेशी कम्युनिस्ट तत्वज्ञानासाठी जे लोक बलिदान करत होते, तुरुंगवास हालअपेष्टा सहन करीत होते त्याचे फलित हेच काय ? त्यांच्या त्यागाची हीच निष्पत्ती काय ?

मास्कोहून निघण्यापूर्वी त्यांची आणि एका इटालियन कामगाराची भेट झाली. इटालीमधील शिक्षा चुकवण्यासाठी तो रशियामध्ये राहात होता. त्याच्याकडून आणखी बरेच इग्नॅशिओंना समजले. रशियातले कामगार फॅक्टरी चालवणाऱ्यांच्या दयेवर जगतात. त्यांचे हितसंबंध जतन करण्यासाठी कोणतीही प्रभावी संघटना नाही. ( कारण ते कामगारांच्या राज्यातील कामगार ! त्यांना ना संपाचा अधिकार ना काही. ) भांडवलशाही देशातील कामगार रशियन कामगारांपेक्षा सुरक्षित आहेत.

इटलीकडे परत जाण्याचा इग्नॅशिओ थोडा काळ बर्लिनमध्ये थांबले. तेथे सहज वृत्तपत्र चाळताना त्यांना धक्काच बसला. कम्युनिस्ट इंटरनॅशनलच्या सभेत ट्रॉट्स्कीचा निषेध झाल्याची बातमी त्यात होती आणि स्टॅलिनने तर त्यांच्या समक्ष प्रस्ताव मागे घेतल्याची घोषणा केली होती.

त्यांनी थालमानशी संपर्क साधला. थालमानने त्यांना सांगितले की, अत्यंत तातडीच्या प्रसंगी कोणताही ठराव संमत करून घेण्याची

कम्युनिस्ट इंटरनॅशनलच्या मुख्यांना पूर्ण मुभा आहे. बातमीच्या खुलाशात म्हटले होते की, अमेरिकन, झेक आदि कम्युनिस्टांनी ट्रॉटस्कीच्या कागदपत्रांची कठोर शब्दात निर्भर्त्सना केली होती. म्हणजे शेवटी ते कागदपत्र खुले तरी करण्यात आले होते.

नाही. थालमान मिस्किल हसत म्हणाला. 'त्यांनी ते वाचलेले नाही. यावरून तुमच्या लक्षात आले असेल. कम्युनिस्ट इंटरनॅशनलची शिस्त अशी कडक आहे. एकदा कार्यकारिणीने ठरवले की, मग कोणी शंका घ्यायची नाही. फक्त सूर ओढायचा.

इग्नॅझिओ आता थक्क होण्याच्याही पलीकडे गेले होते.

त्यानंतर इग्नॅझिओ काही काळ आजारी होते नंतर त्यांनी कम्युनिस्ट पक्षाचा त्याग केला.

पण ज्या दिवशी त्यांनी पक्षाचा त्याग केला 'तो दिवस माझ्या आयुष्यातील अत्यंत सुखाचा दिवस. माझ्यागत तारुण्याबद्दलच्या प्रदीर्घ शोकाचा दिवस.' त्यांनी कम्युनिस्ट पक्षात राहून कार्य केलेले दिवस विसरता येण्यासारखे नव्हते. त्यामुळे त्यांच्या सारखे माजी कम्युनिस्ट झटकन ओळखू येतात. त्यांच्या अख्ख्या आयुष्यावर त्याचा कायमचा ठसा उमटलेला असतो; पण इग्नॅझिओंनी इतर माजी कम्युनिस्टांशी संपर्क टाळला. त्यातील बरेच हुकुमशाही प्रवृत्तीचे, कम्युनिस्टांचे सगळे दोष असणारे; पण फायदा न मिळणारे असेच बनत गेलेले त्यांनी पाहिले.

कारण कम्युनिस्ट नेत्यांनी विश्वासघात केला, भ्रमनिरास केला तरी मनात फुललेले समाजवादाचे स्वप्न कायमच राहिले. त्या स्वप्नाने फुलवलेले आदर्श समाजाचे चित्र इग्नॅझिओंच्या मनात ठसून राहिले. ही स्वप्ने काल मार्क्सच्या अगोदर जन्माला आलेली आहेत. व्यक्ती मरतील, चळवळी ओसरतील; पण मूल्ये चिरंतन राहतील असं त्यांना वाटतं आणि या मूल्यांतूनच कधी तरी घडपडणारा मानवी समाज अशाश्वत अशी संस्कृती बनवेल अशी इग्नॅझिओंच्या कविमनाला आशा आहे.

□

**(Ignazio Silone यांच्या The God that Failed मधील निबंधावर आधारित)**

## पुस्तके

# माओनंतरचा चीन

१९७९ मध्ये भारताचे त्या वेळचे परराष्ट्रमंत्री अटलबिहारी वाजपेयी चीनच्या अधिकृत दौऱ्यावर गेले होते. त्यांच्याबरोबर असणाऱ्या भारतीय पत्रकारांच्या तुकडीत 'दै मुंबई सकाळ'चे संपादक माधव गडकरी यांचा समावेश झाला होता. तब्बल २७ वर्षांनी मराठी पत्रकाराला चीनला जाण्याची संधी मिळाली होती. माधव गडकऱ्यांनी या चीनभेटीत जे बघायला मिळाले ते स्वतःच्या ओघवत्या आणि परखड भाषाशैलीत उतरवून काढले. त्यासाठी अनेक संदर्भही दिले आणि 'माओनंतरचा चीन' तयार झाले.

या नावामुळे पुस्तकाच्या अपेक्षाही बऱ्याच वाढल्या. खुद्द माधव गडकऱ्यांना त्याची जाणीव आहे. ते प्रस्तावनेत म्हणतात, 'माओच्या निधनाने चीनच्या क्रांतिकारी जीवनाचे एक पर्व संपले, दुसरे सुरू झाले. एका महान नेत्याच्या मृत्यूनंतरही त्याच्या छायेत राष्ट्र वावरत असते. स्थित्यंतराचा हा काळ मोठा संघर्षाचा असतो. त्याचे चित्र या पुस्तकात दिसावे अशी अपेक्षा आहे... ...चीनचा परिचय आपल्याला असावयास हवा. त्या देशाशी भारताला एक दिवस मैत्री करावीच लागेल. ती एक ऐतिहासिक नसली तरी भौगोलिक गरज आहे...'

हे पुस्तक वाचताना गडकऱ्यांच्या या भूमिकेचे महत्त्व जाणवते. शिवाय चीनविषयक मराठी भाषेतील एक संदर्भग्रंथ म्हणूनही या पुस्तकाचे महत्त्व आहेच. गडकऱ्यांनी हे पुस्तक सलग न लिहिता, विषयाच्या व लेखनाच्या सुलभतेसाठी, त्याची स्वतंत्र प्रकरणे पाडली आहेत. या प्रकरणांना सुसंगत क्रम नाही. तरीही प्रत्येक प्रकरणाचे वेगळे औचित्य आहेच.

या पुस्तकात एकूण १५ प्रकरणे आहेत. त्यातील 'चीनमधील शहरे' हे प्रकरण वगळता इतर सर्व प्रकरणांमध्ये राजकीय–सामाजिक ऊहापोहच प्रामुख्याने आहे आणि त्यामुळेच हे पुस्तक अधिक जिवंत झाले आहे.

चीनमधील शिक्षणव्यवस्था, तेथील कम्यून यांमुळे गडकरी खूपच प्रभावित झाल्याचे जाणवते. विशेषत: चीनमध्ये बेकार आणि भिकारी कोठेही आढळले नाहीत याचा प्रभाव आणि त्यामागील सामाजिक रचनेचा विचार गडकऱ्यांनी सविस्तरपणे मांडला आहे, तर चीनमधील 'पीपल्स डेली' या कम्युनिस्ट पक्षाच्या अधिकृत मुखपत्राची बरीच माहिती देऊन त्यांनी चिनी कम्युनिस्ट पक्ष आणि तेथील वृत्तपत्रे यांमधील परस्पर संबंधांवर चर्चाही केली आहे. आपल्या वृत्तपत्रांच्या संदर्भात 'पीपल्स डेली'चे अंक अळणी वाटतात असे म्हणत असतानाच, लोकांच्या मन:स्थितीचे व परिस्थितीचे दर्शन मात्र त्यात अधिक आढळते अशी मुक्त स्तुतीही गडकऱ्यांनी केली आहे.

भारत–चीन संबंधांबाबत गडकऱ्यांनी अतिशय अभ्यासपूर्ण लिखाण या पुस्तकात केलेले आहे. भारत–चीन सीमाप्रश्न नक्की काय आहे व त्यावर काय तोडगा निघणे शक्य आहे हेही त्यांनी खुलासेवार लिहिलेले आहे. 'भारत–चीन मैत्रीची किंमत अक्साई चीन' या प्रकरणात तर त्यांनी तडजोड केल्याशिवाय पर्याय नाही असे निग्रहपूर्वक मांडले आहे. तसेच चीन–अमेरिका–पाकिस्तान यांच्यातील मैत्रीचे विश्लेषणही फार सुरेख केलेले आहे. वाजपेयींचा चीन–दौरा सुरू असतानाच, चीनने व्हिएतनामवर आक्रमण केले. त्यामुळे वाजपेयी हा दौरा अर्धवट टाकून मायदेशी परतले–त्या साऱ्याचे अतिशय सूक्ष्म वर्णन गडकऱ्यांनी केले आहे. विशेषत: 'आपण यापुढे आपल्या देशाचेच हस्तक बनले पाहिजे' हा सूर त्यांनी अतिशय स्पष्टपणे या निमित्ताने मांडला आहे.

चीनच्या अंतर्गत परिस्थितीची माहितीही त्यांनी विविध प्रकरणांमध्ये खूपच सविस्तरपणे दिली आहे. चौएनलाय व माओ यांच्यानंतर बदललेले चिनी नेतृत्व, त्यांची राजकीय धारणा, त्यामागचा राजकीय इतिहास, माओ पत्नीचे भिन्न राजकारण व त्याचे पडसाद, चीनची अर्थव्यवस्था आणि आजही जाणवत राहणारे माओचे मोठेपण याचा अतिशय सखोलपणे मागोवा त्यांनी घेतलेला आढळतो. या पुस्तकातील हा अतिशय महत्त्वाचा भाग आहे.

यामध्ये गडकऱ्यांनी स्वत:ला आलेल्या काही उत्कट अनुभवांची नोंदही खूप समर्थपणे उभी केली आहे. एका चिनी कुटुंबियात त्यांनी काही काळ घालवून बरेच बारकावे टिपले आहेत.

' उद्याचा चीन, उद्याचा भारत ' या शेवटच्या प्रकरणात त्यांनी वादग्रस्त अक्साई चीनचा प्रश्न पुन्हा सखोलपणे चर्चिला आहे. भारतातच केवळ लोकशाही टिकवायची नाही तर ती उद्याच्या चीनमध्ये प्रगल्भ स्वरूपात अवतरावी हे आपले उद्दिष्ट असावयास हवे. उद्याचा भारत व उद्याचा चीन एकमेकांचा मित्र बनला तर दोनशे कोटी लोकांना स्वास्थ्य लाभेल ' असे म्हणून त्यांनी या पुस्तकाचा शेवट केला आहे.

## तात्त्विक विवेचन नाही

या पुस्तकात गडकऱ्यांची अभ्यासू वृत्ती आणि चौफेर दृष्टी जशी पदोपदी जाणवते तसाच भारतीय संदर्भही वारंवार आढळतो. या पुस्तकात अनेक निमित्तांनी भारतीय राजकीय नेतृत्वावर त्यांनी परखड टीकाही केली आहे तर चीनशी तुलना करताना, भारतीय परिस्थितीतील विविध क्षेत्रांतील दैन्याची बोचही त्यांनी तेवढ्याच तीव्रतेने दाखवली आहे. काही ठिकाणी ते कमालीचे हळुवारही झालेले दिसतात.

मात्र पुस्तकात काही ठिकाणी त्यांची वाक्यरचना नजरेला खुपते. उदा. प्रकरण १४ पृष्ठ १३९ वर ' दिल्लीत असतानाच कलकत्तामार्गे रशियाचा टेहेळणी पथकाच्या सामुग्रीच्या पेटचा नेपाळला कशा चालल्या होत्या याचे वृत्त ' हिंदुस्थान टाइम्स 'ने दिले होते. अशा सदोष वाक्यरचनेमुळे अडखळायला होते. पृष्ठ १५० वर सुरू झालेला परिच्छेद, भली मोठी झेप घेऊन पृष्ठ १५४ वर संपतो, तेव्हा या महाकाय परिच्छेदात सुमारे १३००–१४०० शब्द सामावलेले सापडतात. ही देखील नक्की दमवणारी गोष्ट आहे. अर्थात या पुस्तकातील महत्त्वाच्या आशयाला यामुळे बाधा पोहोचत नाही; पण तरीही लेखनसुलभता असती तर बरे झाले असते.

या पुस्तकातील जो मूळ गाभा आहे, त्याची तात्त्विक चर्चा मात्र या पुस्तकात कोठेही आढळली नाही. माओचा चीन आणि माओनंतरचा चीन यामध्ये नक्की काय फरक आहे आणि तो का आहे याचे विवेचन गडकऱ्यांनी केले असते, तर उद्याचा चीन कसा असेल याची अधिक स्पष्टता येऊ शकली असती. पृष्ठ ११७ वर ' देवपण गमावलेला लोकनेता माओ ' या प्रकरणात याचा ओझरता उल्लेख गडकऱ्यांनी केला आहे. ' माओचं देवपण संपविण्याचा जोरदार प्रयत्न चालू आहे... एक गोष्ट खरी की, माओला आधुनिक चीन नको होता. यंत्रापेक्षा माणसाच्या दोन हातावर त्यांचा भर होता. तो कालखंडही माओबरोबरच संपला. ' हे लिहिल्यावर याचे विश्लेषण करणे गरजेचे होते असे वाटते.

माओनंतरच्या चीनमध्ये नक्की जे घडत आहे, त्याचे मूल्यमापन करताना, चीनमधील बदलत्या उत्पादनासंबंधीची प्रक्रिया समजावून घेतली पाहिजे. समाजवादाच्या संपूर्ण ऐतिहासिक कालखंडामध्ये वर्गसंघर्ष चालू असतो आणि तो लढविण्यासाठी कम्युनिस्टांनी क्रांतिकारक राजकारणाला समाजजीवनात सर्वप्रभावी बनवले व टिकवले पाहिजे याचा अर्थही चीनच्या संदर्भात नीट समजावून घेतला पाहिजे.

क्रांतीनंतर मूलभूत प्रश्न उभा राहतो तो जुनी उत्पादनपद्धती बदलण्याची प्रक्रिया सुरू करणे व ती साम्यवादी उत्पादनरचनेपर्यंत तडीला नेणे. उत्पादनशक्ती व उत्पादनसंबंध यांनी मिळून उत्पादनपद्धती बनलेली असते. उत्पादनशक्तींचा विकास घडवणे म्हणजे उद्योगधंदे, शेती, तांत्रिक प्रगती, शिक्षण, आरोग्यादी सुविधा व लोकांचे जीवनमान आणि कार्यक्षमता यांचा विकास करणे; पण हे तर भांडवली विकासातही होत असते. समाजवादामध्ये याबरोबरच माणसा-माणसामधील उत्पादनसंबंध सतत बदलत जाणे देखील अभिप्रेत असते.

या दोन्ही प्रक्रिया नेहमी सुसंगतपणे एकत्र पुढे जातीलच असे नाही. त्यांच्यात विरोधही उत्पन्न होतो; पण हे असे चालू द्यायचे नसेल तर उत्पादनसंबंधात बदल घडवून आणण्याचे जाणीवपूर्वक भान कोणी कसोशीने ठेवायची गरज असते, हे भान लोकांना सतत पोचवायचे व समाजजीवनातील मुरलेल्या जुन्या आणि नव्या निर्माण होणाऱ्या भांडवली प्रवृत्तींविरुद्ध लढायला त्यांना उद्युक्त करायचे काम समाजात कोणत्या तरी शक्तीने सातत्याने करावे लागते. कारण त्याशिवाय केवळ उत्पादनशक्तींचा विकास घडत जाईल व उत्पादनसंबंधात इष्ट व साम्यवादाकडे जाणारा बदल घडत जाण्याची खात्री उरणार नाही. समाजवादाच्या संपूर्ण ऐतिहासिक कालखंडामध्ये वर्गसंघर्ष चालू असतो आणि तो लढविण्यासाठी कम्युनिस्टांनी क्रांतिकारक राजकारणाला समाजजीवनात सर्वप्रभावी बनवले व टिकवले पाहिजे याचा हा अर्थ आहे.

उत्पादनशक्तींचा विकास व उत्पादनवाढ यापेक्षा उत्पादनसंबंध बदलण्यावर माओने सतत भर दिला. समाजरचनेला स्थैर्य व सुव्यवस्थित पक्का आकार येण्यापेक्षा वर्गसंघर्ष सतत तेवत ठेवण्यावर भर दिला. वैचारिक, सांस्कृतिक, राजकीय शिक्षणातून नवा माणूस घडविण्यावर भर दिला. सांस्कृतिक क्रांतिद्वारा आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक बाबींमध्ये क्रांतिकारक धोरणे घेऊन नवी मूल्ये व नवी मानसिकता असणारा नवा माणूस आणि त्याचा नवा समाज निर्माण करणे, किमान ही प्रक्रिया जोराने सुरू करणे हा त्याचा उद्देश होता. एका अर्थी सांस्कृतिक क्रांतीमागचा व एकंदर समाजवादी संक्रमणाबाबतचा माओचा सर्वसाधारण विचार हा होता; पण चीनच्या तत्कालीन विशिष्ट परिस्थितीत तो राबविण्यात त्याला अपयश आले. त्याच्याकडून गंभीर चुकाही घडल्या.

आजचा चीन या सर्वांपासून वेगळा घडविण्याचा प्रयत्न चालू आहे. आज चार आधुनिकीकरणांद्वारे चीनचा आर्थिक, तांत्रिक व लष्करी विकास वेगाने घडवून आणण्याची चीनचे सर्वेसर्वा डेंग यांची योजना आहे. साम्यवादाकडे वाटचाल होण्याच्या दिशेने माणसात आणि माणसा–माणसातल्या संबंधात क्रांतिकारक बदल घडवून आणण्याच्या पैलूवर या विकासामध्ये फारसे महत्त्व राहिले नाही. माओनंतरच्या चीनचे हे अधिक महत्त्वाचे स्थित्यंतर आहे. माधव गडकरींच्या कुशाग्र आणि चौफेर लेखणीतून ' माओनंतरच्या चीन ' चा हा महत्त्वाचा पैलू निसटला हे आश्चर्यच आहे. अशा अभ्यासू व महत्त्वपूर्ण पुस्तकात तात्त्विक विवेचन नसावे हे काही खरे नाही.

—प्रवीण वाळिंबे

माओनंतरचा चीन
माधव गडकरी
श्रीविद्या प्रकाशन
किंमत २० रुपये.

# रंगभूमी

## मुंबैची हवा

हवा. मग ती मुंबईची असो अथवा पुण्याची अथवा दिल्लीची. थोडयाफार फरकाने सारखीच. सध्या मुंबईची हवा बेफाम पाऊस, महानगरपालिका-पुरस्कृत सामान्य नागरिकांना सुखदायी प्रवास करण्यास भाग पाडणारे आरामदायी खड्डे, मध्यरेल्वेची सुरेख सेवा आणि कोसळणाऱ्या आकाशदीपसह मुंबई म. पा. आणि प. रेल्वे ह्यांचे सलोख्याचे संबंध आणि आवो प्यार करेंवी सोवळी पोस्टरे.

ही झाली जनरल हवा; पण मुंबैची अशी खास हवा असते. एक सिनेमाची आणि दुसरी नाटकाची. सिनेमाच्या हवेचा टापू आमच्या आवाक्यात नसल्याने आम्हाला नाटकाची 'नाटकी हवा' मानवते. नाटकाच्या हवेचा तसा शरिरावर परिणाम होत नाही, मनावर तर नाहीच नाही. शिवाजीमंदिरचा परिसर ह्या नाटकी हवेनं भारलेला आहे, ओथंबलेला आहे.

गेल्या महिन्या-दीड महिन्याची हवा तर पावसाळीच आहे. हवा पावसाळी असली तरी नाटकवाल्यांना त्याची तेवढी भीती नाही.

## रेखा आणि सन्नाटा !

एका शुभ्रसकाळी वर्तमानपत्रात जाहिरात टपकली की, 'सेव्हन कलर्स' हा नव्या वाद्यवृंदाचे उद्घाटन सुप्रसिद्ध अभिनेत्री 'उमराव-जान' रेखा करणार म्हणून. वाटलं होतं की शिवाजीमंदिरमध्ये गर्दीचा पूर येईल ! लोकांना आवरण्यासाठी मुंबईच्या सज्जन पोलिसांना गांधींची शपथ तोडून सौम्य लाठीमार करावा लागेल. शिवाजीराजे भोसले मंदिरवाले ह्यांनाही क्षणभर रेखाचा मत्सर वाटल आणि त्या उद्वेगाच्या क्षणी ते "अशीच आमुची आई असती तर आम्ही ही सुंदर झाला असतो," ही प्रसिद्ध गीततबकडी वाजवून जातील! सर्व डोअरकीपरांना तिकटा फाडून फाडून घाम फुटेल, प्रकाश चायवाल्याला रेखासाठी चहा बनवायची संधी मिळेल, मोहनराव वाघांनाही आपल्या पुढल्या सप्तरंगी ओजस्वी नाटकाच्या मुहूर्ताला रेखाला बोलवावंसं वाटेल... पण कसलं काय नी कसलं काय... एवढी मोठी रेखा! ती बापडी आली नाटकवाल्यांच्या मंदिरात मागील दारातून, बसली एक गाणं अैकत आणि दोन शब्द मधाळ आवाजात हलकेच बोलून निघून गेली, उमरावजान रेखाच्या स्वागताला गर्दी नव्हती, दर्दींची मोठी संख्याही नव्हती. होता तो भन्नाट सन्नाटा !...

## एन्. एस्. डी. कृत पद्मिनी

एव्हाना महाराणी पद्मिनीचे पाच-सहा प्रयोग झाले असतील. स्व. कै. पु. भा. भावे ह्यांचे महाराणी पद्मिनी हे नाटक नाट्यसंपदेनं नव्या संचात जुन्या कपडयांसह जुन्या म्यूझिकलसह सादर करण्याचे ठरविले. तेव्हाचे दिग्दर्शक होते सेन्सॉरफेम दारव्हेकरमास्तर. तेव्हा स्वत: प्रभाकर पणशीकर, आशा काळे, शशिकांत निकते आदी मंडळी होती.

नव्या संचात जान्हवी खांडेकर, राजीव, शशिकांत निकते आणि सविता प्रभुणे आहेत. दिग्दर्शन (?) शशिकांत निकत्यांचे. सांगायची गोष्ट काय की, वाईच्या ह्या दिल्ली व्हाया एन्. एस्. डी. वाल्या सविता प्रभुणेची मुंबईतल्या काही जाणकार डोक्यांनी डोकं चालवून (?) मजबूत हवा केली की, ती हे आहे, ते आहे, तिच्यात एवढे गुण आहेत, तिच्यात अमुकतमुक नटीला झाकोळून टाकणारी ही आहे, तिला डॉक्टर लागू आपल्या नव्या नाटकात घेताहेत, सदाशिव आमरापुरकरही नव्या नाटकात घेतोय, सई परांजपे म्हणालीही म्हणे की आधी भेटली असती तर 'बिच्छू' मध्ये शबानाऐवजी तुलाच घेतली असती!" पण मित्रहो, पद्मिनीचा पहिला प्रयोग शिवाजीला झाला तेरा तारखेला. तेव्हा वाटलं शिवाजीमंदिरात पद्मिनीची हवा असणार म्हणून म्हटलं, चला मराठी व्यावसायिक रंगभूमीला देखणी समर्थ अभिनेत्री मिळाली. बुढया नायिकांना तरी बघायचे दिवस संपले !... पण हाय रे (रमेश) देवा, प्रयोग झाल्याच्या दुसऱ्या दिवशी जो तो म्हणू लागला की, 'ती आली. तिला पाहिलं... ती आहे देखणी, कामही सुरेख करते, स्टेजवर वावरतेही सुरेख; पण... पण काय हो इतिहासात कधी वाचलं नव्हतं की रूपसुंदरी पद्मिनी 'घोगरी' होती!' आता बोला !

## अंबिका भक्ती बर्वे

'भक्ती बर्वे तालमीत बिझी आहे' अशा ललकाऱ्या शिवाजीमंदिरच्या दारावरचे भालदार-चोपदार दुबेच्या मराठीत 'शांतता-कोर्ट चाऽऽलू आऽऽहे' च्या धर्तीवर देताना अैकलं आणि क्षणभर आश्चर्य वाटलं की सगळे लोक तालमीत बिझी असताना बेबी बर्वेची एवढी जाहिरात का? कुठला एवढा सामान्य—सॉरी—असामान्य रोल भक्तिभावाने करतेय. मग कळलं ती आता 'पुरुष' करतेय. ती फुलराणीला हँडस्‌अप करून पळा पळा पुढे कोण पळते अशी बेट लावून चोख पुरुषापर्यंत मजल—ग्रेट... रीमा लागू काही महिन्यांच्या सुट्टीवर गेली असतानाच नाटक बंद पडणार असतानाच भक्तीनं ही भूमिका स्वीकारली कशी ह्याचेच आश्चर्य वाटतय सगळयांना. भक्ती आणि रिप्लेसमेंट अशक्य... नामुमकीन.. नेव्हर... पण आता तर भक्ती चक्क रिप्लेसमेंट करतेय आणि तीही रीमा लागूची... सगळयांना आश्चर्याचे धक्क्यावर धक्के बसताहेत...

पण कुणी तरी म्हणालं बुवा की, 'पुढल्या नाटकात मेन रोल देणार असशील मोहन, तर करेन ही रिप्लेसमेंट' असं भक्तीनं म्हणे मोहनराव सेन्सॉरप्रेमी तोंडवळकरांना सांगितलं. ते काहीही असो; पण भक्तीला अंबिकेच्या तडफदार भूमिकेत पहाणं म्हणजे चांगलाच अनुभव असणार तो हे मान्य करायलाच हवं, नाही कां ?

—नाटक्या

# नाट्यपंढरी



## ◻ किर्लोस्करांची शेती !

**ज्यांच्या कवित्वकमला बुध-भृंग झाले**
**अैकूनिया वहुत मानसि दंग झाले**
**ज्यांचे सुनाम बरवे बळवंतराय**
**त्यांच्या गुणावरुनि हा उतरीन काय**

कोण्या एका कवीच्या या चार ओळीत अण्णासाहेब किर्लोस्करांची थोरवी स्पष्ट होते. संस्थापक, नट, नाटककार म्हणून अण्णांनी अलौकिक यश संपादन केले; पण अण्णा कधी उतले-मातले नाहीत. सहकाऱ्यांना कधी दुखावले नाही. थोरांची संगत सोडली नाही. पहिल्याच वर्षीच्या शाकुंतलाच्या तीन खेळांच्या उत्पन्नातून, बुधवारवाड्याला लागलेल्या आगीत भस्मसात झालेल्या 'नेटिव्ह जनरल लायब्ररीला' ग्रंथखरेदीसाठी दोनशे रुपये दिले. गणेश वासुदेव जोशी यांच्या स्मारकासाठी पन्नास रुपये दिले. इतकेच नाही, तर आपल्या सहकारी मित्रांना घड्याळे नि रोख बक्षिसे दिली.


आर्यभूषण छापखान्याची मालकी टिळक, आगरकर, आपटे यांमारख्या थोर मंडळींकडे होती. प्रत्येक गोष्टीत देशहित हेच त्यांचे ध्येय होते. कोल्हापूरकर-बर्वे-प्रकरणी ही मंडळी खर्चाने जेरीस आली होती. अशा सत्कार्याला वाहून घेतलेल्या आपल्या स्नेही-हितचिंतकांना आपण मदत केलीच पाहिजे या भावनेने अण्णांनी शाकुंतल, सौभद्र या पुस्तकांचे हक्क ( rights ), ही पुस्तके सदर मंडळीस मी शेत म्हणून दिली आहेत' अशा शब्दांत वर्णन करून, टिळक-आगरकरांना बहाल केले. या नाटकांच्या आठ-आठ दहा-दहा आवृत्त्या निघून या मंडळींना खूपच आर्थिक मदत झाली. अण्णांनी पेरलेले हे बीज नि निर्माण केलेली भावना, नाटकवाल्यांत चांगलीच रुजली. किर्लोस्कर, गंधर्व, बलवंत, ललितकलादर्श या मातब्बर नाटक मंडळ्यांनी तर समाजोपयोगी संस्थांना मुक्त हस्ताने मदत केलीच; पण त्या वेळच्या दहा-पंधरा छोट्या-मोठ्या नाटककंपन्याही आपआपल्या कुवतीप्रमाणे गावोगावींच्या संस्थांना, धर्मार्थ खेळ करून हातभार लावितच.

## ◻ व्रतपालन

अण्णासाहेब किर्लोस्कर हे भाऊरावांचे दैवत नि किर्लोस्कर मंडळी हे त्यांचे सर्वस्व. मग त्यासाठी ते वाटेल ते करायला तयार असत. अण्णांची नि कंपनीची प्रतिष्ठा राखणे, तिची कीर्ति वाढविणे हाच त्यांचा ध्यास होता, व्रत होते. त्यांना अनेकांकडून गाण्याची निमंत्रणे येत. थोरामोठ्यांकडून खूप आग्रह होई. खूप मोठ्या बिदागीचे आमिष दाखविले जाई. पण आपण बाहेर गाण्याच्या बैठकी करू लागलो तर कंपनीच्या खेळावर, उत्पन्नावर त्याचा परिणाम होईल, कंपनीच्या एकोप्यासही कदाचित तडा जाईल या भावनेने त्यांनी कधीही बाहेर गाण्याच्या मैफलीचे आमंत्रण स्वीकारले नाही. कधी राजदरबारी गायले, ते कंपनीच्या हितासाठीच ! ते नेहमी म्हणत, 'भाऊराव पहायला मिळतील, त्यांचं गाणं ऐकायला मिळेल ते किर्लोस्कर कंपनीच्या स्टेजवरच.' आता 'नाइट'च्या जमान्यात या भावनेचे मोल कळणे कठीण आहे.

## ◻ आता शालू नेसणार नाही

भाऊरावानी आपल्या शकुंतला, सुभद्रा, मंथरा या भूमिकांनी प्रेक्षकांना वेड लावले होते. सतत तेरा-चौदा वर्षे, या भूमिका 'प्रतिक्षणिची दे नवी रुची' अशा अपूर्व नवलाईने ते वठवीत होते. पण आता आपण स्त्रीभूमिका करण्यास योग्य नाही, असे त्यांच्या मनाने घेतल्याने, त्यांनी पुरुषभूमिका करण्याचा निर्णय घेतला. पण कंपनीपुढे महत्त्वाचा प्रश्न होता की, त्यांच्या जागी सुभद्रा, शकुंतला म्हणून कुणाला उभे करायचे ? भाऊरावांच्या सुभद्रेशिवाय प्रेक्षक सौभद्र पहायला येतील का ? म्हणूनच कंपनीने जाहिरात दिली. 'भाऊरावांच्या भूमिका करण्यास उत्तम स्त्रीपार्टी हवा. गुणी नटाला महिना पाचशे रुपये (रु. ५००/-) पगार देऊ' रसिकहो, १८९६-९७ चा हा सुमार ! स्त्रीभूमिकेसाठी, कंपनीची पाचशे रुपये पगार देण्याची तयारी, म्हणजे भाऊरावांच्या स्त्रीभूमिकेची केवढी अपूर्वाई नि महती कंपनीला होती, याची तुम्हाला सहज कल्पना येईल. दुर्दैवाने,तशा भाऊरावसम सुंदर कलावंताची जोड, ते कोदंड, चारुदत्त, पुंडलिक अशा पुरुषभूमिका करू लागल्यावर त्यांना मिळाली नाही. म्हणूनच त्यांनी सुभद्रा रंगवावी, मंथरा उभी करावी, म्हणून मोठमोठी माणसे मध्यस्थी करीत. पण भाऊरावांनी आपला निर्णय कधीच बदलला नाही. तसा अभिजात कलावंत किर्लोस्कर मंडळीच्या रंगमंचावर बालगंधर्वांच्या रुपाने आला. पण फार उशीरा. भाऊराव गेल्यावर चार-पाच वर्षांनी. भाऊराव-बालगंधर्व या युतीचा योग कंपनीच्या नि रसिकांच्या कुंडलीत आधी आला असता तर ?



चित्रपट

# बेनेगलची नवी 'मण्डी'

मध्यंतरीच्या काळात श्याम बेनेगल सिनेमा करत होता, ह्यावर विश्वास बसणंच कठीण झालं होतं, इतका तो सरकारी कमिट्या, भारतीय सिनेमाचे भवितव्य आणि मास्को सहकार्याने निघणारा 'नेहरू' ह्यांच्यामध्ये गर्क होता. त्याच्या 'आरोहण'ला राष्ट्रीय पारितोषिक मिळालं एवढंच; पण तो कुठे झिम्बाब्वेला वगैरे रिलीज झाला ते श्यामच जाणे !

सांप्रत त्याचा 'मण्डी' नावाचा चित्रपट त्याने वेळात वेळ काढून पूर्ण केलाय आणि लौकरच रिलीजही होईल. मण्डी पुन्हा बेनेगलचा वेगळ्या विषयावरचा चित्रपट. आतापर्यंत बेनेगलने सामाजिक आशयांवर भर देऊन चित्रपट-निर्मिती केली. मंथनच्या धाडसाला तोडच नव्हती. मण्डी हेदेखील त्याचे ताजे धाडसच म्हणायला हवे. कारण 'वेश्या' सिनेमा–विषय म्हणून खूपदा रजतपटावर येऊन गेल्या आहेत. भूतकाळातला 'कुंकू' आणि अगदी आजचा 'उमराव जान' ही काही उडती उदाहरणे सहज आपल्या नजरेसमोर येतील. मण्डीमध्ये हा विषय विनोदी अंगाने हाताळला गेला आहे. तसाही प्रकार पूर्वी आमच्या भ्रष्ट चित्रसृष्टीने 'इर्माला डूस'चे गचाळ रूपांतर 'मनोरंजन' म्हणून पेश केला होता. हिंदीतला विनोद हा चीपच असतो; पण मण्डी त्याला अपवाद ठरेल अशी आशा आहे. कारण तिचा दिग्दर्शक श्याम बेनेगल. त्याचे अंकूर, निशांत जरी गंभीर व आशयघन विषय असले तरी त्याला विनोदाचे वावडे नाही. आमच्याकडे गैरसमजुतींना उधाण खूप असते. आर्ट-फिल्मवाला म्हटला की त्याला विनोद कळत नाही हाच विनोद जास्त प्रचलित. प्रायोगिकवाला म्हटला की, त्याने एखाद्या निखळ विनोदाला दाद द्यायची नाही का ? पण असे शिक्के उगीचच आर्ट–फिल्मवाल्यांच्या माथी मारले गेले आहेत. अर्थात काही आर्टवाले आव आणतात गांभीर्याचा, ती गोष्टच वेगळी.

खुद्द बेनेगलने 'चरणदास चोर' हा बाल चित्रपट विनोदी अंगानेच सादर केला होता; पण इतकी वर्षं त्याला विनोदी सिनेमा दिग्दर्शित करावा असे वाटलेच नाही. कदाचित सई परांजपेच्या 'कथा'ला राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्यानंतर खात्री पटली असेल की, बक्षिसांना 'विनोदाची ॲलर्जी' नाही !

हिंदी सिनेमाला परंपरांचे फार वेड. अमिताभ दारू पिऊन गातो आणि ते पब्लिक डोक्यावर घेते असं एका जरी सिनेमात घडलं, यशस्वी झालं तर निर्माते लगेच दारूगाण्याची परंपरा निर्माण करायला पुढे येतात. भूमिकांचे साचे बनवण्यात ही मंडळी फार वाकबगार असतात. सिनेमातले पोलीस, व्हीलन, चरित्र-अभिनेते, अभिनेत्र्या हे जसे ठरीव साचे असतात, तसाच साचा वेश्या आणि त्यांच्या रेड लाइट एरियाचा असतो. घुंगरू, काचांचे तुकडे, पोपटांचे पिंजरे, रिकामा फुटका आरसा, गजबजलेली पानांची दुकाने, कानांवर येणारे मुजऱ्याचे टिपिकल स्वर, वेश्यांची माडी, तिथल्या एकाच चेहऱ्याच्या वेश्या ऊर्फ अनेक एक्स्ट्रॉज, त्यांची हेड म्हणजे कोठीवाली, ह्या गोष्टी इतक्या जुनाट झाल्या आहेत की, त्या पाहाणं कंटाळवाणं वाटतं. ढोबळता हिंदी सिनेमासृष्टीला इतकी प्यारी आहे की, पंधरा पंधरा वर्षे वेगवेगळे निर्माते वेश्यावस्तीचे एकाच पद्धतीने चित्रण करीत आलेले आहेत. पंधरा वर्षांत खऱ्या वेश्यावस्त्या बदलल्या असतील. (भले त्या अधिक बकाल झाल्या असतील !) पण आमचे निर्माते–दिग्दर्शक बदलून स्वतः-च्याच मनोविश्वातून जगाकडे पाहणार. दिग्दर्शक बदलून, नट्या बदलून साच्यामध्ये कोणताच फरक सापडायचा नाही.

## मंडईत काय आहे ?

वेश्यांवरचा सिनेमा म्हटल्यावर बेनेगलही 'फ्लेश मार्केट' उभं करणार का ? आधीच बेनेगल सिनेमात 'देह–प्रदर्शन' असतेच. हा आरोप पूर्वापार चालू आणि त्यात अशा विषयावरचा सिनेमा म्हणजे मंडई–मांसल व्हायचीच जास्त लक्षणं. कोणत्याही व्यावसायिक दिग्दर्शकाप्रमाणे त्याने हे आरोप नाकबूल केलेत. त्याने एका इंग्रजी मुलाखतीत म्हटलंय, 'जिथे आवश्यक असेल तिथे सेक्सचा उपयोग मी केला आहेच. उदा– जुनून; पण म्हणून माझे सिनेमे अश्लील म्हणून गणले गेलेले नाहीत. ताज्या मण्डीमध्येही आवश्यक ठिकाणी संयमित सेक्स आहे आणि अश्लील विनोदही त्यामानाने कमीच आहेत. प्रत्येक जण स्वतःच्या दोषांवर पांघरूण घालणारच. प्रत्यक्षात लोकच ठरवतील की मण्डी अश्लील की, निखळ विनोदी आहे ?

मुळात म्हणजे कोण्या मोठ्या शहरातील प्रसिद्ध वेश्यावस्तीचे चित्रण नसून, छोट्या शहरातील तसल्या वस्तीचे चित्रण आहे. वास्तववादी चित्रीकरणावर भर देणाऱ्या दिग्दर्शकाने ह्या चित्रपटासाठी खास वेश्यावस्तीचा सेट उभारला होता हेही एक वैशिष्ट्यच. छोट्या शहरातील वेश्यावस्ती उठवण्याचा प्रयत्न करणारे आणि त्यांना विरोध करणारे असा संघर्ष ह्यात मांडला आहे. त्यामुळेच देहप्रदर्शनापेक्षा राजकीय शक्ति–प्रदर्शन जास्त दिसावे ही अपेक्षा आहे.

शबाना आझमी झाली आहे कोठीवाली आणि प्रसिद्ध वेश्येची भूमिका साकारली आहे 'उंबरठा' फेम स्मिता पाटीलने. ओमपुरी सवंग चित्र काढणारा फोटोग्राफर आहे, तर नासिरुद्दीन शाह झालाय बाहरवाला. ह्याशिवाय अमरीश पुरी, गीता सिद्धार्थ सोनी राझदान इ. बेनेगली कलाकार आहेतच. ह्या जर भूमिका पाहिल्या आणि ही कलाकार-नामावली वाचली तर लक्षात येईल ह्यात नवीन असं काय ? कोठीवालीच्या भूमिकेत असा कोणता फरत शबानामुळे पडणार आहे ? की शबानाच्या करिअरला आणखी एका पैलूचा फायदा मिळणार ! स्वतःची 'इमेज' बदलण्याची ही धडपड करण्याची वेळ श्याम बेनेगलवरही यावी, ह्याचंच आश्चर्य वाटतं. वास्तव–सिनेमा म्हणून हुबेहुब वातावरणनिर्मिती करणं ह्याला कोणी नावीन्य मानायचं ?

आज नव्या सिनेमाचा प्रेक्षकही तयार होत चालला आहे. पूर्वीचे दिवस वेगळे होते. आर्ट–सिनेमा फक्त सत्यजित रे, ऋत्विक घटक आणि मणि कौल अशी बोटांवर मोजण्यासारखी मंडळीच काढत होती. इथल्यापेक्षा विदेशात त्यांची किंमत, गुणवत्ता ठरल्यानंतर आम्ही त्यांना आंतरराष्ट्रीय दिग्दर्शक म्हणून डोक्यावर घ्यायची; पण आज अनेक प्रायोगिक दिग्दर्शक तयार झाले आहेत. प्रतिभाशक्ती कमी-जास्त असेल; पण अनेकांगानी प्रयत्न होत आहेत. अशा वातावरणात आर्ट–सिनेमाही अधिकाधिक दर्जेदार व्हावा अशी वाढती अपेक्षा प्रेक्षकांमध्ये निर्माण होत आहे. ह्याच वेळी बेनेगलसारख्या मान्यवर दिग्दर्शकांनी चालू सिनेमाची मळकी पायवाट चोखाळली तर ते सहन होईल का ?

अर्थात हे सर्व प्रश्न बेनेगलच्या मंडीमुळे निर्माण झालेत असं नाही. आजच्या आर्ट–सिनेमांकडे पाहिल्यावर असे प्रश्न सहज उत्पन्न होतात आणि प्रेक्षक बुचकळ्यात पडतो की, आज वेश्यांवरती कॉमेडी काढणारा श्याम उद्या मनमोहन देसाईंच्या पावलावर (की यशावर) पाय ठेवून 'शबाना रेखा–स्मिता'सारखा सस्ती करमणूकवाला सिनेमा तर काढणार नाही ना ?

–राजीव जोशी

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage–No. 11 ) Regd. No. PNCW–28



## प्रकाशित

श्याम हा मध्यमवर्गातला, मध्यम आकाराचा, मध्यम विकारांचा
मध्यम बुद्धीचा, मध्यवर्ती सरकारातला मध्यम प्रतीचा अधिकारी.
साधा तसाच बेरकी. मिस्किलपणा हा त्याचा स्थायीभाव.
राधा त्याला कधी साथ करते तर कधी विरोध.
त्यांच्या संसाराच्या या कथा.

# काही दिवस श्यामचे, काही राधाचे

लेखक : फिरोज़ रानडे

मूल्य : पंचवीस रुपये

# श्रीग्रामायन । दुसरी आवृत्ती प्रसिद्ध झाली.

लेखक : श्री. ग. माजगावकर

मूल्य : पंचवीस रुपये

राजहंस प्रकाशन